
किशोर
ऑक्टोबर '७४ *
खास
चार पाय
वाल्यांसाठी





# अविनाश सारंगचा विजय

मुंबईचा जलतरणपटू अविनाश सारंग याने गेल्या २८ ऑगस्टला आपल्या पहिल्याच प्रयत्नात ब्रिटिश खाडी पोहून जाण्याचा पराक्रम केला. अविनाशला हे २९½ कि. मी. (२१ मैल) अंतर पार करण्यास १६ तास १५ मिनिटे लागली. या पूर्वी ज्या चार भारतीयांनी ब्रिटिश खाडी पार करण्याचा पराक्रम केला ते असे: मिहीर सेन (१४ तास ४५ मिनिटे : १९५८), विमलचंद्र (१३ तास ५० मिनिटे : १९५९), नितींद्र नारायण रे (१९ तास : १९६१) आणि स्त्री-जलतरणपटू आरती सहा (१६ तास २० मिनिटे : १९५९). या पराक्रमी जलतरणपटूंच्या पंक्तीस आता अविनाश सारंग बसला आहे.

अविनाशचा हा पराक्रम म्हणजे त्याने यापूर्वी गाजविलेल्या अनेक पराक्रमांच्या मालिकेतील उत्कर्षबिंदू होय. त्याने १९६७ साली नर्मदानदीतील १९ कि. मी. ची (१२ मैल) अखिल भारतीय स्पर्धा (३ तास २ मिनिटे) जिंकली. तसेच चोरवाड ते वेरावळ ही २४ कि. मी. ची (१५ मैल) दुसरी अखिल भारतीय स्पर्धा (७ तास ३२ मिनिटे) त्याने जिंकली. गेल्या वर्षी धरमतर ते मुंबई हे ३२ कि. मी. (२० मैल) अंतर अविनाशने ८ तास २० मिनिटांत कापले. त्यानंतर वर्सोवा ते मुंबई चौपाटी ही ३२ कि. मी. अंतर (२० मैल) ११ तास २७ मिनिटांत पार करून आणखी एक स्पर्धा जिंकली.

अविनाश वयाच्या तेराव्या वर्षी पोहण्यास शिकला. त्याचे वडील श्री. बाबाजी सारंग यांनी मुंबईच्या महात्मा गांधी तलावात त्याला पोहावयास शिकविले. मुंबईचे सुविख्यात जलतरण शिक्षक श्री. अरविंद साठे यांचा अविनाश हा शिष्य होय. आपल्याला मिळालेल्या यशाचे श्रेय अविनाश श्री. साठे यांनी केलेल्या मार्गदर्शनास व त्यांनी त्यांच्याकडून करून घेतलेल्या मेहनतीस देतो.

अविनाशचा जन्म मुंबईस १३ एप्रिल १९४४ रोजी झाला. शालेय शिक्षण मुंबईच्या डॉन बॉस्को हायस्कूलमध्ये आणि महाविद्यालयीन शिक्षण रुपारेल व सेंट झेवियर्स या कॉलेजांमध्ये झाले. त्याने अर्थशास्त्र हा विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी. ए. ची पदवी प्राप्त केली. अविनाश सध्या 'एअर इंडिया इंटरनॅशनल' या विमान वाहतूक कंपनीच 'फ्लाइट पर्सर' या हुद्द्यावर अधिकारी आहे. ब्रिटिश खाडी पोहून जाण्याच्या त्याच्या उपक्रमात एअर इंडियाचे त्याला आर्थिक व अन्यप्रकारे पुष्कळ साहाय्य झाले.

ब्रिटनमधील अतिथंड हवेचा सराव व्हावा म्हणून अविनाश तेथे दोन महिने अगोदरच गेला होता. खाडीत पोहण्यासाठी फ्रेंच किनाऱ्यावरील कॅप ग्रीस नेझवरून निघाल्यानंतर १० तासांतच तो ब्रिटनच्या किनाऱ्यावरील डोव्हर या गावापासून सुमारे अडीच–तीन मैल अंतरावर आला. पण समुद्रातील प्रचंड उसळत्या लाटांमुळे शेवटचे हे अंतर तोडण्यास त्याला आणखी पाच तास पोहावे लागले. अशा रीतीने १६ तास १५ मिनिटे पोहून सँडगेट या ठिकाणी ब्रिटिश भूमीवर त्याने पाय ठेवला.

अविनाश सारंगचे हे उज्ज्वल यश केवळ जलतरणाच्या क्षेत्रातीलच नव्हे तर सर्व क्षेत्रातील क्रीडापटूंना निश्चितच स्फूर्तिप्रद आहे.

# किशोर

वर्ष ३ रे

ऑक्टोबर १९७४


अंक १० वा

संपादक : श्री. चि. वि. चिपळूणकर, संचालक

प्रकाशक : श्री. बापूराव नाईक, नियंत्रक

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :
श्री. वसंत शिरवाडकर, कार्यकारी संपादक,
द्वारा नियंत्रक, पाठ्यपुस्तक मंडळ,
'नीलम' १०८, वरळी सी फेस रोड, मुंबई–१८.

## या अंकात


| | | |
|---|---|---|
| नव्या चपला : तारा पंडित | ... | २ |
| पंधराव्या मजल्यावरती : शांता ज. शेळके | ... | ४ |
| लिंडबर्गचे ऐतिहासिक उड्डाण : उमाकांत ठोमरे | ... | ५ |
| ऋषी आणि तलवार : अरविंद मंगरूळकर | ... | ११ |
| दादोबा पांडुरंग तर्खडकर : प्रा. वि. ह. कुळकर्णी | ... | १४ |
| ओळखा पाहू : नलिनी परांजपे | ... | १६ |
| राजा अंधदेशात गेला तेव्हा : म. वि. कोल्हटकर | ... | १७ |
| कुत्रा पाळणार आहात का? : डॉ. चंद्रहास कापडी | ... | २१ |
| पुस्तक परिचय : | ... | २७ |
| पैशाचा शोध : वि. चिं. फडके | ... | २८ |
| बकासूर : वृंदा लिमये | ... | ३० |
| दुचाकीवरून पुणे ते श्रीनगर : विवेक देशपांडे | ... | ३१ |
| नारळ आला जन्माला : मालती बर्वे | ... | ३६ |
| महिला क्रिकेट : सिली पॉईंट | ... | ३९ |
| सात रंगाच्या सात पोरी : उत्तम कोळगावकर | ... | ४१ |
| तुमचा शब्दसंग्रह वाढवा : | ... | ४२ |
| असे हे विलक्षण जग : | ... | ४३ |
| सृष्टीतील नवलकथा : प्रकाश साटम | ... | ४५ |
| [illegible]ावली : आराधना आठवले | ... | ४५ |
| आकाशदर्शन–ऑक्टोबर : बाबूराव प. सावे | ... | ४६ |
| चित्रशोध–शब्दशोध : | ... | ४८ |
| मुखपृष्ठ : श्री. श्याम जोशी | | |


आतील सजावट : प्रभाशंकर कवडी, राम वाईरकर, शशिकर तेंडुलकर, पद्मा सहस्रबुद्धे, रमेश उमरोटकर, श्याम जोशी, ज्ञानेश सोनार, श्रीनिवास प्रभुदेसाई, अनंत पै.

# नव्या चपला

: लेखक—सुकुमार रे :

: अनुवाद—तारा पंडित :

यतीनला नव्या चपला घेऊन दिल्या तेव्हा बाबा म्हणाले, 'आता ह्या चपला जर का नीट वापरल्या नाहीस ना, तर तश्शा फाटक्या घालाव्या लागतील. मी पुन्हा आणून देणार नाही, सांगून ठेवतो.' यतीनला दर महिन्याला नवी चप्पल लागायची. त्याचे धोतर दोन दिवसांतच कुठेतरी फाटायचे. त्याची कोणतीही वस्तू व्यवस्थित राहात नसे. पुस्तकांची कव्हरे फाटलेली, त्याचे कोपरे दुमडलेले, पाटीला वरपासून खालपर्यंत चीर गेलेली, पेन्सिली नेहमीच हातातून पडायच्या त्यामुळे सदा पेन्सिलीचे लहान लहान तुकडे झालेले. त्याला आणखी एक वाईट सवय होती, शिसपेन्सिलीचे लाकूड चावायची. चावून चावून त्या पेन्सिलीचे लाकूड शेंगदाण्याच्या शेंगेच्या फोलफटासारखे करून टाकायचा तो. हे पाहून मास्तर नेहमी त्याला म्हणायचे, 'यतीन आज तुला घरी जेवायला मिळालं नाही वाटतं?'

नवी चप्पल घालून पहिल्या दिवशी यतीन फारच काळजीपूर्वक चालत होता. चप्पल तुटू नये म्हणून व्यवस्थित चालायचा. पायऱ्या हळूहळू उतरायचा. व्हरांडयातून सांभाळून चालायचा, पाय घसरू नये म्हणून. पण हे सगळे तेवढ्यापुरतेच. दोन दिवसांनंतर पुन्हा आपले पहिल्यासारखे वागणे सुरू व्हायचे. चपलेचे प्रेम विसरून धडाधड पायऱ्या उतरणे, चालताना पन्नास वेळा ठोकर खाणे इत्यादी पूर्ववत् सुरू. साहजिकच एखादा महिना उलटत नाही तोच एका चपलेने 'आ' वासला.


आई म्हणाली, 'अरे, तावडतोब ती चप्पल चांभाराकडून शिवून घे हो, नाहीतर अगदीच कामातून जायची.' पण चांभाराकडे जायचे नाव नाही. चपलेचा 'आ' आणखी मोठा झाला. होय, एक वस्तू मात्र यतीन खूप काळजीपूर्वक वापरायचा. ती म्हणजे पतंग. जो पतंग त्याला आवडायचा तो फाटला तरी पुन्हा चिकट-वून दुरुस्त करून टिकेल तितके दिवस तो जपून ठेवायचा. खेळण्याचा सगळा वेळ त्याचा निव्वळ पतंग उडवण्यातच जायचा. ह्या पतंग उडवण्याच्या नादापायी त्याने कितीतरी वेळा बोलणी खाल्ली असतील. पतंग फाटला की तो चिकटवायला चिक्की हवी म्हणून स्वयंपाकघरात जाऊन तो गोंधळ घालायचा. पतंगाला शेपूट लावायचे असले किंवा दोरा कापायला कात्री हवी असली की तो आईचा शिवणाचा डबा उद्ध्वस्त करून टाकायचा. एकदा पतंग उडवू लागला की त्याला खाण्यापिण्याची शुद्ध राहायची नाही. त्या दिवशी यतीन शाळेतून भीतभीतच घरी गेला. कारण झाडावर चढताचढता त्याचे नवे धोतर बरेचसे फाटले होते. त्याने पुस्तके ठेवली आणि चप्पल पायात घालू लागला. पाहिले तर ती इतकी फाटली होती की पायात घालणे मुश्किल. पण पायऱ्या उतरताना त्याला त्याची आठवणच राहिली नाही. एकदम दोनदोन तीनतीन पायऱ्या ओलांडत तो जिना उतरू लागला. अखेर चपलेचा वासलेला 'आ' मोठा होत होत तिचे सगळे दात बाहेर आले. शेवटच्या तीन पायऱ्या एकदम ओलांडण्यासाठी उडी मारताच तो असा काही घसरला की पायाखालची जमीन सुर्रकन् सरकली आणि फाटकी चप्पल त्याच्यासकट सुंई-सुंई करीत कुठे निघून गेली कोण जाणे!



खूप धावताधावता चप्पल थांबली तेव्हा यतीनने पाहिले, तो कुठल्यातरी अनोळखी प्रदेशात येऊन पोचला होता. तिथे सगळीकडे कित्येक चांभार बसले होते. यतीनला पाहून ते चटकन् जवळ आले. मग त्यांनी त्याच्या पायातली चप्पल काढून घेऊन ती झटकली. त्यांच्यातला एक चांभार चांगला धष्टपुष्ट होता. तो यतीनला म्हणाला, 'तू अगदी वाह्यात मुलगा दिसतोस. चपलांची ही काय दुर्दशा करून टाकलीस? अरेरे, आणखी थोडा त्रास दिला असतास तर बिचारीचा प्राणच गेला असता.' यतीनला

थोडा धीर आला. म्हणाला, 'चपला-जोड्यांना खरंच प्राण असतो काहो?' चांभारांनी म्हटलं, 'मग काय तर! तूच विचार करून पाहा, पायांत चप्पल घालून तू जोराने धावत सुटतोस तेव्हा तिला काय लागत नसेल? नक्कीच लागतं. फार लागतं बरं. लागतं म्हणूनच तर ती बिचारी चप्पल मचमच् आवाज करते. जेव्हा चप्पल घालून तू धावतधावत पायऱ्या चढत उतरत होतास आणि तुझ्या पायाच्या दाबामुळे तिची एक बाजू फाटून गेली तेव्हा काय तिला लागलं नसेल? फार लागलं तिला. म्हणूनच तर ती तुला इथे आमच्याकडे घेऊन आलीय्. लहान मुलांच्या सर्व वस्तूंची जबाबदारी आमच्यावर असते. जेव्हा ते आपल्या वस्तू व्यवस्थित वापरत नाहीत, तेव्हा आम्ही त्यांना चांगले धडे शिकवतो.' चांभाराने फाटकी चप्पल यतीनच्या हाती देत म्हटले, 'घे ही चप्पल. शिवून काढ नीट.' यतीन रागाने म्हणाला, 'मी जोडे शिवत नसतो. चांभार शिवतात.' चांभार हसून म्हणाला, 'हा काय तुझा स्वतःचा देश आहे वाटतं की काम करणार नाही म्हटलं म्हणजे सुटलास? चल, घे हा सुईदोरा. चप्पल शिवून काढ.' आता यतीनचा राग पळाला. त्याच्या मनात भीतीने ठाण मांडले. तो भीतभीत म्हणाला, 'चप्पल कशी शिवतात ते माहीत नाही मला.' चांभार म्हणाला, 'मी सांगतो कसं शिवायचं ते. पण तुलाच शिवून काढावं लागेल सगळं.' यतीन पुरता घाबरला होता. तो चप्पल शिवायला बसला. त्याच्या हाताला सुई बोचली. मान खाली घालून शिवताशिवता त्याची मान दुखू लागली. मोठ्या मुश्किलीने दिवसभरात एकच चप्पल शिवून झाली. मग तो चांभाराला म्हणाला, 'दुसरी चप्पल उद्या शिवीन. आता मला भूक लागलीय.' चांभार म्हणाला, 'म्हणजे काय? काम पूर्ण झाल्याखेरीज तुला जेवणखाण मिळणार नाही अन् झोपायलाही मिळणार नाही. एका चपलेची शिवण अजून बाकी आहे. ती शिवून काढावी लागेल. त्यानंतर हळूहळू व्यवस्थित कसं चालावं ते तुला शिकावं लागेल, जेणेकरून पुन्हा तू कोणत्याही चपलेला कधीही त्रास देणार नाहीस. त्यानंतर शिंप्याकडे जाऊन तुझं फाटलेलं धोतर शिवावं लागेल. नंतर आणखी कोणत्या वस्तूंची तू नासधूस केली आहेस तेही बघावं लागेल.'

हे ऐकून यतीनच्या डोळ्यांतून टपटप पाणी पडू लागले. रडत रडत त्याने कशीबशी दुसरी चप्पल शिवून काढली. सुदैवाने ही चप्पल जास्त फाटली नव्हती. त्यानंतर चांभारांनी त्याला एका पाच मजली उंच घराजवळ नेले. त्या घराच्या सर्व पायऱ्या चढाव्या लागल्या. नंतर त्यांनी यतीनला पुन्हा खाली आणून म्हटले, 'जा, पुन्हा एकदा पाचही मजले वर चढून जा आणि पुन्हा खाली उतरून ये. आणि लक्षात ठेव, एकेक पायरी हळूहळू उतरायची.' यतीन पाचही मजले चढून गेला आणि पुन्हा खाली उतरला. खाली येताच चांभाराने म्हटले, 'छे, बरोबर झालं नाही. तीन वेळा तू दोन दोन पायऱ्या ओलांडून वर चढलास, पाच वेळा उड्या मारल्यास आणि दोन वेळा तीनतीन पायऱ्यांवरून एकदम उतरलास. जा, पुन्हा सगळे जिने चढून जा, आणि लक्षात ठेव, तशा चुका पुन्हा



होऊ देऊ नकोस.' बिचारा यतीन! एका मजल्याच्या पायऱ्या चढता चढताच त्याचे पाय दुखू लागले. तो आता अगदी हळूहळू सर्व जिने चढला आणि हळूहळू उतरून आला.

चांभारांनी म्हटले, 'ठीक आहे. यावेळी बरं झालंय. आता चल शिंप्याकडे.' असं म्हणून त्याला ते एका निराळ्याच ठिकाणी घेऊन गेले. ते एक मैदान होते. तेथे कित्येक शिंपी शिवण करीत बसले होते. यतीनला पाहाताच त्यांनी विचारले, 'काय रे, काय फाटलंय?' चांभाराने उत्तर दिले, 'अहो बघा, नवंच धोतर; पण केवढं मोठं फाडून ठेवलंय याने.' शिंपी म्हणाले, 'फार वाईट केलंस. चल, चटकन् शिवून टाक बघू ते.' यतीनला नाही म्हणायची हिंमत झाली नाही. तो मुकाट्याने सुईदोरा घेऊन फाटलेले शिवायला बसला. दूरदूर दोनचार टाके घातले. तोच शिंपी ओरडून म्हणाले, 'अरे अरे, हे काय करतोस? याला काय शिवण म्हणायचं? उसव, उसव ते.' अशा तऱ्हेने तो शिवायचा अन् तितक्याच वेळा त्याला शिवण उसवावी लागायची. शेवटी तो अगदी रडकुंडीस आला. म्हणाला, 'मला आता झोप यायला लागलीय. भयंकर भूक लागलीय. मला घरी पोचवून द्या. यानंतर मी कपडे फाडणार नाही; छत्री फाडणार नाही.' यावर सर्व शिंपी हसू लागले. हसत हसत म्हणाले, 'तुला भूक लागलीय? मग तुला खायला आमच्याकडे पुष्कळ वस्तू आहेत की.' असे म्हणून त्यांनी कपड्यावर माप घेतेवेळी खुणा करावयाच्या बऱ्याचशा पेन्सिली आणून दिल्या. 'तुला तर पेन्सिली चावायला फार आवडतात होय ना? ह्या घे.

# पंधराव्या मजल्यावरती



पंधराव्या मजल्यावरती आहे आमचे घर
लिफ्टमधून सुळकन् आम्ही जातो खालीवर.
खूप मोठी गच्ची : वारे येते बहारदार
दूर दूर चमचम करतो समुद्र निळाशार.
गच्चीवरून खोल खाली दिसते झोपडपट्टी
कधी तिथून हाक येते, कधी वाजते शिट्टी !
नागडी उघडी मुले तिथली : काळा काळा रंग
सदा न् कदा काही तरी करण्यात असतात दंग.
मुले तिथली म्हणतात मला, "भित्री भागुबाई
पिंजऱ्यामधला पोपट नुसता, येतं तुला काही ?"
आई म्हणते, "राजूबाळा, बघू नकोस तिकडं !
घाणेरडी ती पोरं मेली, वळण त्यांचं वाकडं !
शैलू, शावक, जेनी, दीप, दिना—तुझे मित्र;
त्यांच्याबरोबर खेळ. नाहीतर काढत बैस चित्रं !"
नेहमीचे ते दोस्त, त्यांचे तेच तेच खेळ,
कंटाळाच येतो, जाता जात नाही वेळ !
काय झाले कधी मीच खाली गेलो तर ?
काय झाले खालची मुले घरी आली तर ?
वाकून वाकून बघतो खाली, उगीच येते रडू,
थंडगार, गोड आइस्क्रिम उगीच लागते कडू !

—शांता ज. शेळके

चावून चावून खाऊन टाक. दुसरं काहीच खायला नाहीय आमच्याकडे.' असे म्हणून ते सर्वजण आपापल्या कामाला निघून गेले.


थकल्या भागलेल्या यतीनला रडतारडता जमिनीवरच झोप लागली. तेवढ्यात आकाशात वों वों असा आवाज झाला आणि यतीनचा पतंग गिरक्या घेत घेत त्याच्या पुढ्यात येऊन पडला. पतंग हलक्या आवाजात म्हणाला, 'तू मला नेहमी सांभाळून ठेवतोस ना, म्हणून मी तुझ्या मदतीला आलो आहे. चटकन् ऊठ. अन माझ्या शेपटीला घट्ट धरून ठेव.'

यतीनने पतंगाची शेपूट घट्ट धरून ठेवली. लागलीच पतंग सॉं करीत उंच आकाशात उडत गेला. तो आवाज ऐकून सगळे शिंपी मोठमोठ्या कात्र्या घेऊन धावत आले, पतंगाचा दोरा कापण्यासाठी म्हणून. पण पतंग यतीनसह जोराने खालच्या दिशेला धावू लागला. खाली पडतापडता यतीनचे डोके जोराने जमिनीवर आदळले. तो चमकून उठला. पतंग कुठे निघून गेला कोण जाणे ! यतीनने पाहिले, तो स्वतः जिन्याच्या पायऱ्यांशी झोपलेला असून त्याच्या डोक्यात भयंकर वेदना होत होत्या.

काही दिवसांनंतर तो दुखण्यातून बरा झाला. त्यानंतर त्याची आई म्हणायची, 'पायऱ्यांवरून पडल्यापासून माझा मुलगा भारी अशक्त झालाय् हो. पहिल्यासारखं हुंदडणं नाही, उड्या मारणं नाही, लोंचकळणं नाही, काहीही उरलं नाही त्याचं. एरवी एक चपलांचा जोड कधी चार महिने टिकलाय् का त्याला ?'

खरी गोष्ट अशी होती की यतीन अजूनही त्या चांभारांना अन त्या शिंप्यांना विसरू शकत नव्हता.

[श्री. सुकुमार रे हे विख्यात सिनेदिग्दर्शक सत्यजित रे यांचे वडील होत.]



# अटलांटिक महासागरावरील पहिली झेप

# लिंडबर्गचे ऐतिहासिक उड्डाण

: उमाकांत ठोमरे :

> अटलांटिक महासागरावरून पहिले हवाई उड्डाण करणारे चार्लस् लिंडबर्ग यांचा गेल्या २६ ऑगस्टला मृत्यू झाला. आज विमानांच्या रचनेचा पुष्कळच विकास झाला आहे. पण १९२७ साली लिंडबर्गनी हे उड्डाण केले तेव्हा विमाने अगदी प्राथमिक अवस्थेत होती. अशा परिस्थितीत लिंडबर्गनी अटलांटिकवरून केलेले उड्डाण हा केवळ हा हवाई वाहतुकीच्याच नव्हे तर मानवी इतिहासातील एक अत्यंत उज्ज्वल व रोमांचकारी असा पराक्रम होता. लिंडबर्गनी ज्या विमानाने हे उड्डाण केले त्याचे नाव 'स्पिरिट ऑफ सेंट लुई' असे होते. लिंडबर्गनी नंतर याच नावाचे शीर्षक असलेले पुस्तक लिहिले. अमेरिकेत ग्रंथलेखनास सर्वोच्च मान म्हणून मिळणारे पुलित्झर पारितोषिक लिंडबर्गना या ग्रंथाबद्दल मिळाले. लिंडबर्गच्या विमान अटलांटिक उड्डाणाच्या पराक्रमाची हकिकत या लेखात सांगितली आहे.

न्यू यॉर्क ते पॅरिस विमानाचे आज काही विशेष असे वाटत नाही. ओसरीवरून अंगणात उतरावे इतका सुखाचा झाला आहे हा प्रवास. मिनेसोटाच्या चार्ल्स ऑगस्टस लिंडबर्ग या उंच, छ्लकाट्या, तरुण वैमानिकाने १९२७ च्या मे महिन्यात विमान उड्डाणाचा जो पहिला ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला तेव्हा मात्र परिस्थिती अगदीच वेगळी होती.

लिंडबर्गने २१ मे १९२७ रोजी सकाळी सात वाजून बावन्न मिनिटांनी लॉंग आयलंडच्या रूझवेल्ट विमानतळावरून आपल्या छोटेखानी विमानातून उड्डाण केले. वास्तविक ही वेळ टळटळीत उन्हाची. परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती. पावसाची संतत धार आणि दाट धुके याने रूझवेल्ट विमानतळ झाकाळून गेला होता. सर्वत्र चिखल झाला होता. धावरस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साचून लहान लहान तळी व डबकी निर्माण झाली होती. धुके इतके खाली उतरले होते की काही ठिकाणी आकाश कुठले आणि जमीन कुठली हे अजिबात लक्षात येत नव्हते. आजच्या सुधारलेल्या काळात अशा प्रतिकूल हवेत उड्डाण करायला कोणाही वैमानिकास नक्कीच मना केले जाईल.

अशा खराब हवेत विमान वर नेण्यात काही अर्थ नाही, थोडा वेळ वाट पाहावी, हवा सुधारते आहे का ते पाहावे—असा लिंडबर्गला त्याच्या साऱ्या चाहत्यांनी सल्ला दिला. फ्रँक महोनी, बोएडेकरसारख्या त्याच्या पाठीराख्या तज्ज्ञ मंडळींचा देखील लिंडबर्गने अशा बेभरवशाच्या हवेत उड्डाण करावे या गोष्टीला विरोध होता.



चार्लस् लिंडबर्ग

पण लिंडबर्ग मागे हटायला तयार नव्हता. त्याने थोडीसुद्धा उसंत न घेता वैमानिकाचा पोशाख अंगावर चढविला आणि झटकन विमानात चढून तो आपल्या जागेवर जाऊन बसला. प्रॉपेलरचा पंखा फिरविण्याची त्याने मेकॅनिकला खूण केली. क्षणार्धातच यंत्रात धुगधुगी आली. गतिमान होऊन ते धडधडू लागले. एंजिन नीट गरम होण्याची वाट पाहात काही काळ तो स्वस्थ बसून राहिला. 'आता सतत चाळीस तास हे असंच धडधडत ठेवायचं आहे. राहील का ते तसं इतका वेळ धडधडत,' स्वतःच्याच मनाला तो प्रश्न करीत होता. चाचणीच्या वेळी ते एकशेसाठ तास धडधडले होते, मग प्रत्यक्षात काही अडचण येऊ नये असे त्याने स्वतःचे समाधान करून घेतले. पण बारीक शंका कुठेतरी छळ करू लागली, 'इथून पॅरिस छत्तीसशे मैल दूर आहे. हे काही थोडं अंतर नव्हे. शिवाय न्यूफाउंडलंडजवळ भयंकर धुक्यानं मार्ग चोंदला जाण्याचीही शक्यता असते.'

लिंडबर्ग कोणत्याही परिस्थितीत मागे येणार नव्हता. पहिल्यापासूनच तो मोठा चिवट, निग्रही व हेकेखोर वाटावा इतका आग्रही होता. लहानपणी तो नेहमी स्वप्नात रंगून गेलेला असायचा. विमान उड्डाण—वैमानिक होणे हे जीवाशी जतन करून ठेवलेले त्याचे लाडके स्वप्न होते. मिनेसोटाच्या हायस्कूलमध्ये असताना काय किंवा पुढे विसकॉन्सिन विश्वविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर काय—या एका ध्येयाव्यतिरिक्त दुसऱ्या कुठल्याच विचाराने मनाला स्पर्श केला असल्याचे त्याला स्मरत नव्हते. शालेय वा विश्वविद्यालयाच्या शिक्षणात त्याचे मन कधी रमले नाही. हे शिक्षण घेतल्याने काही निळ्या आकाशात पंख पसरून भरारी मारण्याचे त्याचे स्वप्न साकार होणार नव्हते. आणि म्हणूनच युनिव्हर्सिटीतील इंजिनियरिंगचा शिक्षणक्रम पुरा होताच लिंकन-नेब्रास्का येथल्या विमान विद्येचे शिक्षण देणाऱ्या शाळेत त्याने नाव दाखल केले.


वैमानिक झाल्यावर सुरुवातीच्या काळात कित्येक दिवस तो आपल्या विमानातून सेंट लुई ते चिकागो अशी टपालाची नेआण करीत असे. अमेरिकेच्या तसून तसू भूभागाची त्याला आता माहिती झाली. नुसता भूभागच नव्हे तर अमेरिकेचे आकाशही आता त्याच्या चांगल्या परिचयाचे झाले. हवाई टपालाची वाहतूक, फळबागांवर विमानातून जंतुनाशक द्रव्यांची फवारणी ही कामे करीत असतानाच त्याचे एक स्वप्न रचणे चालू असायचे. केवळ अमेरिकेचेच नव्हे तर साऱ्या जगाचे आकाश म्हणजे विमान वाहतुकीचा एक राजमार्ग बनला आहे हे त्याचे लाडके स्वप्न....एका झेपेत महासागर ओलांडून दाखविल्याखेरीज ते साकार होणे कठीण.

लिंडबर्गचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याच्या कामी त्याला मदत करणारी एक संस्था सुदैवाने पुढे आली. सेंट लुई या ज्या शहरी तो टपाल घेऊन जात असे तेथील 'स्टेट नॅशनल बँक ऑफ सेंट लुई' या संस्थेपुढे लिंडबर्गने अटलांटिक महासागर ओलांडून जाण्याची आपली योजना मांडली. या संस्थेने योजनेची शहानिशा करण्याकरिता शहरातील प्रतिष्ठित व तज्ज्ञ मंडळींची एक सभा घेतली. बरीच चर्चा झाली. लिंडबर्गच्या योजनेचा बारकाईने विचार झाला. लिंडबर्गला आपला विचार या मंडळीच्या गळी उतरविण्यासाठी काही कमी प्रयास पडले नाहीत. बराच युक्तिवाद त्याला करावा लागला. सरतेशेवटी संस्थेने त्याची योजना मान्य केली व ती अंमलात आणण्यासाठी त्याला आर्थिक मदत देऊ केली. या साहसासाठी त्याला हवे असलेले 'बेलांका मोनोप्लेन' बेलांका येथील 'रीन कंपनी' या कारखान्याकडून खास बनवून घेण्यात आले. या विमानास 'दि स्पिरिट ऑफ सेंट लुई'—म्हणजे 'सेंट लुईचे चैतन्य' असे अगदी उचित नाव देण्यात आले.

हेच 'दी स्पिरिट ऑफ सेंट लुई' विमान घेऊन २१ मे १९२७ या दिवशी लिंडबर्ग अटलांटिक महासागर ओलांडून जाण्याकरिता रुझवेल्ट विमानतळावर खडा झाला होता. प्रतिकूल हवेची त्याला तमा नव्हती. ननगेसेर आणि कोली या दोन फ्रेंच वैमानिकांची क्षणमात्र त्याला या वेळी तीव्रतेने आठवण झाली. महासागर उल्लंघण्याचा त्यांचा प्रयत्न फसला होता. त्यांची प्रेते हाती लागली नाही की पुढे त्यांचे काय झाले हे सुद्धा कोणाला कळले नाही. पण या दुःखद घटनेनेही लिंडबर्गचा धीर खचणार नव्हता.

न्यूयॉर्कहून निघून विमानाच्या एका झेपेत पॅरिस गाठायचे. अजस्र पसरलेल्या अटलांटिक महासागराला पालाण घालायचे. आजवर जे साऱ्यांना अशक्य, अघटित वाटत आले ते शक्य करण्यासाठी त्याचे ध्येयवेडे मन तडफडत होते. कोणतीही अडचण आज त्याचा मार्ग रोखू शकणार नव्हती. याच निर्धाराने तो आपल्या विमानात जाऊन बसला. प्रॉपेलरला गती देऊन त्याने त्याचे एंजिन सुरू केले.

लिंडबर्गने खिडकीतून तोंड बाहेर काढीत तिथे जमलेल्या आपल्या मित्रमंडळींकडे, त्याला निरोप देण्यासाठी, त्याचे उड्डाण




*लिंडबर्ग व त्याचे विमान*

पाहायला मिळावे म्हणून तिष्ठतं उभ्या असलेल्या जनसमुदायाकडे एकवार दृष्टिक्षेप केला. 'अच्छा, हम अभी चलेंगे....' असे अर्धवट स्वतःशीच अर्धवट निरोप देण्यासाठी जमलेल्या मंडळींस उद्देशून तो पुटपुटला. एकीकडे थ्रॉटल ढकलीत, हात उंचावून, कृतज्ञतेच्या भावनेने भारावल्यासारखे होत त्यांच्या शुभेच्छांचा स्वीकार करीत त्याने त्यांचा निरोप घेतला. थ्रॉटल ढकलल्यामुळे खाली चाका-जवळच्या चोक्सना धक्के बसण्यात सुरुवात झाली. फाड् फाड् असा जोराचा आवाज करीत निळसर ज्वाळा एक्झॉस्टमधून बाहेर पडली. इतका वेळ नुसतेच थरथरत उभे असलेले 'द स्पिरीट ऑफ सेंट लुई' हे विमान गतिमान होऊन धावरस्त्यावरून सरपटू लागले, रांगू लागले. मोठ्या कष्टाने–संथपणे ते रांगत होते. खड्डे-उंचवटे लागले की त्याची त्रेधातिरपीट उडत होती. अखेर विमानाची शेपटाकडची बाजू जरा वर उचलल्यासारखी झाली. लिंडबर्गने सारी शक्ती एकवटून थ्रॉटल करता येईल तेवढा जाम केला. हलके हलके विमानाची गती वाढत होती. त्याने दांडा ओढला तसे विमान डचमळत वर उचलल्यासारखे झाले. हवेत तरंगू लागले आणि पुनः खाली आले. त्याने उभ्या केलेल्या मार्कर्सना ओलांडून धावरस्त्याच्या टोकाला ते येऊन देखील ठेपले. इथे येईपर्यंत विमान वर नीट चढले नाही तर, मोटर बंद करून तिथेच कुंपणाजवळ टेलिफोनच्या खांबाशी थांबायचा विचार प्रथम त्याने मनाशी योजला होता. परंतु आयत्या वेळी त्याने तो रद्द केला. संभाव्य अपघाताच्या भीषण कल्पनेने आपल्या मित्रमंडळींच्या तोंडचे पाणी कसे पळाले असेल याचे चित्र पळभर त्याच्या डोळ्यांपुढे चमकून गेले. पळभरच ! आता विचार करायला वेळ नव्हता. जे व्हायचे असेल ते होईल, या इरेने त्याने पुन्हा दांडा खेचला.

विमानाने मात्र यावेळी चांगली साथ दिली. रों रों असा कडवा प्रतिकार व्यक्त करीत एंजिन जोराने गर्जले. विमान एकदम जमिनीवरून वर उचलल्यासारखे झाले. आस्ते आस्ते हवेत वरवर तरंगत जाऊ लागले. इंचा-अर्ध्या-इंचाच्याच फरकाने झाडांच्या शेंड्यांवर वा टेलिफोनच्या तारांवर आदळायचे ते वाचले हा केवळ दैवयोग ! पाच हजार पौंड वजनाचे विमान आणि पेट्रोल, एक युयुत्सु तरुण, प्यायच्या पाण्याची एक बाटली, तीन सँडविचेस, त्यांतले एक अंड्याचे आणि दोन रोस्ट बीफची–रायच्या डबल-रोटीत बनविलेली....या साऱ्यांनी पॅरिसच्या दिशेने झेप घेतली आहे.

ज्या लाँग आयलंडवरून विमानाने उड्डाण केले होते ते मागे पडले. फळांफुलांनी समृद्ध असलेली ती भूमी काळ्या करड्या धुक्यामधून अगदी ओकीबोकी भासत होती. आता खाली ऱ्होड आयलंड स्पष्ट दिसू लागले. वेताच्या बैठकीत नीट रेलून बसत नकाशात सिटी ऑफ प्रॉव्हिडन्स लिहिले होते त्या जागेभोवती त्याने छोटेसे वर्तुळ काढले. वाऱ्यामुळे पेन्सिल हातात ठरत नव्हती. नकाशा मांडीवर नीट पसरूनच या खुणा करणे त्याला भाग पडत होते. काही वेळाने न्यू इंग्लंडला त्याच्या विमानाने वळसा घातला.

चित्रपटातली दृश्ये झर्रकन डोळ्यांपुढून सरकली जावीत तसे मॅसेच्यु-सेट्सचे उत्तुंग खडक आणि उपसागर निमिषार्धात मागे पडले.

धुके केव्हाच वितळले होते. सूर्य चांगलाच वर आला होता. प्रखर तेजाने तळपत होता. छतातल्या झरोक्यातून प्रकाशकिरणे आत सांडत होती. लिंडबर्गने आपला पोशाख जरा सैल केला. शिरस्त्राणाची बाही जरा ढिली केली. त्याचे वर छताकडे लक्ष गेले आणि तो चकित झाला. एक साधी घरमाशी झरोक्याच्या काचेला चिकटून स्वस्थ उभी होती....'शुत्, शुत्' करीत त्याने तिला हाताने वारले—खिडकीवाटे बाहेर हाकलून देण्याचा प्रयत्न केला. पण तिने अखेर त्याला चकवलेच. त्याला हुलकावण्या देत कॉकपिटमध्येच ती रेंगाळत राहिली. 'अच्छा ठीक आहे. नसेल तुझी इच्छा तर रहा बापडी इथेच—मला काय बरंच झालं!'

विमान आता न्यूफौंडलंडच्या आकाशात उडत आहे. खालचा भूभाग अगदी उजाड ओकाबोका आणि कळाकांतिहीन भासतोय. भयप्रद दिसणारी पर्वतांची शिखरे दाट धुक्यांत गुरफटली गेली आहेत. धुक्यामुळे दिशा उमगेनाशा झाल्या आहेत, अंदाजाने चाचपडत लिंडबर्ग एखादया आंधळ्यासारखा विमान हाकारतोय. पर्वतशिखरे किती उंच आहेत, वारा कुठल्या दिशेने वाहतोय-दक्षिणेकडे महासागराच्या दिशेने की उत्तरेला ग्रीनलंडच्या दिशेने? तो गोंधळून गेला, काळजीने त्याचे मन व्यग्र झाले, 'सेंट जॉन कुठंय?' हा एकच प्रश्न पुन्हा पुन्हा तो आपल्या मनाला विचारीत होता. मग लॉगबुकमध्ये त्याने लिहून ठेवले, 'असं आंधळ्या-सारखं किती वेळ माणूस विमान उडवू शकेल?' खरेच किती वेळ! धुक्यामुळे, पंखांची टोकेदेखील त्याला नीटशी दिसत नव्हती. उपकरणांच्या साहाय्याने धोरण बांधून सावधपणे तो मार्ग आक्रमीत होता....सेंट जॉन दृष्टीस पडणे अत्यंत महत्त्वाचे होते. इथे एक भूभाग संपून महासागर सुरू होत होता....महासागर ओलांडीपर्यंत आता तसूभरदेखील जमीन त्याच्या दृष्टीस पडणार नव्हती. अखेर एकदाचे सेंट जॉन दृष्टीस पडले. विमान धुक्याची कोंडी फोडून बाहेर लख्ख प्रकाशात आले. खाली शहरातल्या घरादेवळांची छप्परे दिसत होती. त्याने आपला दुसरा नकाशा उघडला. घड्याळात संध्याकाळचे सव्वासात वाजले आहेत याची खात्री करून घेतली. उड्डाणाला प्रारंभ केला. त्याला आता जवळजवळ बारा तास पुरे होत आले होते. लॉगबुकमध्ये हे सारे त्याने नमूद करून ठेवले. माशी उडाली आणि त्याच्या पेन्सिलीच्या टोकाजवळ आदबीने येऊन बसली.

तिला न हलवताच सेंट जॉन भोवती एक छोटेसे वर्तुळ त्याने काढले. जणू त्याला सुचवायचे होते. इथपर्यंत आम्ही व्यवस्थित आलो. मग तो मनाशी म्हणाला, 'याच्या पुढे विमान कोसळले तर त्यांना निदान येवढं तरी कळून चुकेल की मुख्य भूभाग याने केव्हाच मागे टाकला होता. या खुणेच्या पुढे आपण याचा शोध केला पाहिजे. या वर्तुळाच्या कक्षेत.'

पूर्वेकडे मोहरा करून विमान सेंट जॉन बंदराच्या दिशेने उडत होते—बंदर मागे टाकले की मग पुढे महासागरच...

लिंडबर्गने माशीवर नजर स्थिर करीत म्हटले, 'एकोणिसशे मैल अथांग-अनंत पसरलेला महासागर-अजगरासारखा सुस्त आणि अवाढव्य. हे अंतर ओलांडायला ना पुलाची मदत की ना जहाजाचे साहाय्य! आसऱ्यासाठी पाय टेकवीन म्हटले तर तसूभर बेट-देखील नाही वाटेत कुठं!!' मग तो एकदम मोठ्यांदा ओरडला, 'झाली तुझी तयारी?' माशी त्याच्या मांडीवरून एकदम उडाली, त्याच्या अवतीभवती थोडा वेळ घिरट्या घालीत राहिली आणि मग बाजूच्या खिडकीतून सटकन् बाहेर पडली. तशी गंमत वाटून तो स्वतःशीच एखादया लहान मुलासारखा खुद्कन हसला-झोपेत हसणाऱ्या मुलासारखा-आणि म्हणाला, 'तुला दोष देत नाही काही मी...'

सेंट जॉन हार्बर पार करून विमान आता महासागरावर उडत होते. खाली अटलांटिक महासागर वाहत होता-रात्र पडून दशदिशांत फिकट चांदणे उसळू लागले होते. तो फार खालून विमान चालवीत होता. तीन एकशे फुटांवरून फारतर. पर्वत-प्राय काळ्याभिन्न लाटा—त्यांच्यावरचा पांढरा शुभ्र फेस—क्षणमात्र त्याचे मन भयाने थरकून उठले. त्याचे अंतर्मन त्याला बजावीत होते. 'जरा वर घे विमान उंचावर—सुरक्षित ठिकाणी.' त्याने विमान उंच नेले. मन बडबडत होते, 'काही झाले तर आका-शाच्या आधाराने थोडा वेळ धडपड तरी करता येईल तुला....' मग तो पुन्हा दचकला, पुटपुटला, 'काही झालं तर! काय होणार आहे?....'

खालून एक प्रचंड हिमगिरी वाहत येत होता. अगदी विमान उतरवून त्याच्यावर आरामात मुक्काम करता यावा एवढा प्रशस्त अन् मग एकाएकी त्याला थकल्यासारखे, गळून गेल्यासारखे वाटायला लागले. त्याचे डोळे आता अगदी जड झाले होते. झोपेने पेंगुळल्यासारखे झाले होते. सारे अंग अवघडून गेले होते. बधिर झाले होते. बसल्या जागी त्याने आळोखे पिळोखे देत बधिरपणा घालवायचा प्रयत्न करून पाहिला. पायाला मुंग्या आल्यासारखे वाटले म्हणून जोरजोराने त्याने पाय आपटायला सुरुवात केली. पण असे करून चालण्यासारखे नव्हते—धोकादायक होते—रडारवरचा पायाचा दाब निसटताच विमान गटांगळ्या खाऊ लागले—घाईघाईने त्याने विमान पुन्हा पूर्वस्थितीला आणले. तो खिडकीशी अगदी रेलून बसला. वाऱ्याचा झोत अडविण्यासाठी हातमोजे घातलेला आपला हात त्याने बाहेर काढला. थंडगार हवेने प्रदीर्घ श्वासोच्छ्वास करू लागला. सहज म्हणून त्याचे लक्ष आपल्या हाताकडे गेले. झाडून झटकून त्याने आपला हात घाबरून एकदम आत घेतला.

हातावर बर्फाचा थर जमा झाल्यासारखा झाला होता. म्हणजे विमानाच्या पंखांवरदेखील बर्फाचे थर पसरत चालले आहेत म्हणायचे! विमानाच्या पंखांवर बर्फाचे थर असे पसरू लागले की त्याचे वजन वाढत जाते. उडण्याची शक्ती नष्ट होते आणि अगतिकपणे ते खाली कोसळते—विमानाचा वेग मंदावला आहे हे लिंडबर्गच्या तावडतोब ध्यानात आले. त्याने दांडा खेचून पाहिला,

पण त्याचा काही उपयोग झाला नाही. क्षणाक्षणाला ते खाली खाली घसरत होते. बर्फ झटकून टाकण्यासाठी त्याने एक गिरकी घेतली; वेळीच तसे केले नसते तर विमान खाली कोसळून महासागराच्या कुशीत केव्हाच गडप झाले असते.

बर्फाच्या वादळाचा मारा चुकवीत तो एकदाचा बाहेर उघड्यावर आला. बर्फाच्या आवरणात ते विमान गुरफटलेले. गदगदा विमानाचे पंख हलवले, पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. खाली महासाराच्या पृष्ठभागावर पर्वतप्राय अक्राळ विक्राळ लाटा उसळत होत्या. विमान एकसारखे खालीखाली जात होते. सागर पृष्ठापासून आता ते फार तर दोन एकशे फुटांवर उडत होते. विमान समुद्रास्पृष्यंतु झाल्याखेरीज आता राहत नाही याची त्याला खात्री होऊन चुकली होती. त्या प्रसंगासाठी त्याने मन घट्ट केले....

पण जणू ती वेळ टळावी असे विधिलिखित होते. हवेतल्या उष्णतेने विमानावरच्या बर्फाला भेगा पडून त्याच्या खपल्या आपोआप निसटून गळून पडू लागल्या. त्याने पुन्हा एकदा प्रयत्नपूर्वक विमानाचे पंख गदगदा हलवले आणि बर्फाचे ओझे झुगारून दिले. उसळत्या लाटा आणि त्याचे विमान यात आता फार तर काही फुटांचेच अंतर उरले होते. त्याने दांडा खेचला आणि विमान भराभर वर चढू लागले. सुरक्षित उंचीवरून उड्डाण करणे पुन्हा एकवार त्याला आता शक्य झाले होते. आपले विमान चुकीच्या दिशेने उडत आहे हे क्षणभर त्याच्या ध्यानातच आले नाही. ते ध्यानात येताच त्याने विमानाची दिशा बदलली आणि श्रान्तक्लांत होत जोरजोराने श्वासोच्छ्वास करीत बैठकीतल्या बैठकीत तो कसाबसा रेलून पडला.

पहाट झाली आहे. एकाएकी एंजिनाची घरघर मंद होत चाललेली असते. उताराला लागल्यासारखे विमान आपोआप खाली खाली घसरायला सुरवात झालेली असते. काय घोटाळा झालाय हे क्षणभर त्याचे त्यालाच उमगेनासे होते. घाईघाईने तो सारी यंत्रे तपासून पाहतो आणि मग त्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडतो. डाव्या हाताच्या टाकीतले पेट्रोल संपत आलेले आहे, उजव्या बाजूची टाकी सुरू करायला हवी...पेट्रोलचा पुरवठा व्यवस्थित होऊ लागताच एंजिन जिवात जीव आल्यासारखे होऊन पुन्हा एकवार रोरावू लागते.

तो स्वतःला दोष देतो म्हणतो, 'आळशी होत चाललायस अलीकडे तू.' मग त्याचे दुसरे मन हलकेच पुटपुटते....'मी आळशी कसा? यात माझी काय चूक? पन्नास तासात एक मिनिट झोप नाही. डोक्यात कुणी घणाचे घाव घालावेत तशी ठसठस होतेय. सारं अवघडून गेलंय आणि पुन्हा वर मीच आळशी. खासा न्याय!'

सुकाणूवर कुणाचा ताबाच नसल्यासारखे विमान भरकटू लागते. आत लिंडबर्ग आपल्या जागेवर बसलेला आहे....त्याचा हात दांड्यावर आहे. आणि डोळे मिटलेले....सुदैवाने सुसाट वाऱ्याचा एक जोरदार तडाखा विमानाला जबरदस्त हादरा देऊन जातो आणि लिंडबर्ग खडबडून जागा होतो. त्याला वाटते,' हल्ला करण्यासाठी अंधारात दबा धरून बसलेल्या एखादया डाकिणीप्रमाणे ही झोप आपल्याला बेसावध गाठायला जशी टपली आहे....' तो पाण्याची टाकी उघडतो. तोंडावर पाण्याचे हबके मारतो. अवघडलेले पाय जरा लांब करतो. झोपेचे जोखड झुगारून देण्यासाठी तो जोरजोराने डोके हलवतो. खिशातून थोडा कापूस काढून त्याचे बोळे कानांत घालतो. शिरस्त्राण घट्ट आवळून बांधतो. या कशाचाच काही उपयोग होत नाही. डोळे उघडे ठेवून झोपी गेलेल्या माणसासारखा—त्याची मान कलते. पापण्या मिटेपर्यंत डोळे होकायंत्राकडे एकटक नजरेने पाहातच असतात. पेडलवरचा त्याचा पाय निसटतो. दोन्ही मांड्यांत हात मोकळे सोडून तो गाढ झोपी जातो.

विमान थोडा वेळ आपणच उडत राहते आणि मग वातचक्रात सापडल्यागत जोरजोराने गिरक्या घेऊ लागते. भिरभिरू लागते. खाली कोसळू लागते. एवढ्यात सूर्यप्रकाश आरशावर पडतो आणि त्याचा कवडसा एकसारखा डोळ्यावर येऊ लागल्यामुळे वैमानिक अस्वस्थ होतो. डोळे चोळीत खाडकन जागा होतो. मग एकदम फटीत घुसलेल्या वाऱ्याची, कोसळणाऱ्या विमानाची, घोंगावत वरवर येऊ पहाणाऱ्या महासागराच्या लाटांची त्याला जाणीव होते. तो दांडा वर खेचतो. रडारवर जोराची लाथ हाणतो आणि विमान सरळ होऊन व्यवस्थित उडू लागते. लिंडबर्ग जागा होत नीट सावरून बसतो.

आता आकाश निरभ्र झाले आहे. सागराचे पाणी शांत स्थिर आहे. कसले चैतन्य नाही की कसली हालचाल नाही. दूर नांगरून पडलेले मच्छिमार वाफोर त्याच्या दृष्टीस पडले. त्याने विमान थोडे खालच्या पातळीवर आणले आणि वाफोरात कोणी माणसे असतील ह्या आशेने जोराने ओरडून विचारले, 'आयर्लंड कोठल्या बाजूला आहे?' एका माणसाने तोंड बाहेर काढले आणि खुळ्यासारखा तो विमानाकडे नुसता पाहातच राहिला. लिंडबर्गचा प्रश्न अनुत्तरीतच राहिला. त्याला वाटले वाफोरातल्या माणसाला इंग्रजी येत नसले पाहिजे. आयर्लंड अद्याप खूप दूर असले पाहिजे आणि ते वाफोर स्पॅनिश वा पोर्तुगीज मालकीचे असतील.

महासागराच्या पृष्ठावर डोकावणारी बेटांची एक मालिका त्याच्या डोळ्यांसमोर आली. तो विस्तीर्ण भूभाग, त्यावरचे ते डोंगर हे सारे पाहत तो जवळ जवळ ओरडलाच—म्हणाला, 'काय हे आयर्लंड?'

त्याने दुसरा नकाशा काढला. आयर्लंडचा पश्चिम किनारा शोधून काढला – तिथे ती बेटांची मालिका होती, उपसागर होता, डोंगर होते. संकल्पित वेळेच्या आधी अडीच तास तो तिथे येऊन पोहचला होता. आता पॅरिस म्हणजे फक्त सहा तासांचा रस्ता. आयर्लंड गेले. आयरीश समुद्र दिसेनासा झाला. इंग्लंड – डाव्या क्षितिजाजवळचे धुरांच्या गुरफटलेले लंडन....

एकाएकी त्याला सपाटून भूक लागली. 'पोटाला काही तरी खा—उगाच असं शरीर कष्टवू नकोस—' मोठमोठ्यांदा आरडाओरड करीत तो स्वतःचीच समजूत घालीत होता. 'झालं आता पॅरिस

काही फार दूर नाही. नको उगीच जीव जाळूस– घे काही तरी खाऊन....' त्याने थोडे खाऊन घेतले. विमानाने खाडी ओलांडली तेव्हा तिन्ही सांजा होऊन गेल्या होत्या. शततारकांनी खच्चून भरलेल्या आकाशाप्रमाणे डयूव्हिलेतले दिवे लुकलुकत होते. 'आता फक्त दोन तासात पॅरिस!' हर्षातिशयाने तो चीत्कारला, 'संकल्पित वेळेच्या आधी पाच तास आपण तिथे पोहोचतो आहोत. आपण इतक्या लवकर पोहचू अशी लोकांना कल्पना तरी असेल का? विमानतळावर आपणाला कोणी ओळखील का?

पॅरिस—पॅरिसच्या आकाशात आता त्याचे विमान घिरट्या घालीत होते. प्रकाशात न्हालेला बुलेव्हार्ड, गगनचुंबी एफिल टॉवर, चंद्रप्रकाशात थयथयलेली नागमोडी सीन....

खाली ले-बुर्गेट विमानतळ दिसत होता. विमानतळावरचे प्रखर प्रकाशझोत. आकाशात लिंडबर्गचे विमान चाचपडत होते. प्रकाशझोताचे बोट धरून त्याने विमान उतरवण्यास सुरुवात केली. त्याचे स्वागत करण्यासाठी विमानतळावर जमलेले, त्याचे विमान आकाशात दिसताच हर्षातिशयाने बेहोष झालेले हजारो स्त्रीपुरुष– सारे देहभान विसरून मोठमोठ्यांदा ओरडू लागले. त्याने विमान सुरक्षित खाली आणावे म्हणून आपापल्यापरी सूचना करू लागले.

त्याचे अंग ठणकत होते. थरथर कापत होते. डोळे पुन्हा पुन्हा पाणावत होते. त्याने झरोक्यातून वर आकाशाकडे पाहिले आणि म्हटले, 'देवा, सोडव आता यातून निर्विघ्नपणे....'

विमानाच्या चाकांनी धावरस्त्याला अल्लाद स्पर्श केला. छाया प्रकाशाचे पट्टे ओलांडीत ते स्थिर झाले. पंखाची गती कमी होत होत तो फिरायचा अजिबात थांबला. सारी बंधने वाऱ्यावर झुगारून देऊन लोक त्याच्या विमानाकडे धावत सुटले, गलितगात्र लिंडबर्गला त्यांनी उचलून खांद्यावर घेतले आणि मिरवत मिरवत पुढे आणले.

न्यूयॉर्क ते पॅरिस! सबंध मानवाच्या इतिहासात घेतलेली ही पहिली प्रचंड झेप! विमान वाहतुकीने आज जग खूप जवळ आले आहे. माणसे जवळ आली आहेत. जागतिक सहकार्याचे व सांस्कृतिक देवाणघेवाणीचे नवे पर्व सुरू झाले आहे. चार्लस ऑगस्टस लिंडबर्गने अटलांटिकवरून केलेल्या उड्डाणाला याचे पहिले श्रेय आहे आणि म्हणून लिंडबर्ग अमर आहे.







रामायणातील एक अपरिचित गोष्ट

# ऋषी आणि तलवार

: अरविंद मंगरूळकर :

राम, लक्ष्मण आणि सीता ही तिघे वनवासात प्रवासास निघाली असताना सीतेने रामाला एकदा एक मार्मिक गोष्ट सांगितली. वाल्मीकी रामायणाच्या अरण्यकांडात ही गोष्ट आलेली आहे.

एखाद्याशी शत्रुत्व नसताना त्याची हिंसा करणे हे एक महापातक आहे आणि रामाच्या सच्छील वर्तनाबद्दल खात्री असूनसुद्धा अरण्यातील आयुष्यक्रमात अनवधानाने हे पातक रामाच्या हातून घडू नये अशी सीतेला तळमळ लागून राहिलेली आहे. रामाला ती म्हणते, "दंडकारण्यातल्या ऋषींच्या रक्षणासाठी असे पातक करण्याची वेळ तुम्हावर येईल की काय कोण जाणे! अगोदरच तू क्षत्रिय आहेस. युद्ध करण्याचे उत्तम शिक्षणही तू आणि लक्ष्मणाने घेतले आहे. तुम्हा दोघांच्या हातांत धनुष्यबाण आहेत, तलवारीही आहेत. हिंसा करण्याला हे सर्व वातावरण किती अनुकूल आहे! तुम्ही आता अग्नीसारखेच आहा. अग्नी कितीही लहान असला, तरी त्याच्या जवळ जर सरपण असेल; तर तो आपला प्रताप दाखविल्यावाचून राहील काय? तो त्या सरपणाला जाळणार आणि स्वतःही भडकणार! म्हणून अशा वेळी माणसाने फार बारीक विचार केला पाहिजे. वरवर पाहता साध्या-सरळ दिसणाऱ्या गोष्टीदेखील अशा वेळी माणसाच्या अधःपाताला कारणीभूत होतात. ह्या बाबतीत मला एका ऋषीच्या अधःपाताची एक गोष्ट माहीत आहे, ती मी तुला सांगते."—असे म्हणून सीतेने रामाला एक गोष्ट सांगितली ती अशी—

एका अरण्यात एक ऋषी राहत होता. तो ऋषी मनाने इतका सात्त्विक आणि उदार होता की, कधीही, कोणाचीही हिंसा करण्याचा विचारदेखील त्याच्या मनात येत नसे. तपश्चर्येमध्ये आणि धार्मिक क्रियांमध्ये तो नेहमी गढलेला असायचा. सकाळपासून संध्याकाळपर्यंत. परोपकारामध्ये तर तो सतत गुंतलेला असायचा. माणसांवर तर तो उपकार करायचाच; पण पाखरांना, पशूंना आणि हिंस्र श्वापदांनादेखील तो खाऊ-पिऊ घालायचा. त्यांना कुरवाळायचा, त्यांच्याशी बोलायचा, त्यांना आपले कुटुंबीय मानायचा. त्यामुळे तेही मोठ्या गुण्यागोविंदाने त्या ऋषीच्या रम्य आश्रमात यायचे आणि क्रीडा करायचे, नाचायचे, बागडायचे. ऋषीच्या प्रभावामुळे ज्यांचे एकमेकांशी हाडवैर, असे प्राणी, पक्षीदेखील आनंदाने

तेथे एकत्र बागडायचे. त्याच्या आश्रमात वाघिणीच्या अंगावर हरिणीची पिले प्यायची ! कडक उन्हाने त्रासला, म्हणजे साप भराभरा मोराच्या सुंदर पिसाऱ्याच्या गार सावलीखाली विसाव्याला जायचा ! साप मुंगुसाला पोटाखाली गुदगुल्या करायचा ! उंदीर मांजराच्या पाठीवर बसून मजेत फेरफटका करायला निघायचा ! ससा आणि कुत्रा गमतीने एकमेकांशी पळापळ खेळायचे आणि हरिणे आपल्या नाजूक शिंगांनी सिंहाची दाट आयाळ खाजवायची ! कुणी कुणाला भ्यायचे नाही; कुणी कुणाला रागवायचे नाही.

कालांतराने ऋषीची ही तपश्चर्या, परोपकार आणि थोर प्रभाव इतका वाढला की, सर्वजण त्याचे गोडवे गाऊ लागले; त्याला आदर्श महात्मा मानू लागले; त्याला सर्वांत श्रेष्ठ समजू लागले.

अशा रीतीने तो ऋषी पृथ्वीवरचा देवच बनला. इतकेच काय, पण देवांपेक्षाही त्याचा महिमा मोठा झाला.

—आता देवांना त्याचा हेवा वाटू लागला, मत्सर वाटू लागला. ते त्याचा द्वेष करू लागले. दातओठ खात ते म्हणू लागले, "हा कोण आमच्याएवढा ? आमच्यापेक्षाही श्रेष्ठ ? आम्हांला आता कोण विचारणार ? आम्ही देव असूनही आता या मनुष्यापुढे फिके पडणार !" देव मग इंद्राकडे गेले आणि त्यांनी आपल्याला ऋषीच्या ह्या संकटातून वाचविण्याची त्याला विनंती केली. इंन्द्राला ही बातमी अगोदरच लागली होती. तोही मनातल्या मनात



अस्वस्थच झालेला होता. आता देव त्याच्याकडे तीच तक्रार घेऊन आल्यावर त्याने मनाशी निर्धार केला की, ह्या ऋषीचा काटा काढायचा. पण त्याला काय करावे ते सुचेना त्याने त्याच्या तपश्चर्येचा भंग करण्यासाठी आणि त्याला मोह घालण्यासाठी अप्सरा पाठविल्या. पण त्या अप्सरांचे त्याने इतके उत्कृष्ट स्वागत केले, की त्या शरमूनच गेल्या. आश्रमातले शान्त-सुंदर वातावरण, ऋषीचा गोड-परोपकारी स्वभाव आणि हाडवैरी प्राणिमात्रांचे खेळीमेळीचे वर्तन हे पाहून त्या इतक्या मोहीत झाल्या की, त्या तेथेच रमल्या. त्याला मोह घालण्याऐवजी त्याच तेथे मोहीत झाल्यात ! त्यांना वाटू लागले की, 'स्वर्गापेक्षा हा आश्रमच चांगला आहे की ! येथे कुणाची ताबेदारी नाही, की कोणी कोणाचा मालक नाही. स्वर्गात काय आहे ? हा आश्रम तर स्वर्गापेक्षाही चांगला आहे ! प्रत्येकाने आपापले काम करावे आणि ह्या उत्कृष्ट वातावरणात आनंदाने राहावे !' झाले ! अप्सरा तेथेच रमल्या आणि कामे करीत आनंदाने राहू लागल्या.

पण इन्द्र यामुळे फारच काळजीत पडला !

मग इन्द्राने एक युक्ती केली. अगदी साधी आणि सोपी ! तो स्वतः च उठला.

इन्द्राने एका शिकाऱ्याचा वेष धारण केला. अंगावर पक्ष्यांची पिसे आणि डोक्याला मोरपिसे खोचली. गळ्यात लाल-लाल गुंजांच्या माळा घातल्या आणि मनगटांत रानफुलांचे गजरे घातले. हातात त्याने एक सुंदर तलवार घेतली आणि तो ऋषीकडे आला. ऋषीने शिकारी पाहुण्याचे आनंदाने स्वागत केले. इंद्र त्याला म्हणाला,

"महाराज, मी एक गरीब शिकारी आहे. माझे आपल्याकडे एक लहान काम आहे. आपण ते कराल काय ?"

ऋषी म्हणाले, जरूर करीन. सांग काय ते. पण त्यापूर्वी आधी तू विश्रांती घे. काही फलाहार कर. दूध पी आणि मग सांग आपले काम."

इंद्राला वाटले, की हा ऋषी आपले आगत-स्वागत करून आणि खायला-प्यायला घालून आपल्याला मोह घालणार. मग आपण आपले कर्तव्य विसरून जाऊ. म्हणून तो लगबगीने म्हणाला, "महाराज, नको—नको. आपली फार कृपा आहे. पण मला येथे जवळच माझ्या बहिणीला भेटायला जायचे आहे. उशीर झाला, तर ती निघून जाईल आणि तिची-माझी भेट होणार नाही."

ऋषीने त्याला खूप आग्रह केला. पण तो शिकारी ऐकेना. तेव्हा तो त्याला म्हणाला, "पण जाण्यापूर्वी तू हे दहा आंबे घेऊन जा. जाताना वाटेत तू ते खा आणि उरलेले आपल्या बहिणीला दे आणि तिला घेऊन तू मग पुन्हा येथे ये."

इंद्राने कसेबसे ते आंबे घेतले आणि तो म्हणाला, "महाराज, ही तलवार आणि हे आंबे—सर्व काही मला एकाच वेळी नेता येणार नाही. तेव्हा ही माझी तलवार माझी ठेव म्हणून तुमच्या-पाशीच राहू द्या. मी बहिणीला घेऊन परत येईन, त्यावेळी ही तलवार घेऊन जाईन. माझ्यावर कृपा करा."

ऋषीने त्याला आशीर्वाद दिला आणि ती तलवार दूर कोपऱ्यात एके ठिकाणी ठेवायला सांगितली. पण इंद्राने मुद्दामच ती त्याला सहज दिसेल आणि सापडेल अशा जागी ठेवून दिली आणि तो निघून गेला—कायमचाच! कुठली थट्टीण आणि कुठले काय!

इकडे ऋषी वाट पाहू लागला. एक दिवस झाला, दोन झाले, तीन, चार....पण शिकाऱ्याचा पत्ता नाही. आजपर्यंत त्याला ठेव संभाळायला अशी कुणीच दिली नव्हती आणि तलवारीसारखी ठेव तर कुणीच दिली नव्हती. आता ऋषी ती तलवार संभाळू लागला. रोजच्या तपश्चर्येबरोबर त्याच्या मनात आता तलवार संभाळण्याचाही विचार येऊ लागला. कारण त्याने आपण होऊन पत्करलेले ते काम होते. शिकाऱ्याची तलवार तो उगीचच हातात उचलून घेऊन कुतूहलाने पाहू लागला. इंद्राने त्याच्यावर आपला विश्वास टाकला होता; त्यामुळे तो ऋषी तलवारीला आता विसंबेना. तो ती सतत जवळ बाळगू लागला. तपश्चर्या आणि तलवारीचा सांभाळ या दोन टोकांमध्ये त्याचे मन हेलकावू लागले. आश्रमाबाहेर कंदमुळे आणण्यासाठी जायचे झाले म्हणजेदेखील ती तलवार बरोबर घेऊनच तो जाऊ लागला. तलवार जवळ बाळगण्याची त्याला सवयच झाली. तपश्चर्येच्याही वेळी ती जवळ ठेवू लागला. तपश्चर्येच्या बरोबरीने त्याला तलवारीचे महत्त्व वाटू लागले.

हळूहळू त्याला ती तलवार आवडू लागली—तपश्चर्येइतकीच.

एके दिवशी ती तलवार उघडून पाहावी असे त्याला वाटले. कारण आजवर त्याने नागवी अशी तलवार कधीच पाहिली नव्हती. त्याने ती उपसायला सुरुवात केली. पण ती गच्च बसली होती. म्हणून जोर लावून त्याने ती उपसली. तेव्हा ती खस्सकन बाहेर आली आणि विजेसारखी झळकन् चमकली. त्यासरशी त्याच्याजवळचे प्राणी—ससे, हरिणे, मुंगुस, कुत्रे, मोर, इतकेच काय; वाघ-सिंहदेखील—एकदम दचकले आणि ते लांब जाऊन उभे राहिले. ऋषीकडे घाबरून थरथरत पाहू लागले. त्यांच्या डोळ्यांतला तो घाबरा भाव ऋषीने आयुष्यात प्रथमच पाहिला. त्यामुळे त्याला त्यांची गम्मत वाटली. तो मोठ्याने 'खो-खो' करून हसू लागला. तेव्हा तर ते आणखीच घाबरले. कारण त्यांनी त्याचे असले विकट रूप कधीच पाहिले नव्हते. एकाएकी त्याने ती नग्न तलवार उगारली. तेव्हा तर ते सारे प्राणी फारच भयभीत झाले आणि झाडांआड दडून बसले. त्यासरशी तो 'हाः—हाः—हाः—' करून हसू लागला, खिदळू लागला.

ऋषीने ती तलवार बारकाईने पाहिली. ती आकाशासारखी निळी, साफ आणि निर्मळ होती. तिच्या त्या तळपत्या पात्यात त्याचे तोंड, जटा स्वच्छ दिसत होत्या आणि लांब उभे असलेले भयभीत ससे, हरिणे, वाघ-सिंह हेही दिसत होते. उन्हाने ती तलवार झळझळीत, धारदार दिसू लागली. जवळच्याच एका वेलीवर त्याने ती चालविली. लगेच ती वेल त्या तलवारीच्या धारेने सपकन् कापली जाऊन खाली पडली. तिच्या अंगा-खांद्यावरची फुले जमिनीवर विखुरली. जणू वेलीने फुलांच्या



रूपाने अश्रूच ढाळले! ऋषीला मौज वाटली. मग एका लहानशा झाडावर त्याने ती मारली. ते झाडही खाली पडले आणि त्यावरची फळे धुळीत पडली. त्या झाडाखाली एक ससाही सापडला आणि मरून पडला.

हे पाहिल्यावर मात्र भोवतालचे प्राणी, पाखरे—सारी रानावनात पळून गेली; पुन्हा कधीही त्या ऋषीच्या आश्रमात आली नाहीत. त्यांचा विश्वासच उडाला. विश्वासाची जागा भीतीने घेतली. ऋषीच्या डोक्यावरच्या ज्या जटांमध्ये पाखरांची लहानगी पिले आरामाने बसून आईच्या तोंडचा घास खात होती, त्या जटा आता ऋषीने तलवारीने कापून टाकल्या. तेव्हा त्याला हलके वाटले. त्या दिवसापासून तो ती नागवी तलवार हातात घेऊन रानावनात झाडेझुडपे कापीत इकडेतिकडे फिरू लागला. कधी एखादा ससाच मार, हरिणच काप, सापाची खांडोळी कर—अशा प्रकारे एकेकाळी सर्व जीवमात्रांना आसरा देणारा ऋषी यथेच्छ हिंसा करीत राक्षस होऊन हिंडू लागला. एकेकाळी प्राणिमात्रांनी गजबजलेला त्याचा सुन्दर आश्रम रिकामा आणि उजाड झाला. माणसेसुद्धा त्याच्याकडे येईनातशी झालीत, मग पशुपक्षी कोठले यायला?

ऋषी एकटाच राहू लागला! एकटा! अगदीच एकटा!


*कोणताही पत्रव्यवहार करताना वर्गणीदाराने आपला वर्गणीदार क्रमांक अवश्य कळवावा.*



# दादोबा पांडुरंग तर्खडकर

(१८१४–१८८२)

: प्रा. वि. ह. कुळकर्णी :

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचा उल्लेख ते एक प्रसिद्ध व्याकरणकार होते म्हणून नेहमी करण्यात येतो. त्यांनी मराठी भाषेच्या व्याकरणावर मोठा ग्रंथ लिहिला. हाच मराठीतील पहिला व्याकरण-ग्रंथ. संस्कृत भाषेचा आद्य व्याकरणकार पाणिनि. म्हणून दादोबांना मराठीचे पाणिनि म्हणण्यात येते. दादोबांचा हा बडा ग्रंथ समजण्यास काहीसा दुर्बोध म्हणून त्यांनी मग लघु व्याकरण लिहिले. तेच त्यावेळी शाळेत लावण्यात येत असे. व्याकरण हा शास्त्रीय, रूक्ष विषय. केवळ हौसेखातर असल्या विषयांवरील ग्रंथ कोणी वाचीत नाही.

परंतु दादोबांनी लिहिलेले आत्मचरित्र, पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यात आले आहे. ते इतके रसाळ, चटकदार आणि विविध माहितीने भरलेले आहे की वाचण्यास घेतले की खाली ठेववत नाही. हे आत्मचरित्र प्रथम प्रकाशात कसे आले याची हकीगतही मोठी गमतीदार आहे. दादोबांनी आत्मचरित्र लिहिले आहे ही गोष्ट मराठी संत व पंडित कवींचे गाढे अभ्यासक व समीक्षक लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनी प्रथम १९१५ मध्ये जाहीर केली. १८९५ च्या सुमारास पांगारकर पुणे येथे विद्यार्थीदशेत असताना त्या वेळचे सुविख्यात लेखक शंकर पांडुरंग पंडित यांच्या दोन मुलांना त्यांच्या घरी शिकवायला जात असत. पांगारकर लिहितात—"पंडितांच्या निवडक ग्रंथांचा संग्रह मला तेथे पाहावयास मिळाली. तो चाळीत असताना त्यात एक भले मोठे हस्तलिखिताचे बाड सापडले. ते दादोबा पांडुरंगांचे आत्मचरित्र होते. ते मी समग्र चाळून पाहिले. मला ते महत्त्वाचे व मनोरंजक वाटले. इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर मुंबईत जे पहिले पाच विद्यार्थी शिकू लागले त्यांपैकी दादोबा पांडुरंग तर्खडकर हे एक होत. पेन्शन घेतल्यावर पडल्या पडल्या त्यांनी आपले चरित्र आठवले तसे तोंडाने सांगितले व त्यांच्या मुलीने ते लिहून घेतले. १८२० पासून १८७० पर्यंतचा महाराष्ट्र समाजाचा, महाराष्ट्रीय विद्वानांचा, मराठी गद्याच्या वाढत्या काळाचा मनोरंजक इतिहास या आत्मचरित्रावरून चांगल्या प्रकारे कळन येतो. चरित्र सोप्या, सरळ व घराऊ मराठी भाषेत लिहिले आहे. पंडितांच्या ग्रंथालयात हे दादोबांच्या आत्मचरित्राचे हस्तलिखित पाहाताच त्याची नक्कल तरी आपल्याजवळ असावी असे मला वाटले. मी एक हिकमत केली. माधव व वामन या मुलांना सांगून मी ते बाड आपल्या बिऱ्हाडी आणवले, उसवले व सात-आठ विद्यार्थी बोलावून त्याची सुटी पृष्ठे एकेकाला देऊन त्या सगळ्या बाडाची एका दिवसात नक्कल करून घेतली व बाड पूर्ववत् बांधून दुसऱ्या दिवशी जागच्या जागी नेऊन ठेवले! मी ते मागितले असते तर मला मिळाले नसते असे नाही. पण कदाचित नकार मिळाल्यास एवढी उपयुक्त माहिती आपणाकडून जाईल अशा भीतीने मी हे काम केले. हे कार्य गैर आहे असे माझ्या मनाला वाटले. पण अपत्य प्रेमाप्रमाणे वाङ्मयप्रेमही आंधळे असते! सज्जन याबद्दल मला क्षमा करतील अशी आशा आहे."

दादोबांचे हे आत्मचरित्र अपूर्ण होते. उतार वयातील आजारपणामुळे त्यांना हे आपल्या मुलीस शेवटपर्यंत तोंडी सांगता आले नाही. तरी तिने जे लिहून घेतले होते त्यात त्यांनी आपल्या सवडीनुसार स्वतःच्या हाताने काही दुरुस्त्या केल्या व काही नवीन मजकूरही घातला. प्रसिद्ध संशोधक अ. का. प्रियोळकर यांनी ते संपादित करून व दादोबांचे उर्वरित चरित्र लिहून ते अनेक टीपा वगैरे देऊन पुस्तकरुपाने प्रसिद्ध केले आहे.

हे पुस्तक वाचले म्हणजे दादोबा यांचे जीवन, त्यांचे घराणे, त्यांनी केलेली नोकरी, नोकरीनिमित्त त्यांनी ठिकठिकाणी केलेला प्रवास आणि त्यांनी केलेली एकंदर कामगिरी यांचा साद्यंत इतिहास वाचावयास मिळतो. दादोबांचे शिक्षण पुरे झाल्यानंतर ते



## स्मृतीस अभिवादन

दि० २ ऑक्टोबर हा गांधीजींचा जन्मदिन. भारत स्वतंत्र व्हावा आणि धर्म, जाती, वंश यांसारख्या भेदांपासून अलिप्त असलेली लोकशाही या देशात सुरू व्हावी म्हणून गांधीजी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत झगडत राहिले, एवढेच नव्हे तर या थोर कार्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची आहुती पण दिली. देशासाठी, देशातील दलित जनतेसाठी स्वतःचे प्राण अर्पण करणारे जगाच्या इतिहासात जे थोर हुतात्मे होऊन गेले त्यांच्या मालिकेत गांधीजी अशा रीतीने जाऊन बसले. सत्य, प्रेम, अहिंसा, शांतता व बंधुभाव या तत्त्वांची त्यांची शिकवण ही केवळ भारतातीलच नव्हे तर सबंध जगातील लोकांसाठी होती आणि म्हणून गांधीजी हे अखिल मानवजातीचे नेते झाले. त्यांच्या चारित्र्या-पासून व शिकवणीपासून स्फूर्ती घेऊन लोकांची सेवा करणारे कार्यकर्ते आज जगाच्या सर्व भागांत आहेत.

राजकारण व समाजकारण करीत असता गांधीजी मुलांना कधी विसरले नाहीत. मुलां-बरोबर ते खेळत, हसत-खिदळत. मुलांत मूल होत. कारण ज्या निःस्वार्थ निरागस प्रेमाची त्यांनी जगाला शिकवणूक दिली त्याचा खरा आढळ त्यांना मुलांतच होई. गांधीजी मानव-जातीचे होते, देशाचे होते, पददलित जनतेचे होते तसेच ते मुलांचेही होते. आणि म्हणून गांधी जयंतीस मुलांनी त्यांच्या स्मृतीस अभिवादन करावे आणि माणसामाणसांमध्ये प्रेम व

प्रथम असिस्टंट शिक्षक, पुढे मुख्य शिक्षक, नंतर सुपरिंटेंडेंट असे क्रमाक्रमाने डेप्युटी कलेक्टरच्या हुद्द्यापर्यंत चढले आणि वयाच्या ४८ साव्या वर्षीच सरकारी नोकरीला वैतागाने रामराम ठोकून त्यांनी पेन्शन घेतले. कलेक्टर म्हणून काम करीत असताना अहमदनगर येथील कोळी लोकांचे बंड मोडून काढल्याबद्दल सरकारकडून त्यांना रावबहादुर हा किताब मिळाला.

दादोबांचे मूळ घराणे वसई जवळ तरखड नावाचे लहानसे खेडे आहे, तिथले. तेथे त्यांचे दुकान होते. जातीने वैश्यवाणी. दादोबांचे आजोबा रोजगाराच्या निमित्ताने सहकुटुंब मुंबईस येऊन स्थायिक झाले. दादोबांच्या वडिलांचा गरिबीचा संसार त्यांनी आपल्या कर्तबगारीने नावारूपास आणला आणि खेतवाडीत स्वतःचे लहानसे घरही विकत घेतले. खेतवाडीस त्यावेळी शेतवळी म्हणत. कारण त्या जागी भंडारी लोक शेती करीत असत. पुढे पारशी लोकांनी तेथे बंगले बांधले व या भागाला त्यांच्या भाषेप्रमाणे खेतवाडी हे नाव पडले व तिला शहरी स्वरूप प्राप्त झाले.

दादोबांचे वडील फार भाविक होते. देवळात पुराणे, कीर्तने ऐकण्याचा त्यांचा परिपाठ असे. सकाळी भूपाळ्या म्हणत आणि रात्रीच्या वेळी घरात हरिविजय, भक्तिविजय, दासबोध यांतील एक एक अध्याय वाचून नंतर हातांत चिपळ्या घेऊन ते एक तासपर्यंत भजन करीत. दादोबांनीही पुढे अभंग वगैरे धर्तीची बरीच काव्यरचना केली ती लहानपणच्या या संस्कारांमुळेच. नंतर शाळेत वामनपंडित, मोरोपंत यांच्या कवितावाचनामुळे त्यांना मराठीची गोडी लागली. मोरोपंतांच्या केकावली या काव्यावर त्यांनी 'यशोदा-पांडुरंगी' या नावाने अर्थ विवरणात्मक पांडित्यपूर्ण असा ग्रंथ लिहिला. यशोदा आणि पांडुरंग ही दादोबांच्या आईवडिलांची नावे. या ग्रंथाला त्यांनी जी प्रस्तावना लिहिली आहे ती वाचली म्हणजे दादोबा मराठी किती सफाईदार, लालित्यपूर्ण लिहीत असत त्याचे प्रत्यंतर पाहावयास मिळते. आपले आत्मचरित्र त्यांनी तोंडी सांगितले त्यामुळे त्यातील भाषा त्यावेळी मराठी जसे बोलत त्या धाटणीची झाली आहे. त्यावेळचे लेखनसुद्धा सामान्यपणे याच पद्धतीने करण्यात येई. अगदीच बाळबोध वळणाचे आहे. आपणास मराठी भाषेचे शिवाजी म्हणणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या 'निबंधमाले'तील लेखांनी मराठी भाषेला सौंदर्य आणि सामर्थ्य प्राप्त करून दिले व लोकांच्या अंतःकरणात देशाभिमानाची ज्योत जागृत आणि प्रज्वलित केली. आधुनिक मराठी गद्यवाङ्मयाची सुरुवात चिपळूणकरांच्या निबंधमालेपासून झाली असे त्यामुळेच म्हणण्यात येते.

दादोबांच्या वडिलांना एकूण पंधरा मुले झाली. त्यांतील नऊ लहानपणीच निवर्तली. उरलेल्या सहा मुलांमध्ये दादोबा हेच सर्वांत ज्येष्ठ. 'भाषांतर पाठमाला'चे कर्ते हे दादोबांचे पुतणे. दादोबा यांच्या वयाच्या तीन ते सहा वर्षांपर्यंत चार शाळा झाल्या. त्यांच्या मराठी इंग्रजी शिक्षणाच्या शाळा, शिक्षक व त्यांची शिक्षण देण्याची पद्धत ही त्यांच्या आत्मचरित्रातून मुळातच वाचली पाहिजे इतकी गमतीची आणि उद्बोधक आहे. बाराखडी शिकविण्याची त्या वेळची रीत अशी—"क काना दिले का, ऱ्हस्व्यात कि, दीर्घात की, ऱ्हस्व्यात कु, दीर्घात कू, एकमात्र के, दुमात्र कै, कानामात्रा को, दुमात्र काना कौ, माथा दिले कं, देवा दिले कः." सुरुवातीला इंग्रजी शिक्षणाबाबत लोक म्हणत—आमच्या मुलांस शिकविण्याचे सरकारास इतके काय अगत्य आहे? तेव्हा या धूर्त इंग्रज सरकारचा यात काही तरी मतलब असावा, आमच्या मुलांस हुशार करून त्यांस पुढे बाटवावे, असा सर्वांचा तर्क धावत होता. दादोबांच्या वडिलांसही हा संशय होता, पण तो दूर झाला. त्या वेळच्या बहुतेक शाळा सरकारी गोरे लोक आणि ब्रिटिश व अमेरिकन मिशनरी लोक चालवीत. मिशनरी शिक्षक हुशार विद्यार्थ्यांना बायबलची मराठी भाषांतरांची पुस्तके म्हणून देत. फिशर नावाचा एक मास्तर होता तो आपल्या पदरचा रुपया मोडून कोणी मुलाने चांगले वाचले किंवा शब्द शुद्ध रीतीने लिहिले तर त्यास एक आण्यापासून चार आणेपर्यंत बक्षीस देई. दादोबांस असे दोन आणे बक्षीस मिळाले होते. हेच त्यांना मिळालेले पहिले बक्षीस. अशी मोठमोठी बक्षिसे त्यांस पुढे मिळाली. शाळेत त्यावेळी मराठे, कोळी, कुळंबी, भंडारी, वैश्य, क्षत्रिय, ब्राम्हण, गुजराती, पारशी, मुसलमान वगैरे सर्व जातींची मुले असत. दादोबांस लहानपणापासूनच विद्यार्जनाची मोठी हौस. त्यांच्या वर्गात एक मुसलमान विद्यार्थी होता, त्याच्यापासून ते फारशी शिकले. पुढील आयुष्यात त्यांना मराठी, इंग्रजीप्रमाणे, गुजराती, हिंदी, कानडी, तेलुगू, मल्याळी, फारशी इतक्या भाषा चांगल्या बोलता येत होत्या. त्यावेळचे बहुतेक युरोपियन शिक्षकही मराठी चांगले बोलत.

दादोबांच्या वेळी मुंबई हे शहर पाचसहा बेटांचे मिळून बनले होते. शहरात एका ठिकाणाहून दुसरीकडे जाताना कित्येक ठिकाणी गुडघाभर पाणी असलेल्या खाडीतून चालत जावे लागे. दादोबा यांस एका इंग्रज अधिकाऱ्याला मराठी शिकवण्याकरिता कुलाब्याची दांडी येथे जावे लागत असे. ओहोटीच्यावेळी ते खाडीतून चालत जात. परंतु भरतीच्यावेळी त्यांस होडीतून जावे लागे. त्या वेळी आजच्याप्रमाणे प्रवासाची चांगली साधने नव्हती. वसईहून मुंबईला यायला दोन दिवस लागत. लांबचा प्रवास बैलगाडीतून करावा लागे. दादोबा एकदा औषधोपचारासाठी आपल्या आईबरोबर १८३१ साली भिवंडी-शहापूर नजीकच्या खरडी या गावी गेले होते. तेथे पोचण्यास त्यांना सात आठ दिवस लागले. १८७१ साली आगगाडीने हा प्रवास तेव्हा दोन तासांचा होता. खरडीस ज्या घरी ते उतरले होते तो परभू होता. या गृहस्थाने तेथील चोराशी संगनमत करून या आपल्या घरावर रात्री दरवडा घालण्याची हिकमत केली. त्यांच्या तावडीतून ही दोन मायलेकरे जिवानिशी कशी सुटली, त्याची हकीगत कादंबरीतच शोभेल अशी भयंकर व अद्‌भुत आहे.

सरकारी खात्यात नोकरी करीत असता एका युरोपियन अधिकाऱ्याने दादोबा यांस दूर माळव्यात एक मुसलमान नबाब होता,

त्याच्या मुलास इंग्रजी शिकविण्यास जाण्याची शिफारस केली. इतक्या लांबच्या परप्रांतात जाण्यास घरातील मंडळींनी विरोध केला. परंतु दादोबांनी मनाचा हिय्या करून तेथे जाण्याचे ठरविले आणि ते नाशिक, चांदवड, मालेगाव, धुळे, महेश्वर, महू, इंदूर, उज्जयनी, रतलाम या मार्गाने बैलगाडीतून मजल दरमजल करीत नबाबाच्या जावरे या शहरी पोचले. दादोबांचा तेथील वास्तव्यातील एकंदर थाट मोठा ऐषआरामाचा व दरबारी पद्धतीचा होता. तेथे ते घोड्यावर बसण्यास शिकले. चार घोड्यांच्या गाडीत बसण्याचा व हत्तीवरून जाण्याचा अनुभवही त्यांना तेथे घ्यावयास मिळाला. दादोबांना फारशी भाषा बोलता येते हे कळल्यावर खुद्द नबाबाची मर्जी त्यांच्यावर विशेषच बसली. परंतु लवकरच त्यांच्या मुलाची शादी करण्यात आल्यामुळे त्याचे लक्ष शिक्षणातून उडाले व दादोबा त्यांच्या युरोपियन वरिष्ठांच्या सल्ल्यानुसार तेथील शिकवणी सोडून बडोद्यास गेले. तेथे खुद्द सयाजीमहाराज गायकवाड यांनी दादोबांस दरबारात नोकरी देऊ केली. परंतु तेथील अधिकारी लोकांच्या वागण्यातील एकंदर चमत्कारिक वृत्ती पाहून दादोबा तेथील नोकरी न स्वीकारता मुंबईस परत आले. दरम्यान त्यांच्या वडिलांचा मृत्यू घडून आला होता आणि ज्येष्ठ मुलगा म्हणून त्यांच्या अंगावर साऱ्या घराच्या संसाराची जबाबदारी पडली. आधीच्या सरकारी खात्यात ठिकठिकाणी व वेगवेगळ्या हुद्द्यांवर त्यांनी केलेल्या कामगिरीची या लेखात माहिती देण्यात काही स्वारस्य नाही. सुरुवातीचे त्यांचे वरिष्ठ अधिकारी चांगले मनमिळाऊ होते. परंतु नंतरचा एक युरोपियन अधिकारी उर्मट निघाल्यामुळे दादोबा वैतागून गेले व त्यांनी नोकरीच सोडून दिली व पेन्शन घेतले.

दादोबांची प्रवृत्ती मुळात हिंदुपरंपरेप्रमाणे मोठी धार्मिक होती. वडिलांनी त्यांच्यावर केलेले संस्कारही भाविक हिंदूंचेच होते. परंतु हिंदुधर्मातील आचारविचार, मूर्तिपूजा, जातिभेदापायी त्यांना आलेले कटु अनुभव इत्यादी कारणांमुळे पारंपरिक हिंदुधर्मावरील त्यांची श्रद्धा उडाली. शाळेत असल्यापासून मिशनरी लोकांच्या शिकवणीमुळे व बायबलच्या वाचनामुळे त्यांचा ओढा ख्रिश्चन धर्माकडे वळला. परंतु प्रत्यक्ष ख्रिश्चन धर्म न स्वीकारता त्यांनी १८४०-४२ च्या सुमारास ख्रिश्चन धर्माच्या पद्धतीवर एक नवीन धर्मपंथ काढला, तो परमहंस सभा या नावाने प्रसिद्ध होता. सर्व जातीचे सुधारक मनोवृत्तीचे लोक या पंथाचे सभासद झाले होते. परंतु या पंथाची दीक्षा घेण्याची पद्धत पाव खाऊन व अर्ध्य सोडून शपथ घेण्याची, म्हणजे ख्रिश्चन पद्धतीची होती. सनातनी लोक आपणाला वाळीत टाकतील म्हणून या पंथाच्या सभा गुप्तपणे होत. भांडारकर वगैरे लोक या पंथाचे सभासद होते. परंतु या पंथाचा बाहेर बभ्रा झाला आणि ही परमहंस सभा तीन-चार वर्षांत मोडली व त्यातूनच प्रार्थनासमाज निघाला. हा मात्र अजून अस्तित्वात आहे. दादोबांच्या धार्मिक परिवर्तनाचा इतिहास हा असा आहे.

परंतु इंग्रजांच्या सरकारी नोकरीत अनेक वर्षे राहूनही त्यांचे मत पुढे पुढे इंग्रजी राजवटीसंबंधी अत्यंत प्रतिकूल झाले. आपल्या एका निबंधात ते म्हणतात—"इंग्रज लोक यांनी हिंदुस्थानावर काय उपकार केले हे पाहू गेलो असता मला एकही आढळत नाही.... इंग्रजी राज्य हा हिंदुस्थानाच्या नशिबाला आजपर्यंत कधी न आलेला असा अत्यंत जहरी शाप आहे. या व्यतिरिक्त या राज्याविषयी दुसरी भावना राहूच शकत नाही. हिंदुस्थानाची सर्व संपत्ती इंग्लंडला नेण्यात आली आहे आणि आम्हांला आता काहीही कामधंदा उरलेला नाही."

दादोबांच्या वयाची शेवटची वर्षे मात्र अत्यंत हलाखीत गेली. त्यांनी जो काही पैसा कमावला होता तो त्यांच्या एका आर्थिक व्यवहारामुळे सर्व बुडाला व ते कर्जबाजारी झाले. प्रकृती खालावत गेली व १७ आक्टोबर १८८२ साली त्यांचे देहावसान झाले.

त्यांच्याविषयी गौरवपर मृत्युलेख बहुतेक सर्व मराठी, गुजराती व इंग्लिश वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले होते.

जगन्नाथ शंकरशेट, बाळशास्त्री जांभेकर आणि दादोबा पांडुरंग यांनी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पराभूत व परतंत्र महाराष्ट्राच्या अभ्युदयासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. आपला समाज, संस्कृती आणि साहित्य यांची पुनर्घटना कोणत्या तत्त्वांवर झाली पाहिजे, याचीही स्पष्ट कल्पना त्यांनी लोकांस दिली. आधुनिक महाराष्ट्राचे पहिले नेते म्हणून त्यांच्याबद्दल सर्वांनी कृतज्ञ राहिले पाहिजे.

बी. ए. परीक्षेमध्ये मराठी या विषयांत सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला सुवर्णपदक व दरवर्षी सर्वोत्कृष्ट मराठी ग्रंथ लिहिणाऱ्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या पदवीधराला पारितोषिक १९३५ सालापासून दादोबांच्या नावाने मुंबई विश्वविद्यालयाच्या मार्फत देण्यात येत असते. ज्या व्याजातून ही पारितोषिके दिली जातात ती रक्कम दादोबांच्या घराण्याकडून दिली गेली आहे.

## ओळखा पाहू ?

१) काळी साडी पिवळा ब्लाऊज
भटकायची तर खूपच हौस.

२) लाल हिरव्या डोळ्यांनी सगळ्यांवर पहारा
एका डोळ्याच्या खुणेने "जा, थांबा"चा इशारा.

३) काळी टोपी लाल डगला
उघड्या तोंडात कागद घाला.

४) अखंड माझी बडबड, कुणाला आवडत नाही
पण मी घरात नसलो, तर चैन पडत नाही.

—सौ. नलिनी परांजपे

(उत्तरे इतरत्र पाहा)

# गजा अंधदेशात गेला तेव्हा

: म. वि. कोल्हटकर :

ती पोथी मिळाल्यापासून गजा बेचैन होता. कोण्डाबाईच्या माळ्यावर तो गुपचूप शिरला. कित्येक वर्षे त्या धुळीत कुणाचे पाऊल पडले नव्हते. एक हिंस्र बोका जळजळीत नजरेने पाहात माळ्यावरून फिरत होता. त्याच्या धडपडण्यामुळे एक जुनी पोथी खाली पडली. तिच्या पानावर असलेला मजकूर गूढ लिपीत लिहिलेला होता.

गेले दीड वर्ष गजाने ते गुपित स्वतःजवळ ठेवले. त्या मजकुराचा अर्थ लावला. खूप प्रयत्न करून पोथीत सांगितलेली द्रव्ये जमा केली. आई-बाबा सिनेमाला गेले आहेत असे पाहून त्याने वेगवेगळे द्रव तयार केले. लौकरच धूर झाला. गजाला हलके वाटू लागले. सगळे जग गुलाबी दिसू लागले. गजा हळूहळू वर चालला होता. कोवळ्या लुसलुशीत गादीवर जणू तो पहुडला होता. आभाळ नारिंगी, झाडे नारिंगी, जमीनही नारिंगी दिसत होती. एखाद्या भव्य स्टेडियमप्रमाणे जमीन अफाट दिसत होती.

विरळ ढगांतून गजा चालला होता. नक्षत्रांची झुंबरे पाहात होता. एकीकडे रुपेरी सूर्य. दुसरीकडे थाळीएवढा चंद्र. ताऱ्यांची फुले. फुलांचे वेल. वेलींची बाग. दिवस केव्हा उलटला, रात्र केव्हा संपली गजाला कळलेच नाही.

एका गर्द हिरव्या कुरणात आवाज न करता गजा उतरला.

एवढे मोठे कुरण, पण गाय नाही. गुराखीही नाही.

सप्तरंगी गजरा घातलेला एक देखणा पक्षी उडत गेला. त्याची चोच निमुळती होती.

नंतर एक सुगंधाचा पट्टा उमटत गेला. एकदम निराळा सुगंध. नाव नसलेला.

गजा उठला. चालू लागला. त्याला वाटले, चहूकडून आपणाला कुणीतरी बोलवत आहे. बोलावणारे ते नवे, अगदी वेगळे सुगंध आहेत.

ओढ्याची धार गुपचूप वाहत होती. तिच्या रोखाने गजा निघाला.

वाटेत सुगंधांची कारंजी होती. जणू मैलामैलावर ठेवलेले टप्पेच.

जवळच एक टेकडी होती. जणू काय गवताळ रानात मान उंच करून पाहाणारी. आसपास गाईंचा एक कळप होता. मध्ये एक गुराखी शांतपणे उभा होता. केसांचे कल्ले, खांद्यावर काठी, गळ्यात अलगूज, कानांत डूल असा त्याचा वेष होता.

हातांचा द्रोण करून गुराख्याने साद दिली 'हुलाऽऽहुई.' नंतर किणकिणणाऱ्या डुलाच्या तालावर तो चालू लागला.

गजा थांबला.

गुराखीही थांबला.

'कुठून आलास ?' गुराख्याने विचारले.

'अंऽअं' गजा चाचरला. तो गुराख्याकडे पाहात राहिला. कारण गुराख्याला हात होते, कान होते, नाक होते, पण भिवई नव्हती. डोळे नव्हते. खोबणही नव्हती. नुसते खालपर्यंत उतरलेले सलग कपाळ.

'घाबरू नको.' गुराखी म्हणाला.

'छेः घाबरलो नाही.' गजा म्हणाला.

'नाही कसा ? वासच सांगतोय् तू घाबरलास म्हणून !' गुराखी म्हणाला.



'चल, माझा हात धर.' गुराख्याने हात पुढे केला.

गजाने निमूटपणे गुराख्याचा हात धरला.

दोघे चालू लागले.

'किती सुंदर पक्षी दिसत आहेत !' गजा म्हणाला.

'दि–स–त–आ–हे–त ?' गुराखी म्हणाला.

'हो ! लाल, गुलाबी, पिवळे, निळे–' गजा उत्तरला.

'काहीतरी विचित्र बोलतोस, म्हणे, 'दि–स–त–आ–हे–त !

'बरं बाबा, राहिलं.' गजा म्हणाला.

'चल, तुला गोड दूध देतो.' गुराखी म्हणाला.

दोघे झाडाखाली थांबले. मग गुराख्याने अलगूज वाजवले. त्याबरोबर एक गाय आणि तिचे गोंडस वासरू धावत आले.

गजा चरकला. ती गाय आणि ते वासरू यांनाही डोळे नव्हते. नुसते आरपार कपाळ.

गुराख्याने दिलेले द्रोणभर दूध गजा कसेबसे प्यायला. पण त्याचे दुधाकडे मुळी लक्षच नव्हते.

नंतर दोघेजण गावाकडे निघाले. वाटेत गाईंचा कळप भेटला. सगळ्या डोळे नसलेल्या !

गुराखीही तसलेच.

वाटसरूही तसेच. बाजार उरकून तट्टावर बसून, टकाव् टकाव् करीत चाललेले. पण डोळा नाही, पापणी नाही, भिवई नाही, बुबुळ नाही, खोबणसुद्धा नाही....तट्टेसुद्धा तशीच....

'पडशील समोर नाल्यात.' गुराखी म्हणाला. त्याने गजाला सावरले.

गजाला आश्चर्य वाटले. नाला आला हे याला कळले कसे ?

दिवस मावळला. गजाला रस्ता दिसेना, गुराखी त्याला अचूक वाटेने नेत होता.....

'कोण पाव्हणा आला आहे ?' दाराजवळ चाहूल लागताच गुराख्याच्या आईने प्रश्न केला.

'वाटेमध्ये ऐकू आला. घरी आणला त्याला.' गुराखी उत्तरला.

'गाव कोणते ?' आईने विचारले.

'ठणठणपुरचा नाही. घमघम गावचा नाही. हुंगला. पण ओळख पटेना.' गुराखी म्हणाला.

आईने ऊन पाणी आणले. दोघांनी पाय धुतले.

घरात चूल पेटली होती.

'भाषा कोण बा तुझी ?' आईने विचारले.

गजा घुटमळला.

'होतं असं कधी. राहू दे. राहू दे.' आई मायेने म्हणाली.

आईने कसलेसे चाटण दिले. गजाने ते खाल्ल्यासारखे केले. नंतर थुंकून दिले.

जेवण झाले. गजाला गुदमरल्यासारखे झाले. कारण सगळे गाव अंधारात बुडाले होते. दिवा नावाची वस्तूच नव्हती तिथे....

सकाळ झाली. ऊन पसरले. गजा म्हणाला, 'दादा, फिरून येतो मी.'

'नको रे बाबा!' गुराखी म्हणाला, 'गावातली मुले हूल दाखवतील. चाहूल दाखवतील पाणगंधाची. नेतील गवतगंधात, नाहीतर मनोऱ्यावर.'

'मी खुणा पाहून परत येईन.' गजा म्हणाला.

'बाबा रे, तुला पित्त झाले आहे. पाहून आणि येईन असं काही अर्थ नसलेलं बडबडतोयस कालपासून.' आई म्हणाली.

'चुकलो मी आई. जाऊ दे ना मला.' गजा म्हणाला.

गुरख्याच्या आईने त्याला परवानगी दिली.

गजा गावभर हिंडला.

घरे होती. दारे होती. घरांची आढी किती उंच उंच होती!

खडबडलेल्या भिंती, रंग नाही, सफेती नाही. चुन्याची रेघसुद्धा नाही.

लोक मारे तोऱ्यात. हा कोण व्यापारी. हा कोण फौजदार. हा कोण अंमलदार. एकेकाचे कपडे कसे कळकट मळकट. मातीत पडले तर कळणार पण नाही.

दुकानाबाहेर लोंबणारी लक्तरे. ही फॅशनेबल कापडे. ती कापडे मन लावून हाताने कुरवाळणाऱ्या बायका. त्यांचे भुण्डे गळे, भुण्डे कपाळ आणि उंच आलेले, डोळ्यांची खोबण नसलेले उण्डे कपाळ ! एकेकीच्या गळ्यात किणकिण करणारी घण्टा फक्त.

जिकडे तिकडे काठीचे राज्य होते. मुठीची काठी, गाठीची काठी, तिरपी काठी, गुळगुळीत काठी. टाक् टाक् टकाव् टाक् असे आवाज.

घरांना दिशाच नव्हती. एक इकडे तोंड करून, तर दुसरे तिकडे तोंड करून वाट्टेल तशी फतकल मारून बसलेली. शिखर नसलेले एक देऊळ होते. आत मूर्ती नव्हती. भिंतीला कान घासून, नाक लावून, डोके आपटून लोक बाहेर पडत होते.

देवळाच्या ओवरीत म्हातारा पुजारी बसला होता. त्याच्या पुढ्यात चित्रविचित्र दगड होते. जो जो माणूस येई तो पुजाऱ्याचे हात हुंगून पुढे जाई.

माणसांची पावले जाडजूड चोपण्यासारखी. तळवे पोलादासारखे घट्ट. कपड्यांची तऱ्हा औरच. कुणी चोळणेवाले, कुणी लेंगेवाले.





कुणी लुंगीवाले. ढगळ, भोंगळ, ओंगळ असे पोशाख. वेशीजवळ उंच मनोरे. त्यांची नावे अलमबहार, धुंदविहार अशी. तिथे चित्र-विचित्र घण्टा. एक वळण ओलांडून गजा पुढे आला. ते कातडी मुखवटे बघून त्याला सुन्न वाटले. 'देवाने यांना अशी शिक्षा का बरे केली ?' गजा विचार करू लागला.

काठीदेवतेच्या जुन्या मंदिरावरून तो पुढे गेला. रखवालदाराने त्याला हटकले. जवळच राजवाडा होता. रखवालदाराने शिट्टी वाजवली. बघता बघता अनेक रखवालदार आले. सगळे डोळा नसलेलेच. पण गजाभोवती त्यांनी वेढा घातला. गजा भेदरला. न जाणो यांच्या तावडीत सापडलो तर ? यांना डोळे नावाचे इंद्रिय नाही. रक्तबंबाळ झालो तरी बडवणे बंद करणार नाहीत. गजा धावत सुटला. थेट राजवाड्यात शिरला. समोर प्रशस्त चौक होता. रंगीत चौरंगावर राजेसाहेब आरूढ झाले होते. दासदासी त्यांना उटणे लावीत होत्या, कुणी रागदारी आळवीत होत्या.

एकाएकी वाद्ये थांबली. तोंडे मुकी झाली. राजेसाहेब ओरडून म्हणाले, 'कोण आहे रे तिकडे ? याला आत कुणी सोडले ?' राजेसाहेबांची गर्जना ऐकून रखवालदार शरमिंदे झाले.

'कोण देशीचा हा महासमंध ? याने आमची धूळ चिवडवली पाणी नासवले.' राजेसाहेब गरजले.

गजाची पाचावर धारण बसली.

राजेसाहेब पुढे सरसावू लागले. हाताने पाणी दूर सारावे तशी हालचाल ते करू लागले. त्यांचे ओठ रागाने थरथरत होते. पण जिथून आग बाहेर पडायला हवी ते डोळे, भिवया काही काहीच नव्हते. धृतराष्ट्राने भीमाचा पुतळा कवटाळला त्याप्रमाणे आपल्याला कवटाळून राजेसाहेब आपला चेंदामेंदा करणार असे गजाला वाटले.

गजाच्या तोंडातून शब्द उमटेना.

राजेसाहेब जवळ येऊ लागले. गजा मागे सरू लागला. मागे तर अजस्र भिंत होती. एखादा सिंह झडप घालतो त्याप्रमाणे राजसाहेब तुटून पडणार होते. एवढ्यात समोरच्या सज्जात छुमछुम् छुमछुम् असा आवाज झाला. पायघोळ निऱ्या सावरीत नितळ गोरी पावले पुढे येऊ लागली.

'बाबा, थांबा !' राजकन्या ओरडली.

केवड्याच्या पातीसारखी तिची कांती होती. पण डोळ्याची खिडकी नसल्यामुळे तिचे सुंदर रूप अतिभयाण वाटत होते.

'याला मारू नका.' राजकन्येने विनवणी केली.

'हा धटिंगण कोण ? हा थेट स्नानगृहात शिरला कसा ?' राजे रागाने म्हणाले.

'याला एकवार दया दाखवावी. वाट चुकला आहे बिचारा !' राजकन्या म्हणाली.

'तुझी लुडबूड नको ! दूर हो !' राजे म्हणाले.

'याला अभय द्या. तरच दूर होईन.' राजकन्या निश्चयाने म्हणाली.

राजकन्येने गजाचा हात धरला. त्याला महालात नेले. खाऊ-पिऊ घातले. जेवणात कितीतरी पदार्थ होते. खारट, तुरट, कडू, गोड, तिखट, आंबट. यांशिवाय आणखी कितीतरी नव्या प्रकारच्या चवी अनेक पदार्थांना होत्या. जेवण उरकल्यावर गजा आणि राज-कन्या फिरण्यासाठी बाहेर पडलीत.

दूर एक उंच कडा होता. हत्तीच्या माथ्यासारखा. त्याच्या प्रचण्ड अंगावर वारे घों घों करीत फिरत होते. कड्याजवळ एक कट्टा होता. कट्ट्यावर ती दोघे बसलीत. सुंदर राजकन्या, हरपलेले डोळे आणि प्रचण्ड दरी पाहून गजाला गलबलून आले. वाऱ्याची मंद झुळूक आली. ऊन हसले. दरीवर पसरले. ती दरी फुलांची होती. तशीच फुलपाखरांची होती. हरतऱ्हेच्या सुगंधांची होती. हे सुगंध एकदम नवीन प्रकारचे होते. एकापेक्षा दुसरा धुंद. जणू काय सुगंधाच्या पायघड्याच घातल्या होत्या. कुणीतरी चांदोबाच्या कुशीत अलगद उचलून नेणार होते. पाकळ्यापाकळ्यांची रेशीम-कुंची घालून जो जो करणार होते.

फुलेसुद्धा किती रंगांची ? सात नव्हे, सातशे रंगांची. एकाहून दुसरे अधिक सुंदर. जणू पऱ्यांची उमटलेली छानदार पावलेच. फुलपाखरांच्या जणू रंगीबेरंगी माळाच माळा.

गजाला वाटले गाणे गुणगुणत अखंड दरीभर हिंडत राहावे.

'असे गप्प का ?' राजकन्या म्हणाली.

गजाला वाईट वाटले. एवढे रंग, एवढी रूपे आणि ते पाहाण्या-साठी राजकन्येला देवाने डोळे देऊ नयेत ना ! हा देव चोच देतो आणि चारा देत नाही. गाणे गाणाराला मंजुळ आवाज देतो आणि कान देत नाही. रूप देतो, दृष्टी देत नाही.

'गळ्याशपथ, तुला काय होते सांग.' राजकन्या म्हणाली.

'किती सुंदर दृश्य !' गजा दुःखाचा आवेग गिळून म्हणाला.

'सुंदर ? दृश्य ? म्हणजे काय ?'

'निळे आकाश, रंगीबेरंगी पाखरे !' गजा म्हणाला.

'छे: काहीतरी घोटाळा आहे. असे चमत्कारिक बोलू नको. मला बाई भीती वाटते. म्हणे निळे आकाश. रंगीबेरंगी पाखरे.'

गजाची कुचंबणा झाली. काय बोलावे त्याला समजेना.

'दिसले म्हणजे दिसले. सुंदर म्हणजे सुंदर. निळे म्हणजे निळे.' गजा चिडून म्हणाला.

'बापरे, तुला खात्रीने काहीतरी दुखणे झाले असले पाहिजे. तू काहीतरीच बोलतोस. म्हणे दिसले!'

'डोळा आहे म्हणून दिसले.'

'डोळा? ही काय भानगड आहे?' राजकन्येने विचारले.

गजाने तिचा हात हातात घेतला व तो आपला डोळ्यांवर फिरवला. विस्तवाला हात लावावा तशी राजकन्या किंचाळली.

गाईला शिंग, हत्तीला सोंड, माशाला कल्ले असतात हे तिच्या हातांना ठाऊक होते. पण बुळबुळीत, निसटणारे, कपाळाखाली न भरून येणाऱ्या खाचीत डोळा नावाचे ओंगळवाणे असे काहीतरी हे तिला माहीत नव्हते. ती गांगरली. तिला मूर्च्छा आली. गजाने तिला कसेबसे सावरले. नंतर दोघे राजवाड्याकडे परतलीत.

आतापावेतो राजा, राणी, राजकन्या, प्रधान सर्वांची खात्री झाली होती की गजाच्या शरीरात काहीतरी विकृती निर्माण झाली आहे. 'दिसले', 'पाहिले' असे तो म्हणतो. 'पांढरा', 'पिवळा', 'नारिंगी' असे अर्थहीन शब्द बरळतो. त्याच्या कपाळाखाली कधी भरून न येणाऱ्या खाचा पडल्या आहेत. खाचांभोवती सुरवंटासारखे केस आहेत. मध्ये अमंगळ, बुळबुळीत, घाणेरडे, मासुर्डे. तो सतत वागवतो. ते काढून टाकायला हवे. नाहीपेक्षा त्याचा विकार बळावेल.

देशोदेशीचे डॉक्टर, वैद्य, सर्जन आले. गजाची सर्वांनी चाचपून नखशिखान्त तपासणी केली. सर्वांचे एकमत झाले की ही अनिष्ट वाढ कापून काढायला हवी. गजाची पाचावर धारण बसली. चहूकडे चित्रविचित्र काठ्या घेतलेले पहारेकरी. भोवती सुऱ्या पाजळून सज्ज असलेले डॉक्टर.

'अगदी सोप्पे आहे ऑपरेशन.' राजकन्या गजाची समजूत घालत होती.

'ओठावर बोट, पोटावर पीस फिरवले तर दुखेल का? तसेच हे ऑपरेशन अगदी साधेसोपे आहे.' राजकन्या म्हणाली.

गजाची समजूत पटेना. फूल सुकावे तसा तो सुकून गेला. त्याच्या काळजाचे पाणी झाले होते. देवाचे हे सुंदर जग पाहाण्यासाठी त्याने दिलेली लाखमोलाची खिडकी आता कायमची बंद होणार होती....

अखेर तो दिवस उजाडला. गजाला न्हाऊमाखू घालण्यात आले. गोडधोड बळेबळे खायला घातले. एकीकडे राजकन्येची लाडिक सक्ती. दुसरीकडे क्रूर राजदूतांची बळजबरी.

एका ढकलगाडीवर गजाला आडवे पाडण्यात आले. ती गाडी आत नेण्यात आली. तिथे डॉक्टर सज्ज होते. त्यांनी मुखवटे घातले होते. टोप्या चढवल्या होत्या.

गजा विव्हळू लागला. कारण समोर सुऱ्या तळपत होत्या. एक



सुरी डोळ्यात शिरणार होती....आणि मग?....मग न संपणारा अंधार ...आयुष्यभर काळोख....

गजाने ओरडण्याचा प्रयत्न केला. त्याच्या तोंडातून शब्द उमटेना....त्याला आठवले. अद्भुत ग्रंथात सांगितल्याप्रमाणे निघताना त्याने एक ताईत गळ्यात घातला होता. गजाने तो तोडला. दाताखाली दाबला. आत असलेली चिमूटभर पूड हुंगली आणि उधळली. त्याबरोबर भोवतालचे सगळे लोक पटपट फोलपटाप्रमाणे बाजूला पडले. गजा तसाच अलगद उंच उडाला. दारातून बाहेर आला. त्याला हायसे वाटले. कारण पृथ्वी नावाच्या मायभूमीग्रहाकडे त्याची वाटचाल सुरू झाली होती. देवाने आपले डोळे ठेवले, म्हणजे मोठ्ठाच वर दिला असे त्याला वाटले.

(आधारित)

□ □ □

# कुत्रा पाळणार आहात का?

: डॉ॰ चंद्रहास कापडी :

तुम्हापैकी बऱ्याच जणांकडे एखादा मोत्या, खंड्या, टॉमी अगर ल्यूसी पाळलेली असेलच किंवा तुमच्या घरात एखादा कुत्रा आणण्याचा हट्ट तुम्ही केला असेल आणि म्हणून तुमच्या आईवडिलांनी तुम्हांला एखादा कुत्रा आणून दिलेला असेल. मग तो कोणत्याही जातीचा असो; तो तुमचा कुत्रा होतो. तुम्ही त्याच्यावर तुमच्या कुटुंबातील एक माणूस या नात्यानेच प्रेम करता, त्याला खायला घालता, त्याचे सर्व लाड करता. त्याचप्रमाणे तो तुमचा कुत्रा पण इमानाने तुमच्या घराचे रक्षण करतो. सदैव तुम्हांवरही तसेच प्रेम करतो.

तेव्हा अशा तुमच्या जिवलग व्यक्तीला; आई जशी तुम्हांला प्रेमाने काळजीपूर्वक वाढवते, तसे वाढवणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने तुम्हांला थोडी माहिती देण्याची माझी इच्छा आहे. ही माहिती तुम्हीच घेणे का आवश्यक आहे? तर एक म्हणजे तुम्हां मुलांच्या आग्रहाखातरच कुत्रा घरात आणला जातो व दुसरे म्हणजे घरातील मोठी माणसे कामधंद्यात दिवसभर गुंतून असल्यामुळे, तुम्ही आणलेल्या कुत्र्याकडे पाहिजे तितके लक्ष देण्यास त्यांना वेळ मिळत नाही व त्या कुत्र्याची देखभाल करण्याची जबाबदारी आपोआपच तुमच्यावर येऊन पडते. शिवाय तुम्हांला नवीन आणलेल्या पाहुण्याबाबत (कुत्र्याबाबत) जेवढा उत्साह असतो तेवढा दुसऱ्या कोणाला असणे शक्य नाही!

समजा, एखादा कुत्रा पाळण्यासाठी तुम्हांला घरी आणायचा आहे, तर त्यासाठी कुत्रा कसा असावा या गोष्टींची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

कुत्र्यांच्या खूप जाती आहेत; परंतु त्यांमध्ये सर्वसाधारण असे पुढील पाच प्रकार पाडले जातात :

१) खेळासाठी वा शिकारीसाठी पाळण्यात येणारी कुत्री (Sporting dogs) : ही कुत्री केवळ शर्यतीसाठी अगर शिकारीसाठी पाळण्यात येतात.

उदा. हाउंड, पॉईंटर, रीट्रायव्हर वगैरे जातींची कुत्री.

२) विशिष्ट कामासाठी पाळण्यात येणारी कुत्री (Working dogs) : या वर्गामध्ये शरीराने थोराड असलेली कुत्री अंतर्भूत होतात. यांचा उपयोग मुख्यतः रक्षणासाठी केला जातो. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने या प्रकारच्या कुत्र्यांचा उपयोग युद्धकैद्यांना पकडण्यासाठी व सीमेवर पहारा ठेवण्यासाठी करून घेतला. पोलिसदलातही या कुत्र्यांचा उपयोग चोर पकडण्यासाठी करतात.

या प्रकारात देशी (धनगरी) कुत्र्यांचाही समावेश होतो. कारण शेळ्यामेंढ्यांच्या रक्षणासाठी धनगरलोक ह्याच कुत्र्यांचा उपयोग करतात.

उदा. धनगरी, अलसेशिअन, बॉक्सर, हाऊंड, कोली, ग्रेटडेन वगैरे जातींचे कुत्री.

३) टेरीअर्स (Terriers) : यांचा उपयोग यूरोपमध्ये पूर्वी ससा वगैरे लहान वन्य प्राण्यांच्या शिकारीसाठी करीत होते. हल्ली



मॉडर्न बॉव डॉग

घरात पाळण्यासाठी या जातींच्या कुत्र्यांचा सर्रास उपयोग करतात.

उदा. बुलटेरिअर, फॉक्स टेरिअर वगैरे जातींची कुत्री.

४) खेळासाठी अगर रक्षणासाठी वापरले जात नाहीत अशी कुत्री (Non-sporting dogs) : यांतील काही जाती पूर्वी खेळासाठी वापरल्या जात होत्या. परंतु हल्ली केवळ घरात पाळण्यासाठीच या कुत्र्यांचा उपयोग होतो. अर्थात थोडाफार घर राखण्यासाठीही यांचा उपयोग होतो.

उदा. बुलडॉग, चाऊचाऊन, डालमेशिअन वगैरे जातींची कुत्री.

५) शोभेची कुत्री (Toys) : यांना इंग्रजीत 'toys' म्हणजे खेळणी म्हणूनच संबोधले जाते. घरात शोभेच्या वस्तू असतात तसाच ह्या जिवंत शोभेच्या वस्तूंचा उपयोग! ही अत्यंत नाजूक व दिसावयास गोंडस असतात. घरात लहान मुले असली तर ह्या कुत्र्यांना ती खेळण्यासारखेच वापरतात.

उदा. पोमेरनिअन, पेकिंजीज, स्पॅनिअल वगैरे जातींची कुत्री.

कुत्र्यांच्या जातींच्या वर्गीकरणावरून तुम्हांला कोणत्या कामासाठी कोणत्या प्रकारचा कुत्रा पाळायचा आहे, याचा विचार करता येईल. त्याचबरोबर आणखी काही बाबींचा पण तुम्हांला कुत्रा




वायरहेअर्ड टेरियर

पाळण्यापूर्वी विचार करावा लागेल. तो म्हणजे:

१) कुत्रा शुद्ध जातीचा आहे किंवा नाही. तुमच्या मनात आपला कुत्रा मोठा झाल्यावर अमुक असा दिसला पाहिजे, असे असेल तर विशिष्ट अशा शुद्ध जातीचाच कुत्रा निवडून घेणे आवश्यक आहे.

२) लहान पिल्लू घ्यायचे, की एकदम मोठा कुत्राच घ्यायचा : लहान पिल्लू घेणे कधीही फायदेशीरच ठरते. कारण लहानपणापासून तुम्ही त्याची देखभाल केल्यामुळे तुमच्याबद्दल त्याला प्रेम उत्पन्न होते, तुमच्या कुटुंबातीलच एक हे नाते निर्माण होते व दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे तुम्हांला तो जसा वागावयास हवा त्याप्रमाणे त्याला तुम्ही शिकवून तयार करू शकता. याउलट तुम्ही जर एकदम मोठाच, म्हणजे सहा महिन्यांहून अधिक वयाचा कुत्रा घरात आणला तर तो तुमच्या घरी रुळायला त्रास पडतो. तुमच्याविषयी त्याला मालक म्हणून कमी आस्था असते. कारण तुमच्याबद्दल त्याला लवकर प्रेम निर्माण होत नाही. तुम्हांला हव्या त्या नवीन गोष्टी तो लवकर शिकतही नाही. तेव्हा शक्यतो १ ते २ महिन्यांचे पिल्लू घेऊन पाळणे विशेष चांगले.

३) तुम्हांला ज्या कारणासाठी कुत्रा पाळायचा त्याप्रमाणे मागे सांगितलेल्या शुद्धवंशावळीच्या जातींपैकीच तुम्ही तो निवडून नंतर पाळा. उदा. रक्षणासाठी, शोभेसाठी किंवा मजेसाठी.



पोमेरॅनिअन

कुत्रा घरात आणल्यानंतर त्याची कशी देखभाल केली पाहिजे त्याची माहिती आता घेऊया :

ज्या वेळी तुम्ही कुत्र्याचे लहान पिल्लू घरात आणता त्या वेळी आईला सोडून ते आणलेले असते व तुमच्या घरात ते फारसे रुळलेले नसते, म्हणून सारखे ओरडत राहण्याची शक्यता असते. तसेच बेचैनीमुळे घरात जागोजागी मलमूत्रादी नैसर्गिक क्रिया करण्याचीही शक्यता असते. त्यासाठी शक्यतो एखादया स्वतंत्र खोलीत जमिनीवर कागद पसरून ठेवावा. म्हणजे घरात जास्त घाण होत नाही. त्याला एखादे उघडया तोंडाचे खोके तयार करून, त्यात उबदार कापड अगर पोते घालून पुरेशी हवा मिळेल असे ठेवावे. घरात आणल्या आणल्या त्याला लगेच काहीही खायला अगर प्यायला देऊ नये. दिल्यास त्याचे पोट बिघडण्याचाच अधिक संभव असतो. त्याला सारखे उचलून न घेता त्या खोक्यात ठेवावे. कुत्रा सवयीनुसार त्या खोलीचा वास घेऊन स्वतःच्या नवीन घराची ओळख करून घ्यायचा प्रयत्न करीत असतो, त्या वेळी घरातील लहान मुलांनी अगर इतर व्यक्तींनी त्याला बोलावून अगर सारखा हात लावून त्रास देऊ नये किंवा बुजवू नये. त्याला फक्त थोपटावे व त्याच्याशी मृदू बोलून तुमच्याबद्दल त्याला विश्वास निर्माण करावा. आणल्या आणल्या त्याला पट्टा, साखळी वगैरे लावू नये. तसेच त्याचे केस वगैरे विंचरू नयेत. त्याला एकटेच मोकळे फिरू दयावे. त्यामुळे त्याला नवीन घराची पूर्णपणे ओळख चटकन होऊन ते नव्या घरात लवकर रुळते. असे केल्याने तुम्हांला थोडयाच वेळात आढळून येईल की त्याला नवीन घर आवडले आहे. असा थोडा वेळ गेल्यावर त्याला बशीतून थोडे दूध दयावे. दूध प्यायल्यानंतर कदाचित ते सुस्त होऊन पडून राहू बघेल. अशा वेळी उचलून त्याला त्याच्यासाठी तयार केलेल्या खोक्यात हळूच ठेवावे व लहान मुलाला जसे झोपताना थोपटतात तसे थोपटावे.

पहिले दोन तीन दिवस रात्री ते ओरडण्याची शक्यता असते. कारण त्याला आईच्या कुशीत झोपायची सवय असते व ती सवय लगेच मोडली जात नाही. त्या साठी जास्त थंडीचे दिवस असतील तर पाण्याच्या रबरी पिशवीत गरम पाणी घालून ती टॉवेलाने अगर जाड फडक्याने गुंडाळून त्याच्या खोक्यात ठेवावी. गरम पाण्याच्या उबेने आईच्या कुशीची ऊब मिळाल्याचे समाधान त्याला मिळेल व ते झोपी जाईल. हा उपाय त्याला खोक्यात शांत झोप लागण्याच्या सवयीपर्यंतच चालू ठेवावा. इतर हवामानात जाडसे कापड खोक्यात ठेवले तरी चालेल.

आता सुरुवातीला कुत्र्याला काय खायला दयायला पाहिजे ते पाहूया. अमुक अमुक लिटर इतके दूध अगर अन्य पदार्थ त्याला दयायलाच पाहिजे असे ठरविता येत नाही. कारण काही मुलांना जसे जास्त खायला लागते, तसेच काहींना कमी लागते. त्याचप्रमाणे काही जातींच्या कुत्र्यांना जास्त खायला लागते, तर काही जातींच्या कुत्र्यांना कमी खायला लागते. तेव्हा तुम्ही देत असलेल्या



बॉक्सर

खाण्याने त्याची भूक भागते की नाही, ते त्याला व्यवस्थित पचते की नाही, का त्याला पातळ शौचास होते हे पाहूनच सर्वसाधारण खाण्याचे प्रमाण ठरवावे.

कुत्रा ४ ते ६ आठवड्यांचा होईपर्यंत शक्यतो दूधच दिलेले चांगले. दूध जर पाणीमिश्रित नसेल, तर प्रथम निम्मे दूध व निम्मे पाणी असे मिश्रण द्यावे. कुत्रा किती दूध पचवू शकतो याला काही ठराविक प्रमाण नसल्यामुळे, दिवसातून ४ ते ५ वेळा थोडे थोडे दूध देऊन त्याला कितपत दूध पचते हे बघून प्रमाण ठरवावे. कुत्रा जसजसा वाढेल तसतसे पाणीमिश्रणाचे प्रमाण कमी करून पाणी न मिसळलेले, निव्वळ दूध त्याला देण्यास सुरुवात करावी.

४ ते ६ आठवड्यांनंतर त्याला चपाती, भाकरी किंवा ब्रेड थोड्या प्रमाणात देणे सुरू करावे. प्रथम दिवसातून एकदा व नंतर हळूहळू दोनदा हे देण्यास हरकत नाही. याचेही प्रमाण तुम्हांलाच कुत्र्याचा आहार पाहून ठरवावे लागेल.

शक्यतो त्याला भात देऊ नये. कारण कुत्र्याला पिष्टमय पदार्थांची जास्त गरज नसते. शिवाय चरबीयुक्त पदार्थ तो लहानपणी व्यवस्थित पचवूही शकत नाही. कुत्र्याला मांस आवश्यकच आहे असे नाही. त्याला संपूर्णपणे शाकाहारी पदार्थ खाण्याची सवय लागली तरीही तो व्यवस्थित वाढू शकतो. फक्त त्याला भरपूर प्रथिने मिळतात की नाही एवढेच पाहाणे आवश्यक आहे.

प्रथिनांप्रमाणेच त्याच्या वाढीसाठी–निदान तो एक वर्षाचा होईपर्यंत तरी त्याला काही जीवनसत्त्वे देणे आवश्यक आहे. अ जीवनसत्त्वामुळे डोळ्यांची कार्यक्षमता चांगली राहते, त्याचप्रमाणे आतड्याच्या अंतस्त्वचेची कार्यक्षमताही टिकून राहते. तसेच ड जीवनसत्त्वामुळे हाडांची वाढ योग्य प्रमाणात होते. ही दोन्ही जीवनसत्त्वे कॉडलिव्हर तेलात असतात. १० किलोच्या आतील वजनाच्या कुत्र्यांना अर्धा चमचा व १० किलोवरील कुत्र्यांना एक चमचा भरून कॉडलिव्हर तेल दिल्यास त्यांची वाढ चांगली होते.


कुत्र्यास खायला देण्याच्या वेळा शक्यतो ठराविक ठेवाव्यात; म्हणजे त्याला अपचनही होत नाही व भुकेमुळे वेळी अवेळी ओरडण्याची सवयही लागत नाही. सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे कुत्र्याच्या वयानुसार खाण्याच्या वेळा ठरवाव्यात.

एकदीड महिना ते तीन महिने वयापर्यंत दिवसातून चार वेळा त्याला खाण्यास द्यावे. सकाळी, दुपारी, संध्याकाळी व रात्री १० च्या सुमारास असे द्यावे. वय ३ ते ७ महिन्यापर्यंत सकाळी, दुपारी व संध्याकाळी असे तीन वेळा व ७ महिन्यांवरील कुत्र्याला सकाळी व संध्याकाळी असे दिवसातून फक्त दोनदा खायला द्यावे. दिवसातील शेवटचे खाणे शक्यतो रात्री फार उशिरा देऊ नये. कारण त्यामुळे कुत्रा सुस्तावतो व कधी कधी झोपतो. रात्री घर रक्षणासाठी त्याचा त्यामुळे विशेष उपयोग होत नाही. त्याला खायला काय द्यायचे व किती द्यायचे हे ज्याच्या त्याच्या आवडीवर व कुत्र्याच्या पचनशक्तीवर अवलंबून असल्यामुळे ठराविक असे प्रमाण सांगता येत नाही. खाण्यात भाकरी, चपाती, ब्रेड, टोस्ट शिजवलेले पण मसाला व तिखट नसलेले मांस आणि अन्य पौष्टिक पदार्थ असावेत. शक्यतो भात देणे टाळावे.

कुत्र्याच्या खाण्याबाबत सर्वसाधारण माहिती तुम्हांला मिळाली आहेच. आता स्वच्छतेच्या दृष्टीने व आरोग्याच्या दृष्टीने काय काय केले पाहिजे त्याची माहिती पाहूया :

कुत्र्याला महिन्यातून शक्यतो दोनदाच आंघोळ घालावी. वारंवार व रोज आंघोळ मुळीच घालू नये. आंघोळीनंतर प्रत्येक वेळी केस स्वच्छ पुसून कोरडे करून विंचरावेत. केस जास्त असल्यास व्यवस्थित विंचरले नाहीत तर गुंता होऊन त्यात पिसवा व गोचिड्या होण्याची शक्यता असते. त्यामुळे कुत्रा सतत बेचैन राहतो व अंग धरत नाही.

कुत्र्याच्या पिल्लास आंघोळ घातल्यानंतर जर चांगले कोरडे केले नाही, तर त्याला थंडीचा त्रास होतो व त्याची प्रतिकार



डॅशुंड

शक्ती कमी होऊन त्याला 'डिस्टेंपर' किंवा 'न्युमोनिया' सारखे गंभीर आजार होण्याची भीती असते. तेव्हा पिल्लाला बाहेर मोकळ्या हवेत सोडण्याआधी त्याचे सर्व अंग कोरडे झाले आहे की नाही याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

कुत्र्याच्या अंगाला येणारा विशिष्ट वास जाण्यासाठी आंघोळीसाठी कुत्र्याचा साबण (dog soap) वापरावा. तसेच आंघोळीनंतर अंग कोरडे केल्यावर त्याचे केस स्वच्छ विंचरून त्याला टाल्कम पावडर लावावी व त्याबरोबरच 'मॅलेथिऑन' अगर 'लोरेक्शिन' सारखी औषधीयुक्त पावडर लावल्यास पिसवा, गोचिडचा वगैरे अंगावरील उपद्रवी प्राण्यांचा नायनाट होण्यास मदत होते.

आता मल-मूत्रादी नैसर्गिक क्रिया योग्य त्या रीतीने करण्याच्या दृष्टीने कुत्र्याला चांगल्या सवयी कशा लावल्या पाहिजेत त्याची माहिती पाहूया. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण जर या सवयी तुम्ही कुत्रा लहान असतानाच त्याला लावल्या नाहीत, तर तो मोठा झाल्यावर त्या लावणे अवघड जाते व आयुष्यभर तो तसाच राहतो. त्याच्या अस्वच्छ राहण्याच्या सवयीमुळे घरातील इतर व्यक्तींना व तुम्हांलाही त्याची किळस येते व एखादा चांगला कुत्रा पाळण्याच्या आनंदाला तुम्ही मुकता.

हां ! कुत्र्याला चांगल्या सवयी लावण्याची गुरुकिल्ली म्हणजे तुमची सहनशक्ती.

त्याला चांगल्या सवयी लावण्यासाठी एक गोष्ट मनात पक्की लक्षात ठेवायला पाहिजे आणि ती म्हणजे कुत्रा त्याच्या मालकाला खूष ठेवण्यासाठी सदैव झटत असतो. मात्र यासाठी त्याने चांगल्या केलेल्या वागणुकीला तुम्ही जर योग्य ती शाबासकी दिलीत तर त्याला खूप आनंद होतो. त्याचबरोबर त्याच्या चुकीच्या वागणु-



पुडल



रेसिंग ग्रेहाऊंड

कीला तुम्ही आपली नाखुषी योग्य रीतीने व्यक्त केलीत तर तो तेवढाच नाराज होतो व सुधारायचा कसोशीने प्रयत्न करतो.

तेव्हा तुमच्या सांगण्याप्रमाणे एखादी चांगली गोष्ट त्याने केली तर त्याला तावडतोब शाबासकी देण्यासाठी प्रेमळपणे थोपटावे, एखादे बिस्किट अगर त्याला प्रिय असलेल्या खाद्यपदार्थाचा तुकडा द्यावा व शाबासकी–'वा वा', 'शाब्बास', 'Good Dog' वगैरे विशेषणांनी व्यक्त करून गोंजारावे.

याउलट तो तुमच्या मर्जीप्रमाणे वागला नाही तर, लगेच तुम्ही खूप रागावला आहात असे नाटक करावे. त्यासाठी रागाने त्याच्या मानेवरील कातडी दोन्ही हातांत पकडून—त्याने समजा चुकीच्या ठिकाणी घाण केली असेल, तर ती जागा लगेच त्याला दाखवावी अगर त्याने जी गैरवर्तणूक केली असेल ती रागावून त्याला सांगावी. तसेच 'असे पुन्हा करू नकोस', 'Bad Dog' वगैरे शब्दांनी सांगावे. जरूर पडल्यास त्याबद्दल शिक्षा म्हणून त्याच्या नाकावर हळूच चापटी मारावी.

मात्र त्याला द्यायची शाबासकी अगर शिक्षा ही त्याने केलेल्या चांगल्या अगर वाईट वर्तणुकीनंतर तावडतोब देणे आवश्यक आहे. नाहीतर तुम्ही जर फार वेळ थांबलात तर त्याला शाबासकी अगर शिक्षा का दिली गेली हे उमजणार नाही व त्या शाबासकीचा वा शिक्षेचा मग काहीही उपयोग होणार नाही. प्रथम काही दिवस केवळ यासाठीच तुम्हाला त्याच्यावर काळजीपूर्वक नजर ठेवावी लागेल. तुमच्या सहनशक्तीला हे एक प्रकारे आव्हानच आहे. परंतु सुरुवातीलाच तुम्ही जास्त काळजी घेतलीत, तर कुत्रा त्याच्या मल-मूत्रादी नैसर्गिक क्रिया तुम्ही ठरवून दिलेल्या जागीच करायला लवकर शिकतो व घरात होणारी घाण तुम्ही टाळू शकता.

कुत्र्याचे पिल्लू जेव्हा अगदी लहान असते, म्हणजे जवळजवळ एक ते दीड महिन्याचे असते तेव्हा लहान मुलासारखेच त्याला मल-मूत्रादी क्रियांसाठी कागदावर बसावयास शिकवावे लागते.

यासाठी प्रथम तो जेव्हा जेव्हा तशी 'धोक्याची लक्षणे' दाखवील तेव्हा तेव्हा कागदावर ठराविक ठिकाणीच त्याला उचलून ठेवावे. या सवयीसाठीसुद्धा पूर्वी सांगितल्याप्रमाणे योग्य वर्तणुकीसाठी शाबासकी व अयोग्य वर्तणुकीसाठी शिक्षा लगेच दिली गेली पाहिजे. अशा रीतीने पिल्लाला थोडयाच दिवसांत चांगली सवय लागते व ते मोठे झाल्यावर ठराविक वेळेस बाहेर मल-मूत्रविसर्जनासाठी न्यायची सवय केल्यास घरात कधीच घाण करत नाही. शक्यतो चारवेळा - म्हणजे सकाळी, दुपारी, संध्याकाळी व रात्री झोपायच्या आधी कुत्र्याला त्यासाठी बाहेर न्यायची सवय लावावी.

तुमच्या आज्ञेप्रमाणे बसणे, धावणे, परत येणे, वस्तू आणणे वगैरे गोष्टी शिकण्यासाठी काही तज्ज्ञ लोक कुत्र्याला विशिष्ट तऱ्हेने शिक्षण देऊन तयार करतात. तुम्ही जर त्यांच्याप्रमाणे मेहनत घेतलीत, तर तुम्हीही तुमच्या कुत्र्याला पाहिजे तसे व्यव-



बुलडॉग

स्थित रीतीने शिकवू शकाल. त्यासाठी त्याबाबतची प्राथमिक माहिती आता पाहूया :

पूर्वी सांगितल्याप्रमाणे याचीही गुरुकिल्ली म्हणजे तुमची सहनशक्ती व तुमच्या मर्जीप्रमाणे कुत्रा वागल्याबरोबर त्याला योग्य ती शाबासकी व मर्जीप्रमाणे वागला नाही तर तावडतोब सौम्य शिक्षा हीच होय.

आज्ञाधारकपणा कसा शिकवावा : त्याला आज्ञाधारकपणा शिकवण्यासाठी सुरुवातीला सर्वांत महत्त्वाचा शब्द कुत्रा शिकला गेला पाहिजे, तो म्हणजे 'नाही' आणि 'No'. हा धडा तुम्ही

[illegible]

त्या ठिकाणीच करण्याची सवय लावता, त्या वेळेसच दिला पाहिजे.

ज्या ज्या वेळी कुत्रा चूक करेल त्या त्या वेळेस, पटकन 'नाही', 'असे नाही', 'No' वगैरे नकारार्थी शब्द करडेपणाने पटकन उच्चारले पाहिजेत व त्याच वेळेस त्याची चूक त्याच्या मानेवरील कातडी पकडून त्याच्या निदर्शनास आणली पाहिजे. याचप्रमाणे ज्या ज्या वेळी तो फारसे कारण नसताना भुंकेल, चावायला बघेल किंवा अन्य काही खठ्याळ वर्तणूक करील, त्या त्या वेळी मोठ्याने रागाने ओरडून 'No', 'नाही' असे सांगावे. तुम्ही खूप रागावला आहात असा आविर्भाव आणला पाहिजे व त्याच्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहात असे भासवायला पाहिजे. असे केल्याने कुत्रा नाराज होतो व त्याला हळूहळू समजायला लागते की, आपण केलेली गोष्ट मालकाला आवडलेली नाही. तुमची मर्जी संपादन करणे व तुम्हांला सदैव खूष ठेवणे हेच तर त्याचे मुख्य उद्दिष्ट व समाधान असते, त्यामुळे तो तुम्ही सांगितलेली कोणतीही गोष्ट शिकण्यास हळूहळू तयार होतो.

कुत्रा जेव्हा ४-६ महिन्यांचा होतो तेव्हा अशा प्रकारेच आज्ञा वा हुकूम दिल्याप्रमाणे बसणे, उठणे, साखळी न धरता थांब म्हटल्यावर थांबणे, वस्तू आणणे वगैरे गोष्टी त्याला सहज शिकविता येतात.

आता कुत्र्याच्या आरोग्याचा थोडक्यात विचार करूया. तुम्ही घरच्या घरी कुत्र्याच्या डोळ्यांची, कानांची दातांची, पायांची व त्वचेची व्यवस्थित निगा जर राखलीत, तर गंभीर आजारासाठीच केवळ कुत्र्याच्या डॉक्टरची म्हणजेच पशुवैद्याची तुम्हांला मदत घ्यावी लागेल.

कुत्र्याचे डोळे नेहमी स्वच्छ ठेवण्यासाठी कोमट पाण्यात अर्धा चमचा बोरीक पावडर टाकून त्याचे डोळे कापसाने पुसून घ्यावेत. त्याचप्रमाणे त्याचे कान स्वच्छ राहण्यासाठी कान आतून बाहेरून या पाण्याने स्वच्छ पुसून घ्यावेत. गोचिडया, पिसवा वगैरे सारखे उपद्रवी प्राणी होऊ देऊ नयेत.

सर्वसामान्यपणे निरोगी कुत्र्याच्या दातांची निगा त्याच्या लहानपणी राखण्याची वेळ येत नाही; मात्र कठीण पदार्थ जर त्याला खाण्यास दिले गेले नाहीत, तर मात्र त्याचे दात व्यवस्थित साफ राहू शकत नाहीत. त्यांवर जे किटण चढते, त्यालाच टार्टर असे म्हणतात. म्हणून त्याच्या दातांवर टार्टर चढणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

तसेच पायाची नखेसुद्धा वेळच्या वेळी कापून टाकावीत. ती जर वाढलीत, तर त्याला नीट पळता येत नाही. शिवाय काही कुत्र्यांना प्रेमाने मालकाच्या अंगावर पुढील दोन पाय ठेऊन उडया घ्यायची सवय असते आणि अशा वेळी ती नखे मालकालाच लागण्याची शक्यता असते.

त्वचेची निगा म्हणजे कातडीवर असलेल्या केसांची व आतील कातडीची योग्य ती निगा राखणे. यासाठी मागे सांगितल्याप्रमाणे

[illegible]

क्झीन', '५% गॅमेक्झीन' वगैरेंसारख्या औषधांचा टाल्कम पावडर-

बरोबर नियमित वापर इत्यादी बाबी काळजीपूर्वक केल्यावर त्याची त्वचा उत्तम राहते. त्यामुळे खरूज इत्यादी त्वचारोग त्यास सहसा होत नाहीत.

तुम्हांला आता कुत्र्याच्या आरोग्याची सर्वसाधारण काळजी कशी घ्यायला पाहिजे हे समजले आहेच; परंतु तरीही काही वेळा कुत्रा आजारी पडतो व त्याला औषधोपचारासाठी पशुवैद्याकडे नेणे आवश्यक असते. अशा वेळी त्याच्या आजाराची लक्षणे तुम्हांला पशुवैद्यास व्यवस्थित सांगता आली पाहिजेत. कारण लहान मूल जेव्हा बोलू शकत नाही तेव्हा त्याची आईच सर्व लक्षणे डॉक्टरांना सांगते. तसेच तुम्ही पण त्याची आई बनून सर्व लक्षणे पशुवैद्याला सविस्तरपणे सांगणे अत्यंत आवश्यक आहे. त्या लक्षणांच्या आधारे व प्रत्यक्ष तपासून डॉक्टर रोगाचे निदान चटकन करू शकतात. त्यासाठी कुत्र्याच्या खाण्यावर व हालचालींवर अत्यंत बारीक नजर असणे आवश्यक आहे.

आता कुत्र्याच्या आजारपणाची सर्वसाधारण कोणकोणती लक्षणे आढळतात त्याची माहिती घेऊया : आजारपणाची बरीच लक्षणे असलीत तरी मुख्य म्हणजे जेव्हा कुत्रा आजारी पडतो, तेव्हा तो काहीच खातपीत नाही आणि मलूल दिसतो. कुठेतरी कोपऱ्यात तो निपचित पडून राहतो. तो नेहमीसारखा खेळकर दिसत नाही. तुम्ही त्याच्या जवळ गेल्यावर नेहमी जशी जोरजोरात शेपटी हलवीत असतो, तशी ती हलवीत नाही. तुम्ही बोलाविले तरी चटकन जवळ येत नाही. त्याचे अंगही तुमच्या हाताला गरम लागते. कदाचित केसांमुळे अंग कितपत गरम आहे हे कळत नाही. त्यासाठी जांघेत जिथे केस नसतात तिथे हात लावून ताप असल्याची खात्री करून घ्यावी. त्याचप्रमाणे ताप आल्यास त्याचे नाक कोरडे पडते व गरम लागते. प्रत्यक्ष ताप किती आहे हे समजून घेण्यासाठी पशुवैद्यामार्फत तपमापकाने त्याचा ताप मोजणे आवश्यक आहे.

आजारी कुत्रा कधी कधी वांतीही करतो. तसेच त्याला पातळ विष्ठा होते. कधी कधी त्याला चक्कर आल्यासारखे होते. तो अचानक कुठेतरी दुखत असल्यासारखा ओरडतो. पाय झाडतो. त्याला लघवी पण नेहमीसारखी होत नाही. अशी अनेक लक्षणे आढळतात. तेव्हा प्रत्यक्ष आजाराचे योग्य निदान होण्यासाठी शक्यतो त्याला लवकर पशुवैद्याकडे नेऊन योग्य तो औषधोपचार करणे जरूर आहे.

आजारी कुत्रा पशुवैद्याकडे नेणे जसे आवश्यक आहे, तसेच काही गंभीर रोग उदा० कुत्रा पिसाळणे (रेबीस), 'डिस्टेंपर' होऊ नये म्हणून कुत्रा ३ ते ४ महिन्यांचा झाल्यावर त्याला पशुवैद्याकडून रोगप्रतिबंधक लस टोचून घेणे आवश्यक आहे. तसेच पशुवैद्याच्या सल्ल्याने जंतासाठी औषध देणेही महत्त्वाचे आहे.

कुत्र्याच्या संगोपनाची सर्वसाधारण माहिती आता तुम्हांला मिळाली आहेच, तेव्हा त्या आधारे तुमच्या कुत्र्याचे लालन-पालन व उत्तम संगोपन करून, कुत्रा पाळण्यातील आनंद तुम्ही अनुभवाल अशी खात्री आहे.

■ ■ ■




तुमच्या मुलीचें
भवितव्य
तुमच्याच हातीं

पुढील अनिश्चिततेपासून
तिच्या रक्षणाची तरतूद करा.
स्टेट बँकेत
नियमित बचत करा.

**सेवेसाठीं स्टेट बँक**

S 273 MRA



# पुस्तक परिचय

### जीवनदीप प्रकाशन, मुंबई : ४

१. **जोडाक्षरे नियम आणि लेखन** : लेखक : लक्ष्मण सखाराम रावले आणि सदानंद लक्ष्मण रावले. एक ते सात भागांत ही पुस्तिका प्रकाशित आहे. जोडाक्षर लेखनाचा नव्या नियमांचा अवलंब या भागांत केला आहे. विशेष म्हणजे या पुस्तिकांचे लेखन लेखकद्वयांनी स्वतःच्या हस्ताक्षरात केलेले असल्याने मुलांना हस्ताक्षराचे वळण लावण्यास ही पुस्तिकांची माला उपयुक्त ठरण्यासारखी आहे. पृष्ठे प्रत्येकी १६. किंमत प्रत्येकी ७५ पैसे.

२. **मराठी लेखनादर्श** : लेखक : लक्ष्मण सखाराम रावले. सात भागांत प्रकाशित झालेल्या या पुस्तिकेला दादरच्या बालमोहन विद्या मंदिराचे संस्थापक व संचालक श्री. शि. द. रेगे यांचा अभिप्राय लाभला आहे. सुंदर व सुवाच्य हस्ताक्षरात लेखन कसे करावे, अक्षराचे अवयव कोणत्या क्रमाने काढून अक्षर पूर्ण करावे, नव्या अन् सुधारलेल्या लिपीचा शुद्ध लेखनाच्या दृष्टीने वापर कसा करावा—इत्यादी बाबींचा लहान मुलांना सराव होण्याच्या दृष्टीने या पुस्तिकांचे महत्त्व वाखाणण्यासारखे आहे. पृष्ठे प्रत्येकी ३२. किंमत प्रत्येकी १ रुपया.

× × ×

### अरगडे आणि मंडळी, पुणे : ३०

१. **धोंडू धमाले यांची वैज्ञानिक उलाढाल** : लेखक : प्रा. भालबा केळकर. विज्ञानाविषयी सर्वांनाच कुतूहल असते. मुलांना विशेष असते. हे लक्षात घेऊन श्री. भालबांनी काल्पनिक धोंडू निर्माण केला आहे आणि त्याला खऱ्याखुऱ्या विज्ञान-विश्वात वावरायला लावले आहे. त्यामुळे धोंडू धमाले मुलांची करमणूक तर करतोच, परंतु त्यांचे विज्ञानविषयक कुतूहलही वाढवत ठेवतो. पृष्ठे ९६. किंमत ३ रुपये.

२ **कथा-माधव** : लेखक : श्री. के. देवधर. विनोद विकासमालेतले हे तिसरे पुष्प आहे. या मालेचे संयोजक आहेत, गोपीनाथ तळवलकर. न्यायनिष्ठूर परंतु शूर आणि धार्मिक वृत्तीचे व शुद्ध शीलाचे नम्र प्रतीक म्हणून मराठ्यांच्या इतिहासात माधवराव पेशवे प्रसिद्ध होते. त्यांचे हे छोटेखानी चरित्र श्री. देवधरांनी सोप्या भाषेत लिहिले आहे. पृष्ठे ८६. किंमत ३ रुपये.

३. **साराच चमत्कार** : लेखक : गोपीनाथ तळवलकर. आता अंतराळयुगाची सुरुवात झाली आहे, मानव चंद्रावर जाऊन आला आहे. या कल्पनेच्या आधारे लेखकाने काही मित्रमंडळींचा घोळका मंगळावर नेला आहे. लेखकाने निवडलेल्या विषयास साजेशी वर्णने अन् भाषा असल्याने ही बालकादंबरिका चित्ताकर्षक झाली आहे. पृष्ठे ९०. किंमत ३ रुपये.

४. **झिमकोच्या गुहेत मधुराणी** : लेखिका : सौ. तारा कुलकर्णी. सौ. आशा भाजेकरांनी संयोजित केलेल्या 'किशोर आनंद' मालेचे हे पहिले पुष्प 'किशोरां'साठी वाचनीय झाले आहे. पृष्ठे ६४. किंमत २ रुपये.

५. **राजकन्या सप्टेंबर** : लेखिका : शकुंतला बोरगावकर. शकुंतलाबाईंच्या या पुस्तकात आहेत नऊ कथा. 'राजकन्या सप्टेंबर', 'दगड गाऊ लागले!', 'सोन्याचे हृदय शोधणारा राजपुत्र' आणि 'रात्रीच्या अंधाराची गोष्ट' ह्या कथा विशेष चांगल्या आहेत. पृष्ठ ६४. किंमत २ रुपये.

× × ×

### अनंत प्रकाशन, पुणे : ११

अनंत कथा या मालेतील शूर राजपुत्र हे पहिलेच पुस्तक द. श्री. टोळ आणि स. के. जोगळेकर यांनी लिहिले आहे. **शूर राजपुत्र, खेळण्यांची दिवाळी, झोपाळू बाळू आणि सिंहासनावर कोण?** अशा चार कथा या पुस्तकात आहेत. पुस्तक सचित्र असून किंमत ७५ पैसे आहे.

□ □ □

### इंदुमती भावे, शुक्रवार पेठ, पुणे : २

**'बालरंजन'**—स्वतः लेखिकेने प्रकाशित केलेल्या या बालगीतांच्या पुस्तकात एकूण एकतीस कविता आहेत. नामवंत बालसाहित्यिक श्री. गोपीनाथ तळवलकर यांची या पुस्तकाला प्रस्तावना आहे. 'बालरंजन'मधील गीतांचे विषय विविध आहेत. त्यामुळे जशी गीते करमणुकप्रधान आहेत, तशीच बोधप्रद आणि बालांच्या ज्ञानात भर घालणारीही आहेत. या पुस्तकातील बहुतांशी गीतांचे वैशिष्ट्य म्हणजे ती संगीतिकांसारखी संवादात्मक अन् म्हणून प्रयोगक्षम आहेत. पुस्तक सचित्र, छपाई बहुरंगी—वेधक व त्यांची किंमत फक्त दोन रुपये आहे.

□ □ □

# पैशाचा शोध

: वि. चिं. फडके :

पैसा ही वस्तू कुणाला प्रिय नाही? लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना पैसा हवाहवासा वाटतो. अरण्यात राहून कंदमुळांवर जगणारे साधु-संन्यासी सोडले तर इतर सर्व माणसे पैसा मिळविण्यासाठी धडपड करतात. कारण पैशामुळेच आपण आपल्या गरजा भागवू शकतो. एखादी वस्तू आपल्याला हवी असली म्हणजे आपण बाजारात जातो व पैसे मोजून ती वस्तू घरी आणतो. हा व्यवहार काही मिनिटांत आपण पार पाडतो. बाजाराचे ठिकाण घरापासून लांब असेल तर थोडा अधिक वेळ लागेल इतकेच. पण त्यासाठी विशेष यातायात करावी लागत नाही. इतका हा व्यवहार आज साधा, सरळ व सोपा झाला आहे.

परंतु शेकडो वर्षांपूर्वी दोन माणसांमधील एखादा व्यवहार इतका सहज व तडकाफडकी होत नसे. कारण त्यावेळी पैशाचा शोध लागला नव्हता. वस्तूंची किंमत सांगणारा पैसा अद्याप निर्माण व्हायचा होता. त्यामुळे प्रत्येक मनुष्य आपल्याजवळील वस्तूची किंमत इतर वस्तूंच्या संदर्भात सांगत असे आणि ही किंमत कधीच स्थिर नसे. कारण ती खरेदी-विक्री करणाऱ्या व्यक्तींच्या गरजेनुसार कमीजास्त होत असे. उदा. एखाद्या शेतकऱ्याला कापडाची गरज लागली तर तो कोष्ट्याकडे जाई व १० शेर गहू देऊन ५ वार कापडाची मागणी करी. म्हणजे शेतकऱ्याच्या मते १ वार कापडाची किंमत २ शेर गहू होती. परंतु कोष्ट्याला गव्हाची निकड नसेल तर तो १ वार कापडाच्या



मोबदल्यात ३ शेर गव्हाची मागणी करी. या उलट कोष्ट्याला गव्हाची फार जरुरी असे व तो शेतकऱ्याकडे कापड घेऊन आला आणि शेतकऱ्याला कापडाची विशेष निकड नसे तेव्हा तो १ वार कापडाच्या बदली फक्त १ शेर गहू देई.

अशा प्रकारे पूर्वी पैशाच्या अभावी वस्तूंचीच देवाणघेवाण होत असे. म्हणून याला वस्तुविनिमय असे नाव आहे. या पद्धतीत कोणकोणत्या अडचणी येत असत याची अनेक उदाहरणे सांगता येतील. परंतु नमुन्यादाखल एकदोन उदाहरणे सांगितली तरी पुरे होतील. रामाजवळ एक गाय आहे. पण त्याला प्रवासाला जायचे आहे म्हणून तो गाय घेऊन शिवाकडे जाईल व त्याच्या-जवळील घोड्याची मागणी करील. परंतु शिवाला गायीची गरज नसेल तर हा व्यवहार होणार नाही. किंवा शिवाला गाय हवी आहे; पण एका गायीच्या मोबदल्यात एक घोडा ही किंमत त्याला मान्य नसेल तरीही हा व्यवहार होणार नाही. समजा शिवाला गाय नको आहे, पण शेळ्या हव्या आहेत. तर रामा शेळ्या बाळग-णाऱ्या गोविंदाकडे जाईल व आपल्या गाईच्या बदली शेळ्या मागेल. मग एक गाय म्हणजे किती शेळ्या याबाबतीत घासाघीस होईल व जो दर ठरेल त्या दराने गायीच्या बदली शेळ्या घेऊन रामा शिवाकडे येईल. शिवाकडेही एक घोडा, म्हणजे किती शेळ्या यांचा काथ्याकूट होईल व दर पटला तरच व्यवहार पूर्ण होईल.



नाहीतर गाय जाऊन घोडा नाही पण नको असलेल्या शेळ्यामात्र घ्याव्या लागल्या असे रामाचे होईल. समजा गोविंदाला गाय नको, पण बैल हवा आहे. तर रामाला बैल सांभाळणाऱ्या हरीकडे जावे लागेल. गाय देऊन बैल घ्यावा लागेल. गोविंदाला बैल देऊन शेळ्या घ्याव्या लागतील आणि मग शिवाकडे जाऊन शेळ्या देऊन घोडा मिळविता येईल!


पैशाच्या अभावी एक साधा व्यवहार पुरा करताना रामाला किती अडचणींना तोंड द्यावे लागेल ते आपण पाहिले. पण याच कारणामुळे एका भटजीबुवांच्या नाकी नऊ कसे आले त्याची कहाणी सांगण्यासारखी आहे. हे भटजीबुवा हौस म्हणून एकदा देशाटन करायला निघाले. दुर्दैवाने अरबी समुद्रात त्यांचे जहाज फुटले.

सर्व माणसे बुडून मेली. भटजीबुवांचे नशिब बलवत्तर म्हणून ते वाचले. एका फळकुटाच्या आधारे तरंगत तरंगत ते एका बेटावर पोचले. त्यांना पाहून बेटावरच्या लोकांना फार आनंद झाला. त्यांनी भटजीबुवांकडून धार्मिक विधी करून घेतले. त्यांचा भरपूर आदर-सत्कार केला.

काही दिवसांनी भटजीबुवा मायदेशी परत जाण्यास निघाले. बिदागी म्हणून त्यांना एक गाय, पाच शेळ्या व पंचवीस नारळ मिळाले. ते सर्व घेऊन भटजीबुवा समुद्रकिनाऱ्याकडे जाण्यास निघाले. किनारा खूप दूर होता. त्यामुळे भरल्यापोटी चालत जायचा त्यांना कंटाळा आला. वाटेत त्यांना एक तट्टू दिसले. त्यांनी त्याच्या मालकाकडे तट्टाची मागणी केली. मालक म्हणाला,

"तुमच्याजवळच्या सर्व शेळ्या दिल्यात तर तट्टू मिळेल!"

भटजीबुवांनी विचार केला की शेळ्यांचा नाहीतरी काय उपयोग आहे ? त्यांनी शेळ्या दिल्या व तट्टू घेतले. तट्टावर बसून स्वारी डुलतडुलत निघाली. वाटेत त्यांना थोडी डुलकी लागली व ते रस्ता चुकले. काही केल्या किनारा सापडेना. मग एक माणूस भेटला. त्याने वाट दाखवायचे कबूल केले. परंतु त्या मोबदल्यात २५ नारळांची मागणी केली. भटजीबुवांनी नाइलाजाने सर्व नारळ देऊन टाकले व गायीला घेऊन ते पुढे निघाले.



किनाऱ्यावर आल्यावर एक नावाडी भेटला. त्याने समोर दूर अंतरावर दिसणाऱ्या भटजीबुवांच्या मायदेशाच्या किनाऱ्यावर त्यांना पोचविण्याचे मान्य केले. परंतु भाडे म्हणून गायीची मागणी केली. भटजीबुवांनी मोठ्या अनिच्छेने गाय देऊन टाकली व तट्टाला घेऊन ते नावेत बसायला लागले. तसा नावाडी म्हणाला.

"तट्टाला न्यायचं असेल तर जादा भाडे पडेल. तुमच्याजवळ दुसरी एखादी वस्तू आहे काय ?"

"नाही बुवा! गाय होती ती तुला दिली. आता अंगावरच्या कपड्याशिवाय दुसरं काही नाही!"

"मग तट्टाला राहू द्या इथेच!" नावाडी म्हणाला आणि त्याने नाव हाकारली. तट्टाची ताटातूट झाल्यामुळे दुःखीकष्टी झालेले भटजीबुवा नावेत बसले व हात हलवीत मायदेशी परत आले!

वर नमूद केलेल्या वस्तुविनिमय पद्धतीत वस्तूची किंमत ठरविता न येणे एवढी एकच अडचण नव्हती. तर इतर अनेक अडचणीही होत्या. उदा. एखाद्या वस्तूचे जेव्हा छोटे भाग पाडता येत नसत, तेव्हा त्या वस्तूच्या बदली दुसरी वस्तू मिळविणे अशक्य नसले तरी फार जिकिरीचे असे. एक घोडा म्हणजे दोन गायी अशी किंमत ठरल्यावर एका गायीच्या मोबदल्यात अर्धा घोडा मिळणे अशक्य होते आणि मिळाला तरी त्याचा उपयोग काय? आज एका रुपयाचे शंभर भाग पाडलेले आहेत. त्यामुळे टीचभर टाचणीपासून अजस्र जंबोजेटपर्यंत कोणत्याही वस्तूची खरेदी-विक्री करणे सुलभ जाते.

पैशाच्या शोधामुळे संपत्ती साठविणेही फार सोपे झाले आहे. पैसा नव्हता तेव्हा संपत्ती साठवायची म्हणजे धान्याच्या राशी, कापडाचे गठ्ठे व जनावरांचे कळप यांचा सांभाळ करावा लागे. एवढेच नव्हे तर धान्याला कीड लागू नये, कापडाला कसर लागू नये व जनावरांना रोगराई होऊ नये म्हणून काळजी घ्यावी लागे. पण आज लाखो रुपयांच्या नोटा, सोनेनाणे किंवा जडजवाहीर आपण छोट्याशा तिजोरीत सुरक्षित ठेवू शकतो.

आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे संपत्तीचे स्थलांतर करण्याचा होय. पूर्वीच्या काळी गव्हाची पोती व शेळ्या-मेंढ्यांचे कळप बरोबर घेऊन देशांतर करणे फार धोक्याचे व अवघड होते. आज तळेगावचा शेतकरी आपली जमीन विकून पैसे मिळवितो व त्या जोरावर पुण्यात एखादे घर बांधू शकतो किंवा पुण्याचा घर-मालक आपले घर विकून मुंबईत एखादा कारखाना काढू शकतो. विलंबित देण्याचे साधन याद्दष्टीने पैशाचे महत्त्व तर फारच आहे. पैशाच्या किंमतीत फार मोठे चढ-उतार होत नाहीत. त्यामुळे दीर्घ-मुदतीसाठी कर्ज म्हणून पैसा देण्या-घेण्याचे व्यवहार सुरळीतपणे होतात. आज घेतलेले कर्ज १० वर्षांनंतर परत केले तरी पैशाची किंमत फार घसरली आहे म्हणून कर्जाचे मुद्दल दुपटीने परत करा असे कुणी म्हणत नाही. परंतु पूर्वी कोणतीही वस्तू दीर्घमुदतीसाठी उसनी दिली जात नसे आणि कदाचित दिली तरी वसुली करताना दामदुपटीने वसूल केली जात असे. आज असे केले जात नाही. आपल्या पूर्वजांच्या मानाने आपण फार भाग्यवान आहोत नाही?

**ओळखा पाहू ? *ची उत्तरे***

१) [उत्तर–टॅक्सी]

२) [उत्तर–सिग्नल]

३) [उत्तर–पोस्टाची पेटी]

४) [उत्तर–रेडिओ]

# बकासुर



बकासुराला
लागली भूक
बाकीच्यांना
धाकधूक

डोंगराएवढा
भाताचा ढीग
एका घासात
रिचवली शीग

तुडुंब भरलेला
तलाव आपला
एका घोटात
पिऊन टाकला

दहा कोंबड्या
बोकड सहा
टोपलीभर मासे
केलेन स्वाहा

म्हणाला, एवढेच ?
पुरले नाही
आज पोट
भरले नाही

—वृंदा लिमये

## बट्टू

ज्ञानेश सोनार



## पुण्याच्या पाच युवकांचा पुणे ते श्रीनगर सायकल सफरीचा वृत्तांत



# दुचाकीवरून पुणे ते श्रीनगर


: विवेक देशपांडे :

डिसेंबर नुकताच संपत आला होता आणि आम्ही पाच जणांनी आमच्या दरवर्षीच्या व्रताप्रमाणे याही वर्षी भारताच्या नंदनवनात जायचे ठरविले. अर्थात आमची 'सोबतीण' पण आमच्याबरोबर येणार! तुम्ही विचाराल, ही कोण बुवा सोबतीण? सायकल, ....हो सायकलच! सुट्टी लागली की आमचे पाय 'स्फुरू' लागतात. पाच-सहा हजार किमी फिरून आल्याशिवाय बरेच वाटत नाही. यंदाही आम्ही या सायकल सफरीची तयारी सुमारे तीन महिने करीत होतो. मार्ग कोणता असावा, केव्हा निघावे, परत केव्हा यावे, कोणत्या ठिकाणी काय प्रसिद्ध आहे, ओळखपत्रे कोणाकडून घ्यावीत वगैरे गोष्टींचा विचार सुरू झाला. कॉलेज सांभाळून फावल्या वेळात ही कामे करावी लागत होती. जसजशी ३० एप्रिल ही तारीख जवळ येऊ लागली, तसतसे आमच्या उत्साहाला भरते येऊ लागले.

जपून जा, दरीत वगैरे डोकावू नका, उन्हाचा प्रवास टाळा अशा प्रेमळ सूचनाही मिळाल्या. ३० एप्रिलला, पुण्याच्या इतिहासप्रसिद्ध शनिवारवाड्यापासून सकाळी ८ वाजता आमची सफर निघाली. माझ्याबरोबर माझे चार मित्र होते–मुकेश शिन्दे, अरविन्द गोरे, विलास देशपांडे व दिलीप बागडे. एकजण म्हणाला, 'अरे विवेक, निघालो की आपण....!' दिलीप व विलास अगदीच नवखे म्हणून पहिल्याच दिवशी जास्त त्रास घ्यायचा नाही असे ठरविले. पहिला मुक्काम लोणावळा. मला व मुकेशला सायकलीचा खूप अनुभव होता. सबंध दक्षिण भारत, गोवा व श्रीलंका याप्रमाणे प्रत्येक सुट्टीत आम्ही प्रवास केला होता. जवळजवळ १५ हजार किमी चा अनुभव पाठीशी होता.

दुसऱ्याच दिवशी खंडाळ्याच्या घाटातून अत्यंत सावधानतेने निघालो. परंतु गडबडीत गोरेच्या टुलबॉक्समधले काही पाने व हत्यारे आम्ही घाटाला केव्हा दान केली हे लक्षातच आले नाही. पहाटे लवकर उठावयाचे व दहा वाजेपर्यंत भन्नाट सायकलींग करायचे. दुपारी आंघोळ, भोजन, विश्रांती व बघण्यासारखे काही असेल तर बघायचे. संध्याकाळी ५ ते ७ पुन्हा सायकलींग करायचे. कधीकधी रात्रीचा प्रवास करायचा. ही आमची दिन व रातचर्या.

भिवंडी या गावातून निघाल्यावर वज्रेश्वरीला चिमाजी आप्पाने बांधलेले देऊळ व गणेशपुरीचा नित्यानंद स्वामींचा मठ पाहून दि. ३ मेला आम्ही महाराष्ट्राची सरहद्द सोडली आणि गुजरातेत प्रवेश केला. खमणढोकळा हे गुजरातचे खास खाद्य. कोठेही जा, खमणढोकळ्यांनी स्वागत होणार. नवसारीला आल्यावर आम्हांला एकाने विचारले, 'Are you from Africa?' म्हणजे काय? आम्ही तसे काही अगदीच 'काळे' नव्हतो, परंतु उन्हामुळे फरक नक्कीच पडला असावा! नर्मदा नदीवरचा २ किमी लांबीचा मोठा पूल ओलांडून रात्री १–३० वाजता आम्ही भडोचला आलो. आणि रेल्वे स्टेशनवर [परवानगीने] वेटिंग रुममध्ये ताणून दिली. नाहीतरी सबंध प्रवासात आम्ही पोलिस स्टेशन, धर्मशाळा, रेल्वे स्टेशन यांचा आपलेच घर म्हणून आश्रय केला. बडोद्याच्या एका दिवसाच्या मुक्कामात गायकवाड पॅलेस, म्युझियम व सयाजी पार्क ही स्थळे पाहिली. सयाजी पार्कमध्ये एक छोटी आगीनगाडी आहे. छोटे रूळ, छोटे इंजिन, छोटी स्टेशने व छोट्या छोट्या डब्यात बसणारे छोटे प्रवासी असा हा छोट्यांचा थाट आहे. एका राजपुत्राच्या हट्टासाठी राजाने खास इंग्लंडमधून ही गाडी मागवली म्हणे. म्युझियममध्ये एका ८० फुटी व्हेल माशाचा सांगाडा पाहिला. असे सांगतात की मासा पकडला तेव्हा त्याच्या पोटात अनेक टेबल-खुर्च्या व माणसे सापडली. बडोद्यानंतर आणंदला अमुल दुधाची डेअरी पाहून गिरण्यांचे नगर म्हणून नावाजलेल्या अहमदाबादमध्ये प्रवेश केला. अहमदाबादेत झुलते मीनार, कांकरिया पार्क, प्राणिसंग्रहालय, बालवाटिका व साबरमती आश्रम ही स्थळे पाहिली. बालवाटिका



सायकलीवरून पुणे-श्रीनगर सफर करणारे पुण्याचे युवक : डावीकडून (१) अरविंद गोरे, (२) दिलीप बागडे, (३) मुकुंद शिंदे, (४) विवेक देशपांडे आणि (५) विलास देशपांडे.

ही खास मुलांसाठी असलेली बाग तर फारच मजेशीर आहे. छोटी बकऱ्याची गाडी, माणसाला लहान, उंच, लुकडा, जाडा करणारे आरसे, सिन्दबादच्या सफरीमधले एक जहाज अशा गंमतीजमती येथे आहेत. झुलत्या मिनारांचे वैशिष्ट्य हे की एक हलवला की दुसराही आपोआप हालतो. येथे आम्ही नवनिर्माण समितीचे नेते मनीष जानी, उमाकान्त मांकड, मुकेश पटेल यांना भेटलो. त्यांच्याबरोबर चर्चा केली. परंतु मध्यन्तरी झालेल्या दंगलीने खूपच नुकसान झाले आहे.

प्रांतीज या गावात जातो तर जिकडे तिकडे 'आंब्याच्या वनात नाच करणारे' मोर ! या गावात मात्र आम्हांला कडकडित उपास घडला. कारण गावात हॉटेलच नव्हते. परंतु याची सवयच झाली आहे; कारण सायकलीवरून जायचे म्हटले की अनंत अडचणींना तोंड द्यावे लागतेच. कधी काही अपघात होतो. कधी झोप अजिबात मिळत नाही तर कधी जेवणाला फाटा. परंतु आपले ध्येय गाठण्याची ईर्ष्या असल्याने अशा संकटांचे काही वाटत नाही. मोठा अंबाजी या गावात जाताना एक अवघड घाट लागतो तो चढताना आम्ही एक सबंध 'ग्लक्सोज डी'चा पुडा संपविला. कारण आमच्याजवळचे पाणीच संपले होते. हे गाव सोडल्यावर जेव्हा मारवाडात प्रवेश केला तेव्हा तेथे धुळीचे वादळ उठले होते. येथेच माझ्या सायकलला एका मोठ्या सापाने विळखा घातला. मग त्याला मारावेच लागले.

यानंतरचा टप्पा म्हणजे अबू रोड हे गाव. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही १४ मैलांचा अत्यंत कठीण घाट चढून अबूच्या पहाडावर गेलो. वरच्या गारव्याने आमचा सारा शीण गेला. दिलवाडा जैन मंदिराचे अप्रतिम कोरीव काम, समोरच सर्वांत उंचावर असलेले गुरु शिखर, नक्की झिल नावाचा रमणीय तलाव (इथे आम्ही मनमुराद बोटिंग केले), बाजूला असलेला बेडकाच्या आकाराचा 'होड रॉक' नावाचा दगड व सनसेट पॉइंटवरून दिसणारा सूर्यास्त पाहून मन प्रफुल्लित झाले.

दुसऱ्या दिवशी आम्ही सिरोही मार्गे राणकपूरला पोहोचलो. तेथील जैन-मंदिर तर सर्व भारतात प्रसिद्ध आहे. संध्याकाळी सायरा या गावाकडे निघालो असता वाटेत कोल्हयांचा भला मोठा कळप आडवा आला. थोडे घाबरलोच. परंतु आम्ही पाच जण असल्याने त्यांनी काही केले नाही. उदयपूरला पोहोचल्यावर मात्र तेथे दोन दिवस मुक्काम केला. उदयपूर हे भारतातील एक सुंदर शहर आहे. इथे आमच्या जेवणात 'दाल बाटी' नावाचा पदार्थ आला त्याने रात्री सामुदायिक पोटदुखी सुरू झाली. कणकेचा गोळा विस्तवावर अर्धा कच्चा भाजलेला असतो व त्यावर मुगाची डाळ घालतात. परत मात्र या पदार्थाला शिवण्याचे धैर्य झाले नाही. राणा प्रताप या महापुरुषाचे इथे स्मारक आहे. येथील राजवाडा तर खूपच सुन्दर आहे. वरच्या मजल्यावरून नजर टाकली असता सगळीकडे पांढऱ्या रंगाची घरे दिसतात. चांदण्या रात्री तर याची शोभा फारच मनोहर दिसते. बाजूलाच 'लेक पॅलेस' आहे. नंतर सुखाडिया सर्कलला वळसा घालून आम्ही भारतीय कला मंदिरात आलो. राजस्तानी कलाकुसरीचे येथे सुंदर प्रदर्शन आहे. कठपुतलीचा नाचही येथे पाहावयास मिळाला. 'सहलीयोंकी बाडी'त प्रवेश करताना दोन्ही बाजूला असलेली कारंजी एकदम सुरू होऊन तुमचे स्वागत करतात. पुढे एक छोटेसे तळे आहे. त्याच्या मधोमध एक छोटेसे घर व चारही बाजूला हत्ती आहेत. येथली कारंजी सुरू झाल्यावर जोराचा पाऊस यावा तसा तंतोतंत आवाज होतो. त्याचप्रमाणे दुसरी कारंजी सुरू झाल्यावर 'सावन-भादो' म्हणजे रिमझिम पाऊस पडतो तसा आवाज येतो. हे सर्व राजाने आपल्या सहा वर्षांच्या मुलीसाठी उभे केले.

उदयपुरच्या रम्य आठवणी बरोबर घेऊन आम्ही चितोडगडला गेलो. तेथला तो भव्य किल्ला, विजय स्तंभ, पद्मिनीच्या जोहाराची जागा ही स्थळे पाहाताना राजस्थानच्या दिव्य भूतकाळाच्या स्मृतींनी मन भरून आले. तेथून भिलवाडा मार्गे जयपूरला पोहोचलो. जयपुरास केळकर नावाच्या एका महाराष्ट्रीय सद्गृहस्थांकडे उतरलो. जयपुरला 'पिंक-सिटी' असे एक नाव असून या नावाप्रमाणेच या शहरात सर्वत्र गुलाबी रंगाच्या इमारती आहेत. शहरापासून



माउंट अबूवरील 'बेडूक खडक'


आठ किमी दूर असलेला 'अमेर पॅलेस', सुविख्यात 'हवामहल हे राजवाडे पाहिले. हल्ली येथे सरकारी ऑफीस आहे. एका राजवाड्यात ठेवलेले येथले म्युझियम प्रेक्षणीय आहे. पूर्वीच्या राजांचे कपडे, त्यांची मेजे, खुर्च्या, आरसे, शस्त्रे वगैरे वस्तू पाहाताना घटकाभर त्या काळात वावरतो आहोत, असा भास होतो. माधोसिंग नावाचा एक राजा होऊन गेला. वजन चारशे-साडेचारशे पौंड व उंची साडेसहा फूट असा अवाढव्य पुरुष होता तो. त्याच्या अंगरख्यात तर आम्ही तिघे चौघे सहज मावलो असतो. राजस्थान म्हटले की आपल्यापुढे रणरणते ऊन, रखरखीत वाळू असे दृश्य उभे राहते. परंतु उदयपूर-जयपूरसारखी शहरे पाहिली की ती कल्पना कशी चुकीची आहे हे पटते. जयपूर शहर इतके सुंदर आहे की भारताचे पॅरिस असे त्याला म्हणतात ते उगाच नाही. त्यातच जर आपण गाईडची मदत घेतली तर त्याच्या मिठास बोलण्यामुळे जे बघतो ते जास्तच सुन्दर भासते.

जयपूरनंतर आम्ही महुआ–भरतपूर मार्गे फत्तेपूर सिक्रीला पोहोचलो. येथला बुलंद दरवाजा पाहून मन थक्क होते. केवढा भव्य व भक्कम! पंचमहाल, बिरबलचा राजवाडा, अकबराच्या गुरूची कबर, दिवाण–इ–आम, दिवाण–इ–खास वगैरे ठिकाणे डोळे भरून पाहिली. ३० मेला, म्हणजे तब्बल एक महिन्याने आम्ही आग्र्याला पोहोचलो. भारतीय वास्तुकलेचा मुकुटमणी असलेला ताजमहाल पाहून आपण धन्य झालो असेच वाटले. त्याचे सौंदर्य वर्णनाच्याही पलीकडे आहे. डोळ्यांत व कॅमेऱ्यात फक्त साठवून घेणे हेच खूप झाले. शिवाजी महाराजांना औरंगजेबाने जेथे अटकेत ठेवले होते तो तिथला किल्ला पाहाताना अंगावर रोमांच उभे राहिले. मथुरेला जाताना पुन्हा एकदा भयानक वादळाला तोंड द्यावे लागले. मथुरा नगरीत द्वारकाधीशाचे मंदिर व यमुनेच्या काठावर असलेले वृंदावन ही पाहाण्याची स्थळे. कृष्ण-कन्हैयाच्या आठवणी डोक्यात घोळवीत आम्ही मथुरेचा निरोप घेतला. येथून भारताची राजधानी जवळ आहे. दिल्लीचे आता वेध लागले.

दिल्लीला आम्ही रात्री पोहोचलो. येथल्या महाराष्ट्र समाजात उतरलो व अगदी घरी आल्यासारखे वाटले. दिल्लीत आम्ही एकंदर सहा दिवस होतो. या मुक्कामात फरीदाबाद येथील अनेक कारखान्यांना भेटी दिल्या. तसेच महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी, अर्थमंत्री श्री. यशवन्तराव चव्हाण, श्री. मोहन धारिया, श्री. जगजीवनराम, श्री. केदारनाथ सहानी इत्यादी नेत्यांना भेटलो. यशवन्तरावजी व धारिया यांनी आमची आस्थेने चौकशी केली व मदतही केली. लालबहाद्दूर शास्त्री यांच्या पत्नी श्रीमती ललितादेवी शास्त्री व सुपुत्र हरिकृष्ण शास्त्री यांना भेटलो. त्यांनी तर आमचे फारच कौतुक केले. त्यांच्या घरात एका खोलीत शास्त्रीजींच्या सर्व गोष्टी जपून ठेवल्या आहेत. ज्या दिवशी शास्त्रीजी ताश्कंदला निधन पावले, त्या दिवशी बरोबर रात्री ११ वाजता घड्याळ बन्द पडले ते अजूनही तसेच ठेवले आहे. ते पाहिल्यावर त्या थोर नेत्याची आठवण येऊन डोळ्यांत पाणी आले. राष्ट्रपती भवन, पार्लमेंट हाऊस, जंतरमंतर, कुतुब मिनार, लाल किल्ला, तसेच पालम व सफ्तरजंग विमानतळ ही दिल्लीची ठिकाणे पाहिली.

दिल्ली सोडल्यावर आम्ही पानिपतच्या रस्त्याला लागलो. अतिशय सपाट रस्ता. दुतर्फा निलगिरीची झाडे. ऊन अजिबात लागत नव्हते. महंमदशहा अब्दाली व मराठे यांच्यात झालेल्या लढाईची जागा पाहिली. परंतु तेथे आता सर्वत्र शहर वसलेले आहे. रात्री येथल्या एका गुरुद्वारात उतरलो. तेथे आम्हाला जेवण देण्यात आले व आमच्या झोपण्याचीही व्यवस्था करण्यात आली. जात, धर्म याचा विचार न करता सरदारजी येणाऱ्या सर्व पथिकांची अशीच सोय करतात. एकूण पंजाबमध्येच आदरातिथ्य व सौजन्य अधिक! येथून आमचा पुढचा टप्पा होता अंबाला. अंबाल्याला तेथील एअर फोर्स स्टेशन पाहिले. अनेक मराठी जवानांना भेटलो. रात्री लुधियानाला जायला निघालो असता एका माणसाला रस्ता विचारला, 'क्यों भाई, लुधियाना को यही रास्ता जाता है क्या?' त्याने क्षणभर आमच्याकडे पाहिले व प्रतिप्रश्न केला, 'क्यों? आप क्या सर्कस के आदमी हैं क्या?' कारण आमचा वेष तसाच होता आणि त्या गावात नुकतीच एक सर्कस येऊन गेली होती. साऱ्या प्रवासात आम्हाला असे विक्षिप्त प्रश्न अनेकांनी विचारले, त्याने आमची करमणूकच झाली.

लुधियानाला पोहोचल्यावर आम्ही रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. चड्डा यांचेकडे उतरलो. वाटेत हिरो व सुपर या प्रसिद्ध सायकल



'मोतीमगरी बाग' उदयपूर

कंपन्यांना भेट दिली. त्यांनीही आम्हाला मदत केली. रोटरी क्लबने आम्हाला लोकरीचे पाच स्वेटर भेट दिले. येथे सर्वत्र छोटे छोटे उद्योगधंदे विखुरले आहेत व अनेक माणसे त्यांत गुंतलेली आहेत. अमृतसरला जाताना एका 'बोन फॅक्टरी'ला भेट दिली. अमृतसरला शिखांचे सुवर्ण-मंदिर, तसेच जालीयनवाला बाग ही ठिकाणे पाहिली. शिवाय ज्या 'मौतका-कुआ' विहिरीत दीडशे माणसे मेली, नव्हे शहीद झाली होती ती पाहिली. दुसऱ्या दिवशी भारत-पाकिस्तानची 'वाघा' बॉर्डर पाहावयास गेलो व तो संपूर्ण दिवस आपल्या जवानांबरोबर घालविला. परत येत असताना आम्हाला पाहून कोणीतरी माणसे म्हणाली, 'अरे वो देखो पाकिस्तानी आ गये?' लोकांचीही कमाल आहे! कोणी पाकिस्तानी म्हणतो, कोणी आफ्रिकन म्हणतो, तर कोणी सर्कसवाले म्हणतो! नशीब की आमच्यात कोणी नकटे नव्हते, नाहीतर चिनी म्हणायलाही कमी केले नसते. असो. अतिशय उकाडा सहन करीत आम्ही पठाणकोट मार्गे जम्मूला पोहोचलो.



**कै० लालबहाद्दूर शास्त्रींच्या पत्नी श्रीमती ललितादेवी यांच्या समवेत**

आता लवकरच भारताच्या नंदनवनात प्रवेश करणार होतो. उत्सुकता शिगेला पोचली होती. खूप सायकलींग केले. परंतु एकही जण दमला नव्हता. अंतिम ध्येय गाठताना सर्वांचे चेहरे एक वेगळ्याच आनंदाने चमकत होते. परंतु खरी कसोटी तर आताच होती. कारण जम्मू ते श्रीनगर हा २९४ किमी चा अत्यंत कठीण असा घाट लागला होता. हा सर्वच रस्ता उंच उंच डोंगरातून जातो. आम्ही तो पार करणार यात मला शंकाच नव्हती. परंतु किती वेळात पार करतो हे बघायचे होते. जम्मूला आम्ही रघुनाथाचे मंदिर पाहिले. एका टेकडीवर वसलेले हे गाव आहे. पहिल्याच दमात उधमपूर गाठले. एका बाजूला डोंगर, दुसऱ्या बाजूला दरी व सायकलवर २५-३० किलोचे सामान. चढावावर आम्ही कधी उतरून जात असू. चढायचे असूनसुद्धा सायकलला आपोआप वेग येत होता. सायकलीही आमच्याप्रमाणेच अधीर झाल्या होत्या! दुसऱ्या दिवशी रामबन गाठले. गुजराती, मारवाडी, हिन्दी, पंजाबी, डोगरी या भाषा केव्हाच मागे पडल्या होत्या व काश्मिरी भाषा कानावर पडावयास सुरुवात झाली होती. तिसरा दिवस बनीहाल या छोट्या गावात येऊन थांबलो. तिथे एकाएकी पाऊस पडून कडाक्याची थंडी पडली. रात्री आम्ही डोंगराच्या कुशीतच विश्रांती घेतली. चवथा दिवस. आम्ही बनीहालवरून निघालो व १५ किमी वर असलेल्या 'जवाहर टनेल'पाशी आलो. भारत व जर्मनी यांच्या सहकार्याने तयार झालेला हा आशियातील सर्वांत लांब बोगदा आहे. येथे एक मनस्ताप झाला. फोटो काढायला परवानगी नसताना मी फोटो काढले. परिणामी कॅमेरा जप्त होण्यापर्यन्त वेळ आली, परंतु सुदैवाने आतील फिल्मवरच निभावले.

आता मात्र श्रीनगर जवळ आले. फक्त ९० किमी सायकल भरभर पळत होती व अंतर सपाट्याने कमी होत होते. पॅपूर, अवन्तीपूर ही गावे लागली. श्रीनगर फक्त १० किमी राहिले. हे अंतर आम्ही अक्षरशः पाच-सात मिनिटांत कापले व २० जून रोजी सायंकाळी ४ वाजता श्रीनगरमध्ये पाय ठेवला. चित्रविचित्र कपडे घातलेले लोक, पिवळे धमक ऊन व निळे निळे डोंगर यांनी आमचे स्वागत केले. प्रथम टेलीव्हिजन सेंटरवरील आमचे मित्र श्री. मनोहरपन्त कुळकर्णी यांच्या घरी गेलो. ते आमची वाटच पाहात होते. गरमगरम चहा घेतला. सामान टाकले व बाहेर पडलो. आता चालतच बरे का!

काश्मीरमधील ती आमची पहिलीच संध्याकाळ. प्रत्येकाने आपापल्या घरी तारा केल्या की सुखरूप पोहोचलो. जरा भटकून आलो व वहिनींनी खास केलेल्या पिठले-भातावर ताव मारून निद्रादेवीच्या आधीन झालो.

सकाळी उठल्यावर प्रथम टुरिस्ट–सेंटरवर गेलो व त्यांच्याकडून संपूर्ण माहिती घेतली. या माहितीप्रमाणे गार्डन्स पाहावयास गेलो. डाव्या बाजूला दाल सरोवर. काठाकाठाने नागमोडी वळण घेत जाणारा रस्ता. समोर बर्फाने आच्छादलेले डोंगर. बाजूला फर, पाइन इत्यादी वृक्षराज. ऊन पडले होते तरीही वातावरणात एक प्रकारचा सुखद, हवाहवासा वाटणारा गारवा होता. शिकारे व हाऊस–बोटींची गर्दी झाली होती. हे सर्व पाहात निशात बागेपाशी केव्हा आलो ते समजलेच नाही. गुलाबाची व इतर अनेक सुंदर फुले, हिरवळ व कारंजी ही या बागेची वैशिष्ट्ये. सर्वत्र हिंडून घेतले व तसेच पुढे शालीमारला गेलो. तिथेही खूप धमाल केली. तिसऱ्या दिवशी आम्ही शिकारा ठरवला व दाल सरोवरात मनमुराद भटकलो. चारचिनार, नेहरु गार्डन, फ्लोटिंग गार्डन सर्व पाहिले. शिकाऱ्यातून जाताना छोट्या होड्यांतून गोबऱ्या लाल गालाची मुले फुले विकायला येतात. "बाबूजी–बाबूजी, फुल ले लो ना!" म्हणतात. सलवार व खमीस हा काश्मिरी स्त्रियांचा वेष, तर विजार व लांब शर्ट व त्यावर घोंगडी अगर शाल हा पुरुषांचा वेष. आम्ही चारचिनारमध्ये चहा घेतला. कपाला दीड रुपया पडला. चांगलाच फटका बसला. आता चौकशी केल्याशिवाय काही घ्यायचे नाही.

काश्मिरातला चौथा दिवस. उठलो तेव्हा पावसाला जोरात सुरुवात झाली होती. थंडीही भयंकर पडली होती. म्हटले, आता घरातच बसावे. १० वाजता ऊन पडले व त्याचा फायदा घेऊन बाहेर



सोनमर्ग काश्मीर



चार चिनार, श्रीनगर

पडलो, तर परत पावसास सुरुवात झाली. परंतु आता माघार घ्यायची नाही असे ठरवून अगोदर इतर बागा पाहिल्यावर शेवटी चष्मेशाही ही नवीन बाग बघून आलो. आज वातावरण धूसर होते. त्याचीही शोभा काही न्यारीच होती. आम्ही श्रीनगरमध्ये रमलो होतो. परंतु खरे काश्मीर म्हणजे गुलमर्ग, खिलनमर्ग, पहेलगाम, सोनमर्ग, अनंतनाग, व्हेरीनाग. यातले काही बघितले नव्हते. तेव्हा प्रथम सोनमार्ग गाठले. आजूबाजूला उंचच उंच पहाड व त्यांच्या डोक्यावर बर्फ पडलेले. डोंगरांनी बर्फाच्या टोप्या घातलेल्या. हिरवी गर्द झाडी, पांढरे शुभ्र बर्फ, निळे डोंगर, फिकट निळसर आकाश असे हे निसर्गाचे रूप पाहून मन मोहरून आले. सोनमर्गला ग्लेशीअर्स पाहाण्यासाठी घोड्यावरून गेलो. माझा घोडा नाठाळ होता. मध्येच तो चौखुर उधळायचा व मग आवरता आवरता नाकी नऊ यायचे. बर्फ पाहिल्यावर तर आम्ही जवळजवळ ताळतंत्रच सोडला व 'याज साठी केला होता अट्टाहास' असे म्हणत बर्फावर भटक भटक भटकलो. त्याचे चेंडू करून एकमेकांना मारले. आइसक्रिमसारखा भुसभुशीत बर्फ तो काय लागणार ? घसरगुंडी केली. इकडे तिकडे बघत थोडा बर्फ तोंडातही टाकला. सायंकाळी परत आलो. नंतर गुलमर्गला गेलो. रस्त्यांच्या दोन्ही बाजूला उंचच उंच झाडे व भातशेती होती. जिकडे नजर जाईल तिकडे हिरवीगार शेते वाऱ्याबरोबर डुलत होती. तनमर्गला पोहोचल्यावर तनमर्ग ते गुलमर्ग हे अंतर डोंगरातून पार केले. गुलमर्गचे गोल्फ ग्राउंड जगातील सर्वांत मोठे व उंचीवरचे आहे. समोर खिलनमर्गला बर्फच बर्फ पसरलेला दिसत होता. मैदान पायी तुडवत आम्ही 'रोप ट्रॉली'-कडे गेलो व १ किमी. अंतर चक्कर मारून आलो. अडखळत धडपडत. परंतु तेनसिंगच्या आवेशात आम्ही खिलनमर्ग गाठले व तिथेही तोच धिंगाणा घातला.

एक दिवस मुख्य मंत्री मिर कासिम, गव्हर्नर एल. के. झा व शेख अब्दुल्ला यांच्या भेटी घेतल्या. सर्वांनी आमची विचारपूस केली. आम्ही त्यांच्याबरोबर आमचे फोटोही काढले. रेडिओवर व मनोहरपंत कुळकर्णी यांच्यामुळे श्रीनगर टी. व्ही. वर आम्ही चमकलो. आमची २०० फूट फिल्म घेतली गेली व १० मिनिटांचा 'लाइव्ह प्रोग्रॅम' झाला. हा कार्यक्रम पाकिस्तानातही दिसला. एका टेकडीवर असलेले शंकराचार्यांचे मंदिर व टीव्ही टॉवर पाहिला. येथून श्रीनगरचे दृश्य फारच मनोहर दिसते. शेवटचा दिवस आम्ही खरेदीसाठी ठेवला होता. काश्मिरी कोट, शाली, साड्या, निरनिराळ्या प्राण्यांच्या कातड्याच्या मनीपर्स व काश्मिरचे प्रसिद्ध केशर अशी काही खरेदी केली. काश्मीरमधले १० दिवसांचे वास्तव्य संपवताना मनापासून वाईट वाटले. आमचा तेथील एक दोस्त—त्याचे नाव चुनीलाल म्हणजे नाव मारवाडी, जातीने पंजाबी व राहतो काश्मीरमध्ये—याच्या घरी शेवटच्या दिवशी पाहुणचार झोडला. त्याने आम्हाला खास लोणी-मीठ घातलेला 'कश्मीरी चाय' दिला. तोंड वेडेवाकडे करीत आम्ही तो संपवला. बदाम, पिस्ते, अक्रोड, आलबुखार व सफरचन्दे तर रोज 'अधाशासारखे' खात होतो. शरीराने तेथून निघालो परंतु मन दाल सरोवरात व डोंगरात आणि बर्फात रेंगाळत मागेच राहिले होते.

येताना वाटेत पहेलगामला गेलो. चन्दनवाडीतील बर्फाचा पूल पाहिला. येथून अमरनाथ फक्त १८ मैलांवर आहे. परंतु वेळेअभावी लांबूनच नमस्कार केला. घराबाहेर पडून खूप दिवस झाले होते व आता घरची ओढ लागली होती. तशात पाऊसही चांगला पडू लागला होता. परतीचा प्रवास मध्यप्रदेशातून ग्वालेर, झाशी, भोपाळ, इंदोर या मार्गाने केला. २० तारखेला आमचा लोणावळा-पुणे हा प्रवास सुरू झाला. तीन महिने एकत्र राहिलो, जेवलो,

# नारळ आला जन्माला



फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे नारळाची.
नारळ तेव्हा माहीत नव्हता.
नारळाचा जन्मच व्हायचा होता.
ताड, माड, वड, पिंपळ असायचे शेजारी,
व्हायची भांडणं नि शेवटी मारामारी.
माडाला असलं आवडायचं नाही.
भांडणात तो पडायचा नाही.
मनाशी काहीतरी निश्चय केला.
मित्राजवळ बोलून गेला.
आकाशाशी दोस्ती करीन, चांदण्याशी गप्पा मारीन.
ढगांच्या पाठीमागून, तुमची भांडणं दुरून पाहीन.
बेत ठरला, माड निघाला, उंच उंच, खूप उंच उंच
उंच घराहून उंच छपराहून उंच. डोंगराहून उंचच
उंचच उंच जाऊन थकला.
भोवळ आली. डोळे लागले फिरायला.
आकाश काही भेटेना, ढग काही दिसेनात.
दुःख झाले माडाला.
'देवा देवा' आता काय करू,
मधे कसा राहू, खाली कसा जाऊ, भांडखोर मित्रांना
तोंड कसं दाखऊ,
संगतीत त्यांच्या कसा बरं राहू.
अशांची मैत्री मला नाही आवडत,
संगत सोडून आलो वर पळत.
देव म्हणाला, "घाबरू नकोस," असा निराश होऊ
नकोस."
असाच स्वभाव आवडतो मला. चांगलं बक्षीस देईन
तुला गोड सुंदर फळांचा ठेवा. बहाल तुला, केला
पाहून करतील सगळे हेवा.
असं अमोल फळ जपायला,
तुला असच उंच पाहिजे राहायला
असा नारळाचा जन्म झाला.
माडाच्या झाडाला आनंद झाला.

सौ. मालती बर्वे

गप्पागोष्टी केल्या. अनेकांना भेटलो. संकटांना धैर्याने सामोरे गेलो. या सर्व रम्य आठवणी मनात घोळवीत त्या दिवशी संध्याकाळी ४ वाजता पुण्यात पाऊल टाकले. शनिवारवाड्यापाशी पुण्याचे मेयर श्री. भाई वैद्य, तसेच नातेवाईक व मित्रमंडळी यांनी आमचे प्रेमाने व उत्साहाने स्वागत केले.

आम्ही जशी ही सायकल–सफर केली तशीच तुम्हीही करा. प्रथम छोट्या छोट्या व नंतर मोठ्या सायकल–सफरी कराव्यात. आपल्या एकट्या हिन्दुस्थानातच पाहाण्यासारखी ठिकाणे जागोजागी आहेत. फक्त आपले डोळे उघडे पाहिजेत. लोक धाडसाला नेहेमीच पाठिंबा देतात.

....एक शायर म्हणतो;
"सैर कर दुनीयाकी गाफील, जिन्दगानी फिर कहाँ !
अगर जिन्दगानी कुछ बची तो नौजवानी फिर कहाँ !"


प्रवासासारखे सुख व तेही तारुण्यातच अनुभवण्यात खूपच मजा आहे, थ्रिल आहे. तेव्हा प्रवास करा, तुमच्या ज्ञानात, अनुभवात सारखी भर पडत राहील. मग ठरवा तर बेत !

# किशोर – कॅमल
## रंग स्पर्धा

प्रवेश फी नाही

**बक्षिसे मिळवा**

कॅमल — १ ले बक्षिस रु. १५
कॅमल — २ रे बक्षिस रु. १०
कॅमल — ३ रे बक्षिस रु. ५
कॅमल — उत्तेजनार्थ बक्षिसे ५
किशोर — उत्तेजनार्थ बक्षिसे ५
कॅमल — प्रशस्तिपत्रें १०




■ १२ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यासाठी ही स्पर्धा आहे. कोणत्याहि कॅमल रंगात वरील चित्र रंगवा ■ चित्र रंगवून पुढील पत्त्यावर पाठवा. 'किशोर—कॅमल रंग स्पर्धा' 'नीलम' १०८, वरली सी फेस रोड, मुंबई १८ ■ परीक्षकाचा निर्णय अंतिम राहील.
■ या बाबत कोणताहि पत्रव्यवहार केला जाणार नाही

नांव ........................................ वय ....................

पत्ता ........................................................

चित्रे पाठविण्याची अंतिम तारीख 31 ऑक्टो. १९७४

Vision

....... याठिकाणी कापून पाठवा. .......

# दिवाळीच्या थाटामाटात 'किशोर'चा थाटमाट

# किशोर

## दिवाळी अंक : नोव्हेंबर ७४

किशोरच्या दिवाळी अंकात तुमच्यासाठी कोणकोण लिहिणार आहे पाहा :

- ना. सी. फडके
- कमलाबाई टिळक
- वि. ह. कुळकर्णी
- दुर्गा भागवत
- वामन चोरघडे
- कुसुमाग्रज
- बा. भ. बोरकर
- पु. शि. रेगे
- रा. भि. जोशी
- इंदिरा संत
- अ. वा. वर्टी
- विजया राजाध्यक्ष
- वसंत सबनीस
- विंदा करंदीकर
- मंगेश पाडगावकर
- वा. रा. कांत
- शांता शेळके
- पु. रा. बेहेरे
- सुमती पायगावकर
- वसंत बापट
- मधु मंगेश कर्णिक
- रमेश मंत्री
- उमाकांत ठोमरे
- आशा भाजेकर
- शकुंतला आठवले
- वृंदा लिमये

आणि इतर नामवंत

शिवाय जयवंत दळवींची एक खूप खूप गंमतीची चित्रकथा या अंकापासून सुरू होत आहे.

आणि

'आमचा गाव' या तुमच्याकरिता खास ठेवलेल्या लेखस्पर्धेतील

पहिल्या तीन पारितोषिक विजेत्यांचे लेख

रंगीत चित्रे, व्यंग चित्रे यांची तर रेलचेल

**किंमत रु. ३**

विक्रेत्यांनी आगाऊ रकमेसह ताबडतोब मागणी नोंदवावी.

# महिला क्रिकेट

## ऑल इंडिया ओपन इन्व्हिटेशन टुर्नमेंट—बंगलोर

भारतात १९३३ सालापासून कसोटी क्रिकेट सामने चालू झाले. आणि पुरुषांप्रमाणे महिलांनाही या खेळात गोडी वाटू लागली. १९७१ मधी भारतीय क्रिकेटवीरांच्या वेस्ट इंडिज व इंग्लंडमधील महान विजयांमुळे हे आकर्षण दुणावले आणि भारतातील बहुतेक सर्व राज्यांतल्या मुलींनी क्रिकेट खेळणे चालू केले. 'भारतीय क्रिकेटचे माहेरघर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईत तर १९७० पासूनच क्रिकेट क्लब ऑफ इंडियातला मुलींसाठी क्रिकेटचा सराव चालू झाला होता.

त्यानंतरच्या या तीनचार वर्षात भारतीय महिलांची क्रिकेटच्या क्षेत्रातील प्रगती निश्चित कौतुकास्पद आहे. १९७३ साली भारताने 'विमेन्स इंटरनॅशनल क्रिकेट कॉन्फरन्स'चे सदस्यत्व प्राप्त करून घेतले. १९७५ च्या फेब्रुवारीत ऑस्ट्रेलियन महिला येथे तीन कसोटी व पाच विभागीय सामने खेळण्यास येणार असल्याचे समजते.

१९७२ व १९७३ मध्ये झालेल्या आंतर–राज्य स्पर्धांपैकी पहिली मुंबईने जिंकली व दुसरी पश्चिम बंगालने. पहिल्या स्पर्धेत फक्त तीन संघ उतरले होते, तर दुसरीत आठ. यावरून आपल्याला क्रिकेटवरील महिलांचे प्रेम कसे वाढते आहे याची कल्पना येते. १९७२ मध्ये पुण्यात मुलींसाठी एक कोचिंग कॅम्प पण आयोजित करण्यात आला होता.

गेल्या महिन्यात कर्नाटक महिला क्रिकेट असोसिएशनने बंगलोरमध्ये महिलांसाठी एक ऑल इंडिया ओपन इन्व्हिटेशन टुर्नमेंट आयोजित केली होती. १६ ते २१ ऑगष्टच्या दरम्यान खेळल्या गेलेल्या या स्पर्धेसाठी सहा संघांना आमंत्रण होते. हे संघ होते : मुंबई, महाराष्ट्र, तामीळनाडू, उत्तर प्रदेश व कर्नाटक 'अ' आणि 'ब'. त्या स्पर्धेची ही हकिकत.



पहिला सामना होता महाराष्ट्र व उत्तर प्रदेश या दोन संघात. महाराष्ट्राने पहिल्या डावात उत्तर प्रदेशपेक्षा जास्त धावा केल्या व एक दिवसाचा हा सामना जिंकला. महाराष्ट्राची कर्णधार उज्ज्वला निकम हिने उत्तर प्रदेशच्या पाच विकेट्स घेतल्या.

१७ ऑगष्टला एक अतिशय गंमतीशीर सामना खेळला गेला. मुंबई व कर्नाटक (ब) मधील या सामन्यात कर्नाटकच्या मुली आपल्या पहिल्या डावात फक्त पाचच धावा करू शकल्या! मुंबईची फास्ट बोलर बेहरोझ एदलजी हिने तर विक्रमी गोलंदाजी केली. तिचे पृथक्करण होते : ७ ओव्हर्स, ७ मेडन्स, ० रन्स व ७ विकेट्स! यात एक हॅट-ट्रिकसुद्धा होती! तिची बहीण डायना हिने ३ ओव्हर्सपैकी २ मेडन ओव्हर्स टाकल्या व २ रन्स देऊन ३ विकेट्स घेतल्या. एकूण एदलजी भगिनींनी हा सामना गाजवला!

यानंतर आपल्या पहिल्या डावात केवळ ऐंशी मिनिटांत तुफान फटकेबाजी करीत मुंबईच्या फलंदाजांनी ६० धावा केल्या. मीना ठक्कर (२७) व शोभा पंडित (१९) या सलामीच्या फलंदाजांनी सुरेख खेळ केला. कर्नाटक (ब) संघाने दुसऱ्या डावात ६ गडी बाद



४२ धावा केल्या व आपली पहिल्या डावात ढासळलेली प्रतिमा थोडीशी सावरली. दुपारी गोलंदाजांना विकेट बिलकूल साथ देत नसल्यामुळे फलंदाजांचे काम अधिकच सोपे झाले.

कर्नाटक (अ) व महाराष्ट्र या संघातील उपांत्य सामन्यात सुरुवातीला कर्नाटकाच्या ६ विकेट्स फक्त १७ धावांत पडल्या, पण नंतर त्यांनी डाव उत्तम प्रकारे सावरला व महाराष्ट्रावर मात केली. उज्ज्वला निकमने पुन्हा ५ विकेट्स घेतल्या.

तामीळनाडू व मुंबईमधील दुसऱ्या उपांत्य सामन्यात बलवान मुंबई संघाला नशिबाने साथ दिली नाही. रणजी ट्रॉफी सामने जिथे पूर्वी खेळले जात त्या सेंट्रल कॉलेज ग्राउंडवर ह्याही स्पर्धेतील सामने खेळले गेले. इथे सकाळी खेळ सुरू झाल्यावर तास-दीड-तास गोलंदाजांना विकेटची साथ मिळत होती. हवेमुळे बॉल स्विंग पण व्हायचा. कर्नाटक 'ब' विरुद्ध टॉस जिंकल्यावर त्यांना अशा वातावरणात फलंदाजी देऊन मुंबईची कप्तान नीता तेलंग हिने त्यांना हवालदिल करून सोडले होते. इथे दैवाचे फासे नेमके उलटे पडले व मुंबईची तीच गत झाली. तामीळनाडूने टॉस जिंकून मुंबईला फलंदाजी दिली. त्यांचे एकेक मोहरे वळणाऱ्या चेंडूविरुद्ध अपयशी ठरले व सबंध संघ फक्त १८ धावांत उडाला. याही सामन्यात जलद गोलंदाज यशस्वी ठरले. तामीळनाडूच्या सुझन इटिचेरी हिने ५ विकेट्स घेतल्या, तर प्रभा रामक्रिशनने ३ जणींना बाद केले. तामीळनाडूच्या मुलींचे क्षेत्ररक्षण या सामन्यात अतिशय प्रेक्षणीय झाले. इथे विशेषतः प्रीती दलाल हिचा उल्लेख करावासा वाटतो. ॲलर्जीने सुजलेल्या हातांनी तिने मीना ठक्करचा एक अतिशय जोरात मारलेला फटका स्क्वेअर लेगला अचूक पकडला व मुंबईच्या फलंदाजांची जा-ये सुरू केली. याशिवाय गीता शिरनामे हिला तिने शिताफीने धावबाद केले.

त्यानंतर तामीळनाडू संघाने ५३ धावा केल्या व मुंबईवर ३५ धावांची आघाडी मिळवली. यात यष्टीरक्षक व सलामीची फलंदाज फॉशिया खलीली हिच्या १८ धावा होत्या. मुंबईचे क्रिकेटर (पुरुष!) त्यांच्या चिकाटीसाठी व लढाऊ वृत्तीसाठी ओळखले जातात. आपल्या शहराच्या नावाला मुंबईकर मुलींनी काळिमा लागू दिला नाही. लंचपर्यन्तच्या अर्ध्या तासात त्यांनी तामीळनाडूला फक्त ५ धावा करू दिल्या व अतिशय उत्तम क्षेत्ररक्षण व गोलंदाजी करून अखेरपर्यन्त माघार घेतली नाही. पहिल्या डावावर मॅच हातातून गेली, तरी त्यांनी दुसऱ्या डावात सुंदर फलंदाजी केली. मीना ठक्कर व शोभा पंडित यांनी पहिल्या विकेटसाठी ३३ धावा नोंदवल्या; पण त्यानंतर मॅचमध्ये रस न राहिल्यामुळे फटकेबाजी करीत मुलींनी आपल्या विकेट्स दिल्या. सामना संपला तेव्हा त्यांचा स्कोअर होता ४ बाद ४४.

अंतिम सामन्यात कर्नाटकने सर्व गडी बाद ७४ धावा केल्या. त्यात कर्णधार आर. शांता हिच्या २५ धावा होत्या. पण तामीळनाडूने १५० मिनिटांत ४ गडी बाद ७५ धावा करीत हा सामना व ट्रॉफी जिंकली. त्यात कर्णधार सुधा शहा हिच्या ३५ धावा होत्या.

ही स्पर्धा संपल्यावर एक गोष्ट जाणवली ती अशी की या सगळ्या संघांत गोलंदाजी व फलंदाजीत जास्त बलवान असूनही मुंबईला नशिबाने दगा दिला. शास्त्रशुद्ध फलंदाजी तर मुंबईच्या मुलींकडूनच पाहायला मिळाली. पण त्यांचे क्षेत्ररक्षण मात्र इतर सर्व संघांपेक्षा खूपच डावे होते. 'कॅचेस विन् मॅचेस,' ही म्हण लक्षात घेऊन जर मुंबईने क्षेत्ररक्षणाचा सराव केला तर ते नक्कीच फायदेशीर ठरेल. पूर्वीच्या काळातील भारतीय संघांचे कच्चे क्षेत्ररक्षण त्यांना नडले, पण वाडेकरच्या संघाने केलेल्या अचाट क्षेत्ररक्षणामुळेच भारतीय क्रिकेटचा दर्जा उंचावला. सोलकर, वेंकट, गावसकर, वाडेकर, अबिद, इंजिनियर, ब्रिजेश पटेल व पारकर यांसारख्या आपल्या क्षेत्ररक्षकांचे आदर्श आपण डोळ्यांसमोर ठेवलेच पाहिजेत.

या स्पर्धेतील अंपायरिंगचा दर्जा यथातथाच होता. विशेषतः तामीळनाडू-मुंबई या सामन्यात तामीळनाडूविरुद्ध मुंबईने केलेल्या बऱ्याच 'लेग बिफोर विकेट'च्या अपिलांना अंपायर्सकडून दाद



## सात रंगाच्या सात पोरी

सात रंगाच्या सात पोरी
गात गात आल्या
तळ्यात निळ्या बुडाल्या नि
निळ्या निळ्या झाल्या

निळ्या निळ्या पोरी मग
मळ्यात गेल्या तशा
काऊचिऊ पाखरांची
आली त्यांना भाषा

पाखरांच्या राजाने
त्यांना दिले पंख
पऱ्या होऊन पोरी त्या
उडून गेल्या उंच

—उत्तम कोळगावकर

मिळाली नाही. या उलट अनेकदा फलंदाजाने ऑफ स्टंपच्या बाहेर चेंडूला पाय लावला असताना, किंवा चेंडू लेग स्टंपच्या बाहेर पिच होऊन विकेटजवळ नसताना फलंदाज बाद ठरवले गेले. मुलींचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी चांगल्या अंपायरिंगची गरज आहे.

ही स्पर्धा जिंकल्याबद्दल तामीळनाडूचे अभिनंदन. आता आंतर-विभागीय सामने व आंतर राज्य सामने होणार असल्यामुळे भारतीय मुली ऑस्ट्रेलियन संघाला बऱ्यापैकी टक्कर देऊ शकतील असे वाटते.

पण बंगलोरची ही स्पर्धा अतिशय प्रेक्षणीय झाली हे निश्चित. मुलींना क्रिकेटबद्दल काही कळत नाही व त्यांना खेळता तर येणारच नाही असे म्हणणाऱ्या लोकांची बरीच जिरली असावीसे वाटते.

—सिली पॉईंट

### 'किशोर' ऑगस्ट ७४ अंकातील कोडयाचे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बं | दू | क | ■ | ■ | ख | त | ■ |
| ग | ■ | हा | र | तु | रा | ■ | फे |
| ला | व | णी | ■ | मा | रा | मा | री |
| ■ | ख | ■ | धा | न | ■ | घा | ■ |
| प | र | क | र | ■ | घ | र | टे |
| हा | ■ | म | ■ | क | ड | ■ | क |
| र | ता | ळे | ■ | स | वं | ग | डी |
| ■ | ल | ■ | मि | र | ची | बँक ऑफ महाराष्ट्र | |

# तुमचा शब्दसंग्रह वाढवा

**संस्कृत भाषेतील एक श्लोक खाली दिला आहे. श्लोकाबरोबर त्याचा अर्थ व त्यातील अवघड शब्दांचा अर्थही दिला आहे. हा श्लोक घरातील जाणत्या माणसाकडून समजावून घ्या व पाठ करा. त्यामुळे तुमच्या शब्दसंपत्तीत आपोआप भर पडेल.**

किं वाससैवं न विचारणीयं
वासः प्रधानं खलु योग्यतायाः
पीताम्बरं वीक्ष्य ददौ स्वकन्यां
चर्माम्बरं वीक्ष्य विषं समुद्रः ॥ ७ ॥

**संदर्भ :** एका पौराणिक कथेचा आधार असलेले व कापडाचे महत्त्व पटवून देणारे असे हे रंजक सुभाषित आहे.

अमृताच्या प्राप्तीसाठी देवांनी व राक्षसांनी एकत्र येऊन व मंदारपर्वताच्या रवीला वासुकी सर्पराजाची दोरी बांधून क्षीरसमुद्र घुसळावयास प्रारंभ केला. लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक वगैरे उत्तम उत्तम वस्तूंबरोबर हालाहलासारखे विश्वनाशक भयंकर विषही क्षीरसमुद्रातून निर्माण झाले.

वाटणी करताना क्षीरसमुद्राने स्वतःची रूपसुंदरी कन्या लक्ष्मी विष्णूला (तो काळा-निळा असूनही) दिली. कारण विष्णूने सुंदर रेशमी पीताम्बर धारण केलेले होते! पण शंकराला मात्र (तो गोरा असूनही) हालाहल विष स्वीकारावे लागले. कारण त्याने जाडे भरडे चर्माम्बर (कातड्याचे वस्त्र) धारण केले होते!!



**अर्थ :** वस्त्राचा काय उपयोग? असे विचारणे योग्य नाही. (कारण लौकिक व्यवहारात माणसाच्या) लायकीचे वस्त्र (हेच) खरोखर मुख्य (कारण) आहे.

(उदाहरणार्थ...क्षीरसमुद्राच्या मंथनाच्या वेळी) क्षीरसमुद्राने आपली (सुंदर) मुलगी (लक्ष्मी), (विष्णूचे) (सुंदर) पिवळसर (रेशमी) वस्त्र पाहून (त्याला) दिली व (हाला-हल) विष (मात्र) कातड्याचे वस्त्र पाहून (शंकराला) दिले!

**तात्पर्य :** "apparel oft – proclaims the man"
—शेक्सपियर "एक नूर आदमी, दस नूर कपडा"

शब्दार्थ

**किम्**–काय? काय उपयोग? **वासस्** (**वासः**)–वस्त्र, कापड.
**एवम्**–असे, याप्रमाणे, (**वाससा+एवम्**)
**विचारणीयम्**–विचारण्यास योग्य. **प्रधानम्**–मुख्य कारण. **खलु**–खरोखर.
**योग्यता**-लायकी, पात्रता. **पीताम्बर**–(पीत+अम्बर) पिवळे वस्त्र. **वीक्ष्य**–पाहून.
**ददौ**–दिली. **स्वकन्या**-स्वतःची मुलगी. **चर्माम्बर**-(चर्म+अम्बर) कातडी वस्त्र, वल्कल. [**अम्बर**—'वस्त्र' व 'आकाश' असे दोन अर्थ आहेत.]




# कुणी आहे का?



**या** असीम विश्वात आपण ज्यांच्याशी संवाद करू शकू असे आणखी कोणी प्राणी आहेत का ? रात्री आकाशात आपण अगणित तारे पाहातो. या ताऱ्यांपैकी कोठे एखाद्या ताऱ्यावर किंवा ग्रहावर आपल्यासारखा बोलणारा, विचार करणारा, शास्त्रीय साधनांचा उपयोग करून अंतराळाचा वेध घेणारा, अंतराळाची यात्रा करण्याची आकांक्षा बाळगणारा आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पृथ्वीवरच्या आपणा मानवाबरोबर संवाद करण्याइतपत ज्याने वैज्ञानिक प्रगती केली असा कोणी प्राणी आहे का ?

आज जगातले काही मोठेमोठे खगोलशास्त्रज्ञ या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यात गढून गेलेले आहेत. विश्वाचे ज्ञान करून घेण्याच्या बाबतीत चालू शतकात आणि विशेषतः गेल्या पंचवीस वर्षांत मानवाने मोठीच आघाडी मारली. आजवर गूढ राहिलेली विश्वातील कित्येक रहस्ये आपण उलगडविली आहेत. तथापि पृथ्वीवर आहे तसे जीवन विश्वात आणखी कोठे आहे का ? ही जिज्ञासा माणसाला आजच नव्हे तर कित्येक शतकांपूर्वीपासून लागून राहिलेली आहे. ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात मेट्रोडोरॉस नावाचा एक तत्त्ववेत्ता होऊन गेला. तो म्हणतो, "अनंत अवकाशात पृथ्वीवरच फक्त सजीवांची वस्ती आहे असे मानणे म्हणजे सबंध शेतात धान्याची पेरणी केल्यानंतर फक्त एकच दाणा उगवून येईल असे सांगण्यासारखे आहे." खरे तर माणसाला अंतराळातील ग्रहताऱ्यांच्या अस्तित्वाची प्रथम जाणीव झाली तेव्हापासूनच विश्वात कोठेतरी

आपल्यासारखी माणसे म्हणा किंवा असेच कोणी प्राणी म्हणा, असावेत हा विचार सुचला आणि आजतागायत अखंडपणे माणूस त्या दृष्टीने विश्वाचे निरीक्षण करीत आहे व उपलब्ध साधनांच्या साहाय्याने विश्वाचा वेध घेत आहे. आज अंतराळ यात्रेच्या प्रचंड खर्चाच्या ज्या योजना हाती घेण्यात येत आहेत त्या सर्वांच्या मुळाशी पृथ्वीच्या बाहेर विश्वात आणखी कोठे सजीव सृष्टी आहे का ही जिज्ञासा सुप्तपणे असतेच. या दृष्टीने खगोलशास्त्रज्ञ जे संशोधन करीत आहेत त्यातून आता आणखी एका शास्त्राचा जन्म झाला आहे. 'एक्सोबायॉलॉजी' म्हणजे परजीवशास्त्र असे या नव्या शास्त्रास नाव देण्यात आले आहे. पृथ्वीच्या पलीकडे विश्वात जीवसृष्टी असल्याचे ज्या शास्त्राच्या आधारे सिद्ध करायचे ते परजीवशास्त्र असा त्याचा अर्थ. जगातले काही अत्यंत बुद्धिमान शास्त्रज्ञ विश्वात इतरत्र कोठे जीवसृष्टी आहे काय याचा शोध घेण्यात मग्न झाले आहेत. मोठमोठ्या वेधशाळा व प्रयोगशाळांमधून रेडियो निरीक्षणाचे कार्य त्या दृष्टीने चालू आहे. तसेच खगोलशास्त्रज्ञांच्या आंतरराष्ट्रीय परिषदा व बैठकांमधून या प्रश्नाचा खल होतो आणि मिळालेल्या माहितीची व ज्ञानाची देवाणघेवाण होते.

१९७१ साली सोव्हियट व अमेरिकन शास्त्रज्ञांच्या पुरस्काराने सोव्हियट आर्मेनियामधील 'ब्युराकन ॲस्ट्रोफिझिकल ऑब्झर्वेटरी' या वेधशाळेत जगातल्या श्रेष्ठ खगोलशास्त्रज्ञांची एक परिषद भरविण्यात आली होती. विश्वात विज्ञान व तंत्रशास्त्रात माणसाइतके किंवा माणसाहूनही अधिक पुढे गेलेले कोणी प्राणिमात्र आहेत की काय याचा या परिषदेत खल झाला. अवकाशातून पृथ्वीवर जे रेडियो संदेश मिळतात, त्यांवरून विश्वात कोठेतरी बुद्धिमान प्राणी असण्याची शक्यता शास्त्रज्ञ गृहीत धरतात. सोव्हियट युनियनमध्ये पृथ्वीच्या जवळ असलेल्या–अर्थात तुलनात्मक दृष्टीने–पन्नास ताऱ्यांवरून येणारे संदेश टिपण्यासाठी १५ मीटरचा एक रेडियो टेलिस्कोप बसविण्यात आला आहे. या संदेशामध्ये विश्वात माणसापेक्षाही तंत्रज्ञानाच्या बाबतीत अधिक पुढारलेल्या कोणा प्राणिमात्रांकडून आलेले संदेश आहेत काय व असल्यास त्याचा अर्थ कसा उलगडता येईल या दृष्टीने या रेडियो टेलिस्कोपच्या साहाय्याने संशोधन करण्यात येते. सदर परिषदेत सोव्हियट युनियनच्या प्रतिनिधीने या प्रयोगाची माहिती सांगितली. असे संदेश टिपून त्यांचा अर्थ उलगडण्याचे काम हे सबंध मानवजातीचे समजण्यात यावे, त्याबाबत राष्ट्रीय वा अशाच इतर कोणत्याही मर्यादा न पाळता आंतरराष्ट्रीय भूमिकेवरून सहकार्य करावे असा महत्त्वाचा निर्णय या परिषदेने घेतला.

यानंतर अमेरिकेत सॅनफ्रॅन्सिस्को येथेही त्याच वर्षी परजीवशास्त्रज्ञांची अशी एक परिषद भरली. सॅनफ्रॅन्सिस्कोस असलेले 'एमिस रिसर्च सेंटर' ही अंतराळातून येणाऱ्या संदेशांबाबत संशोधन करणारी अमेरिकेची प्रमुख संशोधन संस्था होय. या परिषदेतही अंतराळ संदेशांची सविस्तर चर्चा झाली. विश्वात अगणित ठिकाणी बुद्धिमान प्राणिमात्र असावेत असे बहुतेक शास्त्रज्ञांचे मत पडले. सूर्याच्या ग्रहमालेतील कोणत्याही ग्रहावर मात्र जीवसृष्टी असण्याचा संभव नाही. या ग्रहांपैकी कोणत्याही ग्रहावर किंवा त्यांच्या उपग्रहावर बुद्धिमान व विज्ञानात प्रगत असे प्राणिमात्र असते तर त्यांच्याकडून आपल्याला काही ना काही संदेश यापूर्वीच मिळाले असते किंवा त्यांनी पृथ्वीला भेट दिली असती. तथापि या ग्रहांवर सध्या जरी नाही तरी पूर्वी केव्हा तरी जीवसृष्टी असावी व त्या दृष्टीने पृथ्वीचे शेजारी असलेल्या या ग्रहांवरील परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण व्हावयास पाहिजे यासंबंधी शास्त्रज्ञांमध्ये एकवाक्यता झाली.


पृथ्वीखेरीज अंतराळात जीवसृष्टी असावी या तर्कास प्रयोगशाळांमधून करण्यात येत असलेल्या संशोधनाचाही आधार मिळतो. पृथ्वीवर जीवसृष्टी कशी निर्माण झाली ? पृथ्वीचा जन्म सुमारे ४६० कोटी वर्षांपूर्वी झाला असा अंदाज आहे. पृथ्वीचा जन्म झाल्यावर लवकरच तिच्यावर जीवसृष्टीच्या उत्क्रांतीस सुरुवात झाली. पृथ्वीच्या या प्रारंभीच्या काळात ती अमोनिया, मिथेन, हायड्रोजन व पाण्याचे बाष्प या वायूंच्या घट्ट अशा आवरणाने आच्छादलेली होती. नंतर सूर्याचे अल्ट्राव्हॉयलेट किरण किंवा खुद्द पृथ्वीवर चमचमणाऱ्या विजा आणि बालपृथ्वीच्या पृष्ठभागावर असलेल्या ज्वालामुखींच्या स्फोटांमधून वर आलेली उष्णता यांनी वातावरणातील वायूंचे कण फोडले. हे फुटलेले कण पुन्हा एकत्र होऊन त्यांची नवी मिश्रणे तयार झाली व नवे कण बनले. हे कण मग पृथ्वीवरच्या समुद्रात मिसळले आणि त्यापासून अमिनो ॲसिड तयार झाली. ही अमिनो ॲसिड जीव व जीवास आवश्यक असलेले प्रोटिन यांच्या निर्मितीचा आधार होत. प्रारंभीच्या काळात पृथ्वीवर ज्या प्रक्रियेने अमिनो ॲसिड तयार झाली तीच प्रक्रिया प्रयोगशाळेत करून शास्त्रज्ञांनी अमिनो ॲसिड तयार केले आणि या ॲसिडपासून जीवसृष्टी उत्क्रांत झाली हे सिद्ध केले.

पृथ्वीवर अमिनो ॲसिडपासून जीवसृष्टी उत्क्रांत झाली हे सिद्ध झाल्याने विश्वात इतरत्र जीवसृष्टी आहे हा तर्क कसा निघतो ? या तर्काला आधार म्हणजे अंतराळामधून पृथ्वीवर पडणाऱ्या उल्का. या उल्कांचा शास्त्रज्ञांनी अत्यंत बारकाईने अभ्यास केला. १९७० साली पोन्नांपेरुमा या सिलोनी शास्त्रज्ञाने ऑस्ट्रेलियात नव्याने पडलेल्या उल्केमध्ये १७ अमिनो ॲसिड असल्याचे दाखवून दिले. या उल्केने ही अमिनो ॲसिड पृथ्वीच्या वातावरणात आल्यावर गोळा केली नाहीत, तर अंतराळातूनच आणली हे पोन्नांपेरुमा यांनी निर्विवाद सिद्ध केले. याचा अर्थ अंतराळात अमिनो ॲसिड तयार होण्याची क्रिया कोठेतरी घडते आहे. म्हणजे पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण होण्यास जी परिस्थिती कारण झाली तशी परिस्थिती विश्वात अन्यत्र आहे.

या तर्कास आणखी आधार मिळाला आहे. अमेरिकेतील बर्कले येथील कॅलिफोर्निया विश्वविद्यालयातील शास्त्रज्ञांच्या तुकडीने १९६८ साली तेथला रेडियो टेलिस्कोप आकाशगंगेच्या केंद्रावर लावला. टेलिस्कोपने या वेळी आकाशगंगेकडून आलेली जी 'प्रक्षेपणे'

## सृष्टीतील नवलकथा

प्रकाश सावंत • प्रकाश साटम




## सावली

—आराधना आठवले



जमिनीला सावली आईची
आईला सावली छत्रीची
छत्रीला सावली झाडाची
झाडाला सावली आकाशाची
आकाशाला सावली कोणाची ?
कोणाची ?

पकडली ती दुसऱ्या कशातूनही नव्हे तर अमोनियाच्या कणांमधूनच निघालेली होती हे त्या शास्त्रज्ञांना दिसून आले. पृथ्वीवर ज्या वायूंच्या क्रियाप्रक्रियांमधून जीवसृष्टी उत्क्रांत झाली, त्याच वायूंचे ढग ताऱ्यांच्या मधील अवकाशात आहेत हे या प्रयोगात प्रथम सिद्ध झाले. या निष्कर्षास दुजोरा देणारे अनेक प्रयोग नंतर झाले.

या सर्वांचा अर्थ इतकाच की, जीवसृष्टी निर्माण होण्यास जे घटक पृथ्वीवर होते, ते अंतराळातही आहेत आणि तसे जर आहे तर कोठे ना कोठे तरी पृथ्वीसारखीच जीवसृष्टी अस्तित्वात असली पाहिजे यात शंका उरत नाही. पृथ्वीवर अंतराळामधून येणाऱ्या संदेशांचा उलगडा झाला आहे असा मात्र याचा अर्थ नाही. अंतराळामधून आलेले संदेश काही विशिष्ट संकेत घेऊन येणारे संदेश आहेत असे शास्त्रज्ञांना वाटावे आणि नंतर ते पृथ्वीवरच्याच इतर भागातील राडार किंवा अशाच साधनांनी सोडलेले संदेश आहेत असे कळून यावे, अशाही गमतीच्या चुका घडल्या आहेत. विश्वातील कोणी बुद्धिमान प्राणी पृथ्वीवर संदेश पाठवीत असतील तर त्यांचा अर्थ उलगडणे ही काही सोपी गोष्ट नाही. कारण हे प्राणी माणसासारखे असतील व माणसासारखीच भाषा बोलत असतील असे गृहीत धरण्यास काहीच आधार नाही.

अशा जरी अनेक अडचणी असल्या तरी विश्वात अन्यत्र कोठे जीवसृष्टी आहे का, आपल्यासारखेच कोणी बुद्धिमान प्राणी आहेत का हा शोध मानव अखंडपणे घेत राहणार. आजपर्यंत ही केवळ तर्काची व कल्पनेची बाब होती. आता विज्ञानाच्या भक्कम आधाराने हा शोध घेण्यात येत आहे. अंतराळातून आपल्याला संदेश येत असतील तर आपणही असे संदेश विश्वातल्या त्या जीवांकडे पाठविले पाहिजेत. गेल्या पंधरा वर्षांत लष्करी राडार व अशाच साधनांच्याद्वारे अंतराळात संदेश पाठविण्याचे काम चालू आहे. त्यातून काय निष्पन्न होईल हे आजच सांगता येणार नसले तरी हा शोध चालू ठेवला पाहिजे व चालू राहणार आहे. □ □ □

# आकाशदर्शन

## ऑक्टोबर

: बाबूराव प. सावे :

आपण मे महिन्यापर्यंत आकाशातील नक्षत्रे व ग्रह यांचे निरीक्षण केले. पुढे पावसाळ्यात ढगांमुळे निरीक्षण चांगले होणार नाही म्हणून चार महिने हा अभ्यास स्थगित केला. परंतु या दिवसांतही आपल्यापैकी काही जणांनी नक्कीच काही नक्षत्रे, तारे, ग्रह वगैरे पाहाण्याचा प्रयत्न केला असेल. कारण आतापर्यंत बरीच नक्षत्रे आपल्या परिचयाची झालेली आहेत. संधी येईल त्यावेळेस ती पाहाण्याचा मोह होणारच. असो.

आता हा ऑक्टोबर महिना आला. आकाश पुष्कळ वेळा निरभ्र असेल व सर्व नक्षत्रांची पुन्हा भेट होऊ शकेल. पाहा, या महिन्यात पहिल्याच तारखेस भाद्रपद शुद्ध पौर्णिमा आहे. म्हणजे त्या दिवशी बराच प्रकाश असणार. तरीदेखील या महिन्याच्या ज्या देवता, पूर्वाभाद्रपदा व उत्तराभाद्रपदा आहेत त्या आपणांस ओळखता येतील. कारण त्या ठळक तारका आहेत. त्या या दिवशी चंद्राच्या जवळच आहेत. नंतर रोज त्या थोड्या पश्चिमेस व चंद्र थोडाथोडा पूर्वेस आहे असे दिसू लागेल.

दोन्ही, पूर्वा व उत्तराभाद्रपदा संध्याकाळी पूर्वेस उगवणार व पहाटेस मावळणार. या भाद्रपदांच्या वरच्या अंगास, म्हणजे जरा पश्चिमेस गुरुग्रह आपणांस सहज ओळखता येईल. कारण गुरूइतका तेजस्वी गोल सध्या आकाशात कोणताच नाही. शिवाय त्याचे तेज स्थिर असते.

संध्याकाळी ९–१० पर्यंत काळोखी रात्र हवी असल्यास असे दिवस म्हणजे ता. ५–६ पासून ता. १६–१७ पर्यंत आहेत. या दिवसांत आकाशातील काही प्रमुख नक्षत्रे पुढीलप्रमाणे दिसतील. साधारणपणे १३ ऑक्टोबरचे ९.३०–१० चे हे चित्र असेल.



(१) पूर्वाभाद्रपदा – } Pegasus.
(२) उत्तराभाद्रपदा – }
(३) **रेवती**–Z-Pisces.
(४) **आश्विनी**–Artiecs.
(५) **भरणी**–41-Aries.
(६) **कृत्तिका**–Pleiades.
(७) **देवयानी**–Andromeda.

पूर्व क्षितिज–(१३ ऑक्टोबर, सुमारे १० वाजता.)

आकृतीत नक्षत्रे थोडी जवळजवळ आहेत. हीच नक्षत्रे आपणांस मे महिन्यात पहाटेस दिसत होती. ती आता रोज चार मिनिटे लवकर उगवत असल्याने संध्याकाळी दिसत आहेत. आश्विनी, भरणी, कृत्तिका ही नक्षत्रे भाद्रपदा नक्षत्रांच्या मानाने अगदीच अंधुक आहेत. परंतु कृत्तिकांचा पुंजका जेव्हा पूर्व क्षितिजाच्या बऱ्याच वर येईल त्या वेळेस तो सहज लक्षात येईल.

या वेळेस आपण उत्तरेस तोंड केले तर साधारणपणे पुढील चित्र दिसेल.



(१) **ध्रुव व ध्रुवमत्स्य**–Pole Star, Small Bear
(२) **शर्मिष्ठा**–Cassiopea.
(३) **वृषपर्वा**–Cepheus.
(४) **अभिजित**–Vega.
(५) **हंसा**–Cygnus.
(६) **देवयानी**–Andromeda.

उत्तरेकडे तोंड केल्यास

हे सर्व ठळक तारे आहेत. फक्त ध्रुव व ध्रुवमत्स्य अंधुक आहेत. परंतु त्यांच्या आसपास दुसरे ठळक तारे नसल्याने ते ओळखता येतील. ध्रुव तारा आपणांस क्षितिजापासून वर सुमारे २० अंशावर दिसेल व रोज त्याच ठिकाणी आढळेल हे आपणांस माहीत आहे. शर्मिष्ठेचे काही तारे त्याच्याकडेच बोट दाखवितात व हंस पक्षीही त्याच्याकडेच उडत येत असतो.

येथूनच पश्चिमेकडे तोंड केले तर आपणांस वृश्चिक नक्षत्र व पूर्वाषाढा, उत्तराषाढा वगैरे नक्षत्रे आग्नेयेस, म्हणजे दक्षिण-पश्चिम




ही त्रिमूर्ती कोण?

हे आपले बिट्टूकाका, पुट्टाप्पा आणि बामजी मास्तर!

एकदा काय झालं—ह्या तिघांनी ठरवलं की आपण धंद्यात 'पडायचं'!—आणि मग काय धमाल झालीय म्हणता!

ती तुम्ही प्रत्यक्षच वाचा ना! पुढील अंकापासून प्रसिद्ध होणाऱ्या ह्या चित्रकथेत.

ह्या चित्रकथेचं नाव आहे—

? ? ?

लेखक : जयवंत दळवी

चित्रकार : राम वाईरकर

दिशेस मावळण्याच्या तयारीत दिसतील. अभिजित व हंस यांच्या दक्षिणेस श्रवण व धनिष्ठा ही नक्षत्रे दिसतील. या नक्षत्रांच्या चित्रांकरिता मे महिन्याचा 'किशोर' पाहावा.

नंतर आपण दक्षिणेकडे जर पाहिले, तर भाद्रपदांच्या दक्षिणेस क्रमाने तिमिंगल, जटायू व यमुना ही ठळक नक्षत्रे दिसतील. यांची चित्रे मागच्या डिसेंबरच्या व जानेवारीच्या अंकांत पाहावी.

आपण जर पहाटेस उठलो तर जी नक्षत्रे आपण जानेवारीत संध्याकाळी पाहिली ती दिसू लागतील. उदा० मघा, पूर्वा व उत्तरा-फाल्गुना वगैरे. रोहिणी, मृग, व्याध, अगस्ती वगैरे नक्षत्रे बरीच वर आलेली आळढतील. सध्या शनी ग्रह मिथुन राशीतच आहे. म्हणजे मृग, आर्द्रा व पुनर्वसू यांच्या समूहात. तो त्याच्या स्थिर तेजामुळे आपण ओळखू शकतो. रात्री सुरुवातीस गुरू व पहाटेस शनी यांच्याशिवाय दुसरे ग्रह सध्या दिसणार नाहीत. कारण ते सूर्याच्या बरेच जवळ आहेत. सूर्य सध्या ऑक्टोबर ९ पर्यंत हस्त नक्षत्रात आहे. पुढे १० तारखेपासून चित्रा नक्षत्रात आहे. नंतर २३ तारखेपासून स्वाती नक्षत्रात. याचा अर्थ काय बरे? समजा सूर्याच्या पलीकडे, अंतरिक्षात कोणते नक्षत्र दिसते हे जर आपण पाहू शकलो तर वरील नक्षत्रे आपणांस दिसतील. पण हे प्रत्यक्ष पाहणे शक्य होत नाही. ती नक्षत्रे तेथे असणारच, हे आपण त्यांच्या व सूर्याच्या भ्रमणाच्या मार्गावरून व शेजारच्या नक्षत्रांच्या स्थानावरून समजू शकतो. कधी कधी खग्रास सूर्यग्रहण झाल्यास आसपासचे अती ठळक तारे दिसतात असा अनुभव आहे.

या ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या तारखेस एक पौर्णिमा व ३१ तारखेस दुसरी पौर्णिमा आहे. ही या महिन्याची एक विशेष गोष्ट आहे.

■ ■ ■

## आकाश दर्शन : ऑक्टोबर, १९७४

**चंद्र** : या महिन्यात दोन वेळा पौर्णिमा आहे. चंद्राचे बिंब दि. १ ला सायंकाळी ४ वाजून ८ मिनिटांनी व दि. ३१ ला सकाळी ६ वाजून ४९ मिनिटांनी पूर्णाकृती दिसेल. नवचंद्र दि. १५ ला सायंकाळी ५ वाजून ५५ मिनिटांनी दिसेल.

आपल्या भ्रमणात चंद्र दि. ९ ला शनीच्या दक्षिणेस अडीच अंशावरून जाईल. तर दि. २६ ला तो गुरूच्या उत्तरेस ७ अंशावरून जाईल. ह्या महिन्यातील पहिल्या चंद्रकोरीचे दर्शन दि. १७ ला सायंकाळी होईल.

पृथ्वीसभोवतालच्या भ्रमणकक्षेत चंद्र दि. १२ ला पृथ्वीच्या सर्वांत जवळ व दि. २४ ला सर्वांत लांब असेल.

**बुध** : हा ग्रह सायंतारा म्हणून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात सूर्यास्तापूर्वी एक तास अगोदर मावळताना दिसणार आहे. त्यानंतर तो सूर्याच्या जवळ जात असल्यामुळे त्याचे दर्शन घडणार नाही. बुध ह्या महिन्यात तूळ राशीत आहे.

**शुक्र** : पहाटेचा तारा म्हणून हा ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात सूर्योदयापूर्वी एक तास अगोदर उगवणार आहे. त्यानंतर तो सूर्याच्या जवळ जात असल्यामुळे त्याचे दर्शन होणार नाही. ह्या महिन्यात शुक्र कन्या राशीतून तूळ राशीत जाईल.

**मंगळ** : ह्या ग्रहाची दि. १४ ला सूर्याशी युती होत असल्यामुळे त्याचे दर्शन महिनाभर घडणार नाही. मंगळ कन्या राशीतून तूळ राशीत प्रवेश करणार आहे.


**गुरू** : महिन्याच्या पूर्वार्धात हा ग्रह सूर्योदयापूर्वी तीन तास व उत्तरार्धात सूर्योदयापूर्वी चार तास मावळणार आहे. तो कुंभ राशीत वास्तव्य करून आहे.

**शनि** : महिन्याच्या पूर्वार्धात स्थानिक मध्यरात्रीच्या सुमारास उगवणारा हा ग्रह पहाटेच्या आकाशात दिसेल. उत्तरार्धात तो स्थानिक मध्यरात्रीच्या अगोदर दीड तास उगवणार आहे. दि. ३१ ला तो वक्री होत आहे. शनीचे वास्तव्य मिथुन राशीत आहे.

[मिटिऑरॉलॉजिकल ऑफिसर, अलिपोर कलकत्ता यांच्या नॉटिकल अलमॅनॅक युनिटच्या सौजन्याने]

महाराष्ट्र बँक सादर करीत आहे

# चित्रबोध-शब्दशोध





महाराष्ट्र बँकेत, चौदा वर्षांच्या मुलामुलींना आपल्या नावाने खाते सुरू करता येते.
आता पहिली गोष्ट तुम्ही कोणती करणार ?
अर्थातच महाराष्ट्र बँकेत तुमच्या नावाचे खाते उघडणार !
मग उशीर कशाला ?


हे चित्रांचे शब्दकोडे आहे. चित्राना व चौकोनांना क्रमांक दिले आहेत. प्रत्येक चित्र पाहून त्यात दिसणाऱ्या वस्तूचे नाव, वर्णन, माणसाच्या चेहऱ्यावरील भाव, निसर्गदृश्य इत्यादींवरून सूचित होणारा योग्य शब्द चौकोनात भरायचा आहे.

कोडयाचे उत्तर डिसेंबरच्या अंकात




श्री. बापूराव नाईक यांनी हे मासिक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकरिता पॉप्युलर फाईन आर्ट लिथो वर्क्स प्रायव्हेट लिमिटेड, १३३ सी, वाकोला, सांताक्रुझ, मुंबई–४०० ०५५ येथे छापले आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ 'बालभारती' सेनापती बापट मार्ग, पुणे–४११ ००४ येथे प्रकाशित केले.




पाठ्यपुस्तक मंडळाने प्रकाशित केलेल्या पाठ्यपुस्तकांतील निवडक गीतांच्या श्रवणीय ध्वनिमुद्रिका आता विक्रीस तयार आहेत.

तरी शिक्षणसंस्था आणि इतरही ज्या कुणाला ह्या ध्वनिमुद्रिका हव्या असतील—त्यांनी खालील पत्त्यावर चौकशी करावी :

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**